# वऱ्हाडसमाचार.

Berar Samachar.

वर्ष ४६ ] आकोला—सोमवार तारीख ५ माहे फेब्रुवारी सन १९१२ ई० [ अंक ६



## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........ २ रुपये.
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

## नोटिशींचें दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगाचा दोन ओळी धरल्या जातील
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

**सूचनाः—** गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील यापुढें येणाऱ्या नोटिसास स्पेशल चार्ज पडेल



### जाहिरात

मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या शर्तीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा त्यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर त्यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पाच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक ⎫ G. A. Phillips.
आकोला २१.९.०९ ⎭ एजंट

नं १

## मुंबई बँकचें सोनें.

मुंबई बँकचा छाप असलेल्या उत्तम कसाच्या सोन्याच्या चिपा मुंबई बँकच्या आकोले व उमरावती येथील ऑफिसांत विकत मिळतील. गिऱ्हाइकानें जास्त माहिती करितां बँकेंत तपास करावा.

एका चिपचें वजन २६⅔ तोळे असतें. साधारण भाव वऱ्हाड समाचार वर्तमानपत्रांत बाजारभाव ह्या सदराखालीं सांपडेल.

मुंबई बँक ⎫ G. A. PHILLIPS.
आकोला २१.९.१० ⎭ एजंट

नो० नं० २

## चांदीचीं भांडीं.

### खरें सचोटीचें दुकान.

आमचें दुकानीं शुद्ध चिनई चांदीचीं सर्व प्रकारचीं सुबक व घाटदार भांडीं विक्रीस तयार असतात. माल काळजीपूर्वक

वक्तशीर व्ही. पी. नें पाठवूं. मालाचे खरेपणाबद्दल जोखिमदार राहूं. एकवार अनुभव घ्यावा.

पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन.
३ आदितवारपेठ, नासिक

श्री राधावल्लभाजयाति

## वर्षफल ।

हमारे पास सिर्फ १ पोस्टकार्ड पर किसी फल या फूल का नाम लिख भेजो हम आप के एक वर्ष का सुख, दुःख लोभ, हानि जीवन मरण, रोग, सन्तान तरक्की, मौकूफी, व्यापार में किस वस्तु स लाभ होगा दिसावरी काम में कैसा लाभ होगा और जो महीना हानिकारक उस का उपाय महीनेवार वर्षफल व्ही० पी० द्वारा ॥ रुपये में भेज देंगे. हमारे यहां जन्म पत्रादि उत्तमोत्तम बनते है अनेक प्रशंसा पत्र मौजूद हैं, विशेष परिचय के अर्थ ०॥ आना का टिकट भेज कर सूचीपत्र मंगा लीजीये.

मिलने का पत्ताः—
गोस्वामी राधामोहन शर्म्मा
नं ४ चित्तीखाना आगरा.


## जाहिर नोटीस.

सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं मुक्काम आकोला, प्रांत वऱ्हाड येथें आमचे वडील कै० कृष्णाजी दिनकर, एंजिनियर, यांनीं संपादन केलेलें व हल्लीं आमच्या मालकीचें घर, इमला व खुली जागा यासुद्धां, विकावयाचें आहे. हें घर आकोला येथें गांवांत जुम्मामशीदी नजीक आहे सदरील घराचे तीन चार सोईवार पृथक् भाग होण्यासारखें आहेत. यापैकीं एक अगर अधिक भाग अथवा संबंध वाडा विकत घेण्याची ज्यांची इच्छा असेल त्यांनीं खालीं सही करणार यांजकडे खालीं दिलल्या पत्त्यावर किंवा रा० रा० नारायण खंडराव फडके वकील, मुक्काम आकोला, यांजकडे किंवा रा० रा० लक्ष्मण जयराम हातवळणे आगरवेशी जवळ मुकुंद बाळकृष्ण यांचा वाडा, मुक्काम आकोला, यांजकडे समक्ष अगर पत्रद्वारें कळवावें, म्हणजे किंमती वगैरे बद्दल खुलासा केला जाईल. व लागेल ती इतर माहिती देण्यांत येईल

सही

काळू कृष्ण सहस्रबुद्धे मुक्काम पुणें, पेठ नारायण, घर नंबर ३४८
तारीख १७ माहे डिसेंबर सन १९११

नो० नं० ५

## नोटीस

रा. रा. बिजराज कुंजिलाल साहू दुकान दहिहांडा

यांसः- -

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं मी शेत सर्वे नं. २१३ एकर गुंठे ५८६ आकार रुपये ११ मौजे लैसांग येथील आपणापाशीं २०० रुपयांस गहाण ठेवलें आहे. ते शेत मी रा. शिवनारायण मोहनलाल साहू दुकान लैसांग यास ता. १०।१।१२ इ. रोजीं ४०० रुपयास विकलें आहे. व तुमची गहाणाची रक्कम देण्यास मी दोनदा आलो पण आपण हिशेब करीत नाहीं. व पैसेही घेत नाहीं सबब नोटीशीनें कळविण्यांत येतें कीं मी आपले गहाणाचे पैसे २०० रु. व त्याचें व्याज आज तारखेपर्यंतचें असे पैसे शेट बिसनदयाल सिताराम दुकान आकोला यांचे दुकानीं ठेवले आहेत ते आपण ताबडतोब घेऊन जावे याउपर तुह्मी न नेल्यास त्या रकमेच्या आजपासूनच्या पुढील व्याजाबद्दल मी जबाबदार राहणार नाहीं. तुमचे नुकसान होऊं नये ह्मणून आगऊ सूचना देत आहे. कळावें ता० २६।१।१२ इ.

सही

मारुती वा। धनाजी हाते रा० लैसांग द० खु०

नो. नं. ६२

## नोटीस

इलिचपूर सिव्हिल स्टेशन म्युनिसिपल कमेटीचे हद्दींत राहणार सर्वत्र लोकांस या नोटीशीनें जाहिर करण्यांत येते कीं ता २२ माहे जानेवारी सन १९१२ इसवी रोजीं भरलेल्या सबकमिटीनें सन १९१२-१३ सालाकरितां पोलीसपट्टी, घरपट्टी, भंगीपट्टी, व चे ठराव केले आहेत तरी सदर्हू कमिटीनें वरील तारखेस केलेले ठराव ज्या कोणास नामंजूर असतील त्यानें नोटीशीचे तारखेपासून ३० दिवसाचे आंत कमिटीकडेस लेखी अर्ज करावे म्हणजे त्यांचे अर्जाचा योग्य विचार केला जाईल वरील मुदतीनंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार ऐकली जाणार नाहीं. वरील सर्व ठरावांचे तक्ते कमेटीचे आफिसांत आफिसचे वेळांत सर्वांस पहाण्यास मिळतील. कळावें ता. २३ माहे जानेवारी सन १९१२ इसवी.

सेक्रेटरी
एलीचपूर सिव्हिल स्टेशन म्युनिसिपालिटी.

नो. नं. ६३

## नोटीस

पुंजी मर्द गणपतसा रंगारी रा० पिंपळगांव राजा ता० मलकापूर

यांसः—

मल्हारी वा। शिवराम रंगारी राहणार पिंपळगांव राजा ता० मलकापूर यांचेकडून नोटीस देण्यांत येते कीं तूं माझी सखी चुलती असून तुझा नवरा व माझा बाप हे दोघे भाऊ वडिलोपार्जीत स्थावर इस्टेटीचा एकत्रांत उपभोग घेत होते. तुझा नवरा मरण्यास सुमारे ६ वर्षें झालीं. त्यानंतर तुझे हयातीपर्यंत तुझे पोटगी करितां आमचे वाडिलोपार्जीत इस्टेटींतील शेत सर्वे नं. १९४ कजबे पिंपळगांवराजा येथील तुला दिला आहे. तुझे हयातीपर्यंत सदर्हू शेताचें उत्पन्न तूं घेण्यांस आमची कांहीं हरकत नाहीं. त्याचप्रमाणें तुला राहण्यास घरही दिलें आहे. सदर्हू घर व शेत कोणास खरेदी किंवा गहाण देण्याचा तुला मुळींच अधिकार नाहीं. व त्याबद्दल तूं मला करारनामाही लिहून दिला आहेस अलीकडे सदर्हू घर व शेत तूं दुसरे लोकांस गहाण अगर खरेदी देण्याच्या विचारांत आहेस असें मला कळलें, गहाण अगर खरेदी देण्याची तुला मुळीच जरूर नाहीं. तरी या नोटीशीनें तुला कळविण्यांत येते कीं सदर्हू घर आणि शेत तूं कोणास गहाण अगर खरेदी देऊं नयेस दिल्यास ते बेकायदेशीर होईल व त्याची जबाबदारी माझेवर नाहीं. गहाण अगर खरेदी दिल्यास तुझेवर व तुझे सावकारावर मला दावा करावा लागेल. व त्याचा खर्च तुह्मास सोसावा लागेल कळावें ता. २६।१।१२ इ.

सही

मल्हारी वा। शिवरामसा रंगारी
राहणार पिंपळगांवराजा ता० मलकापूर द. खु.

नो० नं० ६४

## नोटीस

नोटीस देणारी रा० गंगाराम वा। सुर्यभानजी कावेर राहणार भटुरी ता० मुर्तिजापूर जि० आकोला

यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटिस देण्यात येते कीं आह्मी तुह्मास पांच रुपयाचे स्टांपावर जनरल मुखत्यारपत्र देऊन आज सुमारे १॥ वर्षे झालें. आतां यापुढें तुमचें कुलमुखत्यारपत्र मी रद्द केलें आहे तरी तुह्मी यापुढें आमचे संबंधानें कोणताही व्यवहार केल्यास तो रद्द [illegible] समजला जाईल कळावें ता. २६-१-१२

सही

धनसींग वा। नाणुजी राहणार मौजे शेलु द० र

नो. नं. ६५

...टिशीचे द्वारें जाहीर [क]रण्यांत येतें कीं, जनाब चीफ [क]मिशनर साहेब बहादूर मध्यप्रांत यांच्या [ज्यु]डिसियल डिपार्टमेंट नोटिफिकेशन नंबर [२]६०३ ता० १९ सप्टेंबर १९११ यांत [प्र]सिद्ध झाल्याप्रमाणें दिवाणी कोर्टांनीं [नि]काल केलेल्या मिसलांची व्यवस्था रक्षण [व] नाश या संबंधानें नोटिफिकेशन नंबर ३५६३ ता० २६ मार्च सन १९०६ [म]ध्यें जे नियम प्रसिद्ध केले गेले आहेत [त्या] नियमानुसार ता० २६ मार्च सन १९०६ चे पूर्वी सर्व नियम रद्द समजले जाऊन पूर्वीच्या जुन्या मिसलांची व्यवस्था केली जाईल. करितां सर्व लोकांस कळ-विण्यांत येतें कीं ज्यांनीं ज्यांनीं जुन्या मिसलामध्यें महत्वाचे कागद दाखल केले असतील ते परत घेण्याकरितां ता० १ मे सन १९१२ चे आंत आमचे कोर्टांत अर्ज दाखल करून आपले कागद परत घेऊन जावें असें न केल्यास सदहू काग-दांचा नवीन नियमाप्रमाणें नाश केला जाईल कळावें. ता० १७ जानेवारी सन १९१२ इ०

A. D. Barr.
डिस्ट्रिक्ट व सेशन्स जज
पश्चिम वऱ्हाड

नं० ४४

## जाहिर नोटीस

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येतें कीं माझा पुतण्या नामे किसन वल्द जयराम वाकळे उमर वर्षे १५ सुमारें हा अज्ञान असून त्याचें पालनपोषण माझी आई नामे अंबाबाई इनें व तिच्या पश्चात् मीच केलें आहे. माझा बंधु जयराम याच्या जिन्नगीची देखरेख मी करीत असतो. किसन हा हल्लीं वाईट लोकांच्या नादी लागून वाईट छंदाला लागला आहे. तो दारू पीतो व रंडीबाजी तमाशा वगैरे गोष्टींत सर्व काळ घालवितो. मला विचारल्या शिवाय कोणीही त्याला कर्ज वगैरे देऊं नये. जो कोणी त्याच्याशीं व्यवहार करील तो फसेल आणि त्या व्यवहारामुळें माझ्या जिन्नगीवर किंवा अज्ञान किसन यांच्या जिन्नगीवर कांहींच बोजा बसणार नाहीं. किसन बरोबर घडलेल्या सर्व देवघेवी कायद्यानें रद्द आहेत कांहीं रोहिले त्याला फसवीत असतात आणि त्याला वाईट गोष्टींत गुंतवितात ह्मणून ही जाहिर खबर मुद्दाम दिली आहे. कळावें. ता. ३ फेब्रुवारी १९१२ इ.

सही
देवसिंग वल्लद गणपत वाकळे
राहणार नागद ता. बाळापूर
निशाणी रेघ

नो. नं. ६६

## जाहिर नोटीस

विद्यमान सब जज साहेब कोर्ट वाशीम यांचे कोर्टांत.

वादी

१ रावजी मारुती आल रा० रिठद ता० वाशीम
२ महादजी नबाजी आल राहाणार रिठद ता० वाशीम.
३ नारायणजी राघोजी बोरकर राहाणार रिठद ता० वाशीम
४ हरी महादजी बोरकर रा० रिठद ता० वाशीम
५ गोपाळा मारुती मुळे रा० रिठद ता० वाशीम
६ तुकाराम पुंजाजी ठोकळ रा० रिठद ता० वाशीम

प्रतिवादी (विरुद्ध)

१ बान्या सोन्या महार रा. रिठद ता. वाशीम
२ सोन्या श्रावण्या महार रा. रिठद ता. वाशीम
३ दरबान्या वल्लद दन्या महार रा. रिठद ता. वाशीम
४ राम्या व. सत्या महार रा. रिठद तालुके वाशीम.
५ तुक्या व. हनवत्या महार रा. रिठद ता. वाशीम.
६ खेम्या व. पुंना महार रा. रिठद तालुके वाशीम.
७ राम्या खेम्या महार रा. रिठद ता. वाशीम.
८ सहाद्या व. मल्हान्या मांग रा. रिठद ता. वाशीम
९ सोन्या व. मल्हान्या मांग रा रिठद ता० वाशिम.
१० सोन्या व० केन्या मांग रा० रिठद ता० वाशीम.
११ गण्या व० सोन्या मांग रा० रिठद ता० वाशीम

दावा हक्काबद्दल

या दाव्यांत सी. प्रो. ऑडर १ रू. ८ प्रमाणें वरील वादी लोकांनीं मौजे रिठद ता० वाशीम, ओरु, बोरकर, मुळे व ठोकळ या लोकांचे तर्फेनें व त्यांचें करितां आमचे कोर्टांत दावा हक्काबद्दल प्रतीवादी १ ते ११ यांजवर केला आहे व त्याची तारीख ८-३-१२ ची नेमली आहे सबब या नोटी-शीनें सर्वांस कळविण्यांत येतें कीं सदहू दाव्यांत वादी तर्फे वरील इसमांनीं दावा केला त्यांत सदहू आडनावाचे इसमापैकीं कोणास त्या संबंधी जातीनें तक्रार वगैरे करणें असल्यास सदहू तारखेस वरील कोर्टांत हाजर राहून कैफियत दाखल करावी. ही नोटीस दिली. ता० २०-१-१२ इ०

सही
SubJudge.
Basim.

नं० ६७

## *Notice.*

Notice in hereby given that the Municipal Committee of Khamgaon in the Buldana District, proposes to make the following bylaws under sections 114 (1)(2) of the Berar Municipal Law, 1886 for the storage of petroleum within the limits of the Khamgaon Municipality.

The proposed by Law will be taken into consideration on the expiry of one month from the date of the first publication of this notice. And any objections or suggestions in respect there of must be forwarded to the Secretary and to the Municipal Committee before the expiry of the said period.

कांहीं ...

M. N. Parasnis
H. Secretary Municipal Committee Khamgaon.

By Laws.

(1) Nothing in the following Rules shall be deemed to apply to personal icensed to possess petroleum under the Indian Petroleum Act 1899 or to non dangerous petroleum exceeding 500 Gallons or to dangerous petroleum exicdding 3 gallans

(2) Except, under, and in accordance will a license granted under the Berar Muncipal Law 1886, or this rule as the case may be, as petroleum shall be stored within Municipal limits in the following cases

[1] When petroleum in any quantity s stored for sale (last clause of section 114 [1] of the Berar Municipal Law 1886)

[2] When non-dangerous petroleum exceeding 50 gallons or dangerous petroleum exceeding one gallon is stored whether for sale or otherwise.

Note:— The following yearly fees have been fixed under section 114 (4) of the Berar Municipal law 1886 for licenses issued for the possession of petroleum for sale viz:—

Non-dangerous petroleum

(a) When quantity to be stored does not exceed 8 gallons. Nil.

(b) When the quantity to be stored exceeds 8 gallons but does not exceed 100 gallons — Rs 2/-

(c) When the quantity to be stored exceeds 100 gallons but does not exceed 300 gallons— Rs 2/- for each 100 gallons or part there of.

Dangerous Petroleum

When the quantity to be stored does not exceed 3 gallons. Nil

(3) No person shall store for sale in any shop within the limits of the Municipality non dangerous petroleum exceeding 50 gallons or dangerous petroleum exceeding one gallon.

Note:— For the purpose of this rule "a shop" shall be deemed to include all premises on which petroleum is sold retail

(4) No person shall store non-dangerous petroleum exceeding 50 gallons but not exceeding 500 gallons or dengerous petroleum exceeding one gall on but not exceeding 3 gallons in quantity except in buildings out-side the in-habited area of the town which haveo been approved by the committee for the perpose.

(5) To a conspicuous part of all premises licensed for the storage of petroleum, a notice board with the name of the licensee and th fact that he is licensed to store petroleum legibly written th re on, shall be attixed.

(6) Dangerous petroleum kept within Municipal limits shall be placed in seperate glass, stone-ware, or metal vessels each of which shall contain not more than one pint and shall be securely stopped.

(7) Any breach of rules 2, 3, 4, 5 or 6 above shall be punishable with fine which may extend to Rs 50/- and where the breach is a continnning breach with further fine whiech may extend to Rs. 5. for every day after the first druin g which, the breach is proved to have been persisted in.

M. N. Parasnis
H. Secretary M. C.
Khamgaon.

Khamgan.
18-1-12

नो. नं. ७२

...पारी शास्त्राचें योग्य ज्ञान व वाकबगारी ...लेल्या ॲक्चुअरी शिवाय विमा कंपनी ...रनें काढूंच देऊं नये. दुसरी गोष्ट प्रत्येक ...कडून सरकारनें कांहीं तरी मोठी ...

# वऱ्हाडसमाचार.

माघ वद्य ३ शक १८३३ दुंदुभिनाम संवत्सरे

## सध्याचा दुष्काळ.

यंदाचे सालीं गुजराथ, काठेवाड, वगैरे प्रांतांतून जो दुष्काळ पडला आहे त्याचें स्वरूप देशाच्या हिताची सतत काळजी वाहणारांनीं अमळ बारकाईनें विचार कर-ण्यासारखें आहे. अलीकडे रेल्वे वगैरे वाहनांची विपुलता झाल्यापासून हिंदुस्थाना-तल्या दुष्काळांचेंही स्वरूप पालटलें आहे. पूर्वींचे दुष्काळ धान्याचें असत; आता एका प्रांतांत धान्य पिकलें नाहीं तर त्या ठिकाणच्या लोकांना पुरून उरेल इतकें धान्य हां हां ह्मणतां इतर प्रांतांतून जाऊं शकतें. तें विकत घेण्यास पैसे मात्र पाहिजेत; ते ज्यांचे जवळ नाहींत त्यांना मात्र तो दुष्काळ जाणवतो. अलीकडच्या दुष्काळाच्या स्वरूपांतला हा प्रकार गुजराथ वगैरे प्रांतीं यंदा दिसत नाहीं. पुण्याच्या सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटीनें दुष्का-ग्रस्तांच्या मदतीसाठीं जें विनंतीपत्र काढलें आहे त्यांत जरी लोकांचे कष्ट निवार-णासाठीं द्रव्ययाचना केली आहे, तरी यंदाच्या दुष्काळाची उग्रता माणसांपेक्षा जनावरांना विशेष कष्टदायक होत आहे असें ह्मटलें आहे. यंदा गुजराथेंत पर्जन्याच्या अभावामुळें चारा मुळींच झाला नाहीं, आणि बाहेरून आणावा तर तो आणण्यास पुरेसे डबे रेल्वेपाशीं नाहींत अशा अड-चणीमुळें गरीब बिचारीं मुकीं जनावरें पटापट मरत आहेत असें नुकतेंच टाइम्स ऑफ इंडियानें ह्मटलें आहे. ही अडचण आजकालची नाहीं. पांच सात वर्षांपूर्वीं पडलेल्या दुष्काळानें गुजराथ, राजपुताना, व मध्यहिंदुस्थान या प्रांतांत दुभत्या व शेतकीच्या उपयोगाच्या जनावरांचा फन्ना उडविला, त्यावेळीं सुद्धां हीच अडचण उभी होती. आज पांच सात वर्षांनीं पुनः तीच अडचण पुढें येत आहे! या अवधींत रेल्वे बोर्ड स्थापन झालें तरी पूर्वीची अव्यवस्था कायम ती कायमच! धान्य इकडचें तिकडे नेण्यास आगगाडीच्या डब्यांची तूट कधीं येत नाहीं. रायली ब्रदर्स, व्हालकार्ट ब्रदर्स वगैरे एजन्सी मार्फत कच्च्या मालाचा व धान्याचा निर्गम अव्याहत सुरू आहे. अडचण आणि तूट आहे ती फक्त या देशांतल्या देशांत गुरांना चाऱ्याचा पुरवठा आणून देणाऱ्या साधनांची! ह्मणजे यांत ही रेल्वे कंपन्यांचा देशी आणि विदेशी असा भेदाभेद करण्याचा विचार स्पष्ट दृश्य-मान होतो. विदेशी जाणाऱ्या मालाला लागणारे डबे कंपन्यांजवळ हवेतेवढे तयार आहेत; देशाच्या शेतकीचा जीव कीं प्राण अशीं जीं जनावरें त्यांचे कष्ट हलके करण्या करितां लागणाऱ्या डब्यांची मात्र वाण

आहे असाच याचा अर्थ … व नोटीस … हा अर्थ सरकारला क… आम्हांस वाटत नाहीं. मग सरकारी अधि… कारी या बाबतींत कांहीं जागृति अद्याप दाखवित नाहींत हें कसें ?

---

## सरकारी नोकरींत हिंदी लोक.

ता. १० जानेवारी रोजीं कलकत्ता येथें भरलेल्या वरिष्ट कायदेकौंसिलच्या बैठकी चे वेळीं दीवापति यांच्या राजेसाहेबांनीं ता. २४ मार्च रोजीं विचारलेल्या एका प्रश्नाचा जबाब सरकारी अधिकाऱ्यांकडून देण्यांत आला. प्रश्न असा होता कीं १८६३, १९०३, व १९१० या वर्षी हिंदुस्थानांतल्या राज्यकारभारांत ५०० रुपयांवरच्या पगाराच्या जागापैकीं किती हिंदूना, किती मुसलमानांना व किती युरोपियन व युरेशियन यांनीं देण्यांत आल्या होत्या ? याच्या उत्तरादाखल रुजूं करण्यांत आलेले आंकडे विचार करण्यासारखे आहेत. १८६७ सालीं दोन हजारांवर इतक्या जागा युरोपियन व युरेशियन यांनीं, ९९ हिंदूना व ३५ मुसलमानांना देण्यांत आल्या होत्या. पुढे चाळीस पंचेचाळीस वर्षांनीं ह्मणजे १९०३ सालीं ३२५४ जागा युरोपियन वगैरेंना, ५०८ हिंदूंना व ९८ मुसलमानांना दिल्या; व १९१० सालीं ४४६६ जागा युरोपियनांना, ७८२ हिंदूना, व १४२ मुसलमानांना मिळाल्या. हे आंकडे विचार करण्यासारखे आहेत. प्रथम संतोषाची गोष्ट हो वाटते कीं दिवसेंदिवस हिंदी लोकांना या जागा अधिकाधिक मिळूं लागल्या आहेत. पण ही वाढ अगदीं मुंगीच्या पावलानें होत असलेली पाहून तो संतोष मावळतो. पाहिल्या छत्तीस वर्षांच्या अवधींत हिंदी लोकांमध्यें युनिव्हर्सिटीचें उच्च शिक्षण मिळविलेले हजारों गृहस्थ निर्माण झालें असतांही ही वाढ फक्त शेंकडा ९ इतक्या अल्प प्रमाणानें कां व्हावी ? याच मंदगतीनें जर ही वाढ चालली तर युरोपियनांच्या बरोबरीला येऊन पोंचण्यास हिंदी लोकांना शेंदिडशें वर्षें सुद्धां पुरावयाचीं नाहींत ! जाति, वर्ण धर्म, वगैरे भेदाकडे न पाहतां फक्त लायकीकडे पाहून नेमणुका करण्याविषयींचें श्रीमती व्हिक्टोरिया महाराणी सरकारचें वचन पूर्णपणें अंमलांत आणण्यास हिंदुस्थान सरकारला दीडशें वर्षे लागणार आणि तों पर्यंत तें वचन तसेंच अपूर्ण राहणार ही गोष्टच राजनिष्ठ प्रजेच्या मनाला उद्विग्नता आणणारी आहे.

---

## चीन देशांतली गडबड.

आज तीन महिने सुरू असलेल्या चीनांतल्या गडबडीचा अंतकाळ जवळ येऊन ठेपलेला दिसत आहे. गेल्या महिन्यांत क्रांतिवाली मंडळी व मांचू यांच्यांत समजूत करण्यासाठीं कान्फरन्स भरलें होतें पण त्याचे प्रयत्न निष्फळ झाले. पण तेव्हांपासून मांचूची प्रहदशा पालटलेली दिसत नाहीं. राजधानींतून निघून सरहद्दीकडे पळून जावें अशी मसलत राजवंशाला देण्यांत १७।१।१२ ईसवीमसलत ऐकल्याची भ…ली …ज याचा कांहीं नेम सांग… वत नाहीं अशी आज स्थिति आहे. क्रांतिकारकांचा पुढारी यु. आनाशिकाई याला राजाकडून मार्क्विस हा किताब देण्यांत आला आहे ! मांचू राजवंशांतले पुरुष क्रांतिकारकांच्या मागण्या अंशतः कबूल करण्यास एका पायावर तयार आहेत, पण चिनी लोकांना प्रजासत्ताक राज्यच पाहिजे आहे. त्यांनीं डा० सुन्यातसेन यांना तूर्त प्रजासत्ताक संस्थेचे अध्यक्ष नेमिलें आहे. परकीय राष्ट्रांनीं जपानची लायकी जशी एकदम कबूल केली तशी चिनी लोकांची प्रजासत्ताक राज्य चालविण्याविषयींची लायकी ते अद्याप कबूल करीत नाहींत, आणि ह्मणून प्रजासत्ता चीनांत स्थापन झाली असें मानण्याइतकी अद्याप त्यांची तयारी नाहीं. क्रांतिकारक पक्षाला द्रव्यबळ अनुकूल नाहीं व त्यामुळें आज नाहीं उद्यां त्या पक्षाच्या नाड्या द्रव्याच्या अभावीं आखडल्या जाण्याचा संभव आहे या गोष्टीवर मांचू ह्मणजे राजपक्षाची काय ती मदार आहे. क्रांतिकारक पक्ष द्रव्याच्या बाबतींत अडचणींत आहे ही गोष्ट कांहीं खोटी नाहीं. सैन्याच्या लोकांचे पगार थकले आहेत ते देण्यासाठीं पैसा पाहिजे तो कर्जाऊ आणण्यासाठीं जपान सरकारकडे क्रांतिकारकांनीं आपला एक एजंट पाठविल्याची बातमी आहे. जपाननें कर्जाऊ रकम दिल्यास त्या सरकारनें चीनचें प्रजासत्ताक राज्य कबूल केलें आहे असा त्याचा गर्भितार्थ होईल हें उघड आहे.

---

## राजनिष्ठेचें सर्टिफिकीट.

भूस्तरशास्त्रासंबंधीं खात्याच्या सहाव्या वार्षिक समारंभाचे प्रसंगीं कलकत्त्यास नुकतेंच व्हाइसराय ना० लार्ड हार्डिंज यांचें जें भाषण झालें त्याला सध्याच्या प्रसंगीं विशेष महत्व आहे. या भाषणांत हिंदुस्थानच्या एकंदर लोकांनीं–विशेषतः बंगाली लोकांना—बादशहाच्या आगमनाच्या शुभ प्रसंगीं दाखविलेल्या राजनिष्ठेची योग्य प्रसंसा व संतोष व्यक्त करण्यांत आला आहे. ही गोष्ट सगळ्या हिंदुस्थानाला आनंदित करणारी आहे. आतां प्रश्न हा आहे कीं जर हिंदुस्थानची सगळी प्रजा राजनिष्ठ आहे अशी सरकारची एवढी खात्री आहे तर लॉर्ड मिंटो साहेबांच्या कारकीर्दींत प्रजेचें स्वातंत्र्य मर्यादित करणारे आणि त्या बरोबरच हिंदुस्थानच्या राजनिष्ठेच्या तोंडास काळीमा लावणारे कायदे जे अद्याप कायद्याच्या ग्रंथांतून समाविष्ट झालेले दिसतात ते रद्द कां करीत नाहीं ? वर्तमानपत्राविषयींचा, सभाबंदीचा वगैरे कित्येक कायदे प्रजेच्या डोक्यावर नागव्या तरवारीसारखे लोंबत ठेवलेले आहेत ते रद्द करण्याची वेळ खास आली आहे हे नामदार साहेबांच्या वरील संतोषदर्शक भाषणावरूनच उघड होत आहे तेव्हां लॉर्ड हार्डिंज साहेब सदर कायदे रद्द केल्याचें श्रेय लवकरच घेतील अशी अपक्षा करणें व्यर्थ होणार नाहीं अशी आमची समजूत आहे.

---

## जॉर्ज बादशहाची कर्तव्यतत्परता.

बादशहाच्या आगमनापासून त्यांच्या अंगच्या कित्येक प्रशंसनीय गुणांशीं हिंदुस्थानच्या लोकांचा चांगला परिचय झाला आहे सहानुभूति, प्रजावात्सल्य, दयालुता, करारीपणा इ. गुणाबरोबर जॉर्ज बादशहाच्या अंगीं दीर्घोद्योग व कर्तव्यतत्परता हेही गुण लोकोत्तर आहेत असें कळतें. बादशहा सकाळीं सर्वांचे अगोदर उठून आपल्या आफिसांत कामकाज करीत बसतात. रात्रीं आलेल्या पत्राचा निकाल लागलींच सकाळीं उठून बादशहा स्वतः आपल्या हातानें करतात. त्यांचीं कामे करण्याची शिस्त हो फार चांगली आहे. राजकर्त्या पुरुषांकडून आलेलीं पत्रें, जाहीर संस्थाची नियंत्रणें; अर्ज, सरकारी रिपोर्ट, खाजगी टिपणें वगैरे प्रत्येक जातीच्या कागदाना निरनिराळ्या टोपली ठेवण्यांत आलीं आहेत. रोज कोणतीं कामें करावयाचीं त्यांची यादी तयार होऊन त्या यादी प्रमाणें बिनचूक कामें चालतात. कित्येक पत्राचे जबाब बादशहा स्वतः देतात व कित्येकांचे सेक्रेटरीकडून लिहवितात पण जबाबाचा प्रत्येक शब्द विचारपूर्वक योजलेला असतो. या बाबतींत सातवे एडवर्ड बादशाहांची तऱ्हा निराळी असे. ते एखाद्या पत्राचा जबाब चटकर देऊन मोकळे होत. तसें सध्याच्या बादशाशांचें नाहीं. पार्लमेंटांत होणाऱ्या कामाचे रिपोर्ट बादशाह फारच बारकाईनें वाचतात, जेथें शंका येईल तेथें अधिक माहिती मागवितात, किंवा प्रधान अथवा सेक्रेटरी यांना समक्ष बोलावून त्यांच्या कडून सविस्तर माहिती घेतात. बादशहाची ही काम… करण्याची पद्धत आ…मच्या इकडच्या देशी संस्थानिकांनीं अनुकरण… करण्यासारखी आहे असें कोण ह्मणणार नाहीं… …लों ?

---

## विमा कंपन्याविषयींचा नवा कायदा.

आयुष्याचा विमा उतरणाऱ्या कंपन्या विषयींच्या कायद्याचा खर्डा गेल्या सप्टेंबर महिन्यांत वरिष्ट कायदे कौंसिलांत दाखल करण्यांत आला व सध्यां तो सिलेक्ट कमिटी पुढें विचारार्थ गेला आहे. या कायद्यांत एक दोन गोष्टी विचार करण्यासारख्या आहेत. एक गोष्ट ही कीं सध्यां आपल्या देशांत असलेल्या शेकडों विमा कंपन्यांपैकीं फारच थोड्यांच्या चालकांना विमा उतरण्या संबंधाची शास्त्रीय माहिती आहे. इंग्लंडांत ज्याप्रमाणें विमा कंपन्या ॲक्चुअरी नांवाचे शास्त्रज्ञ नोकरींत ठेवून त्यांच्या कडून शास्त्रीय पद्धतीनें योग्य ठरविण्यांत आलेल्या तत्त्वावर कामें करतात, तशा पद्धतीनें कामें करणाऱ्या विमा कंपन्या आमच्या इकडे दहा पांचच आहेत. एखाद्या मोठ्या कंपनींतला अनुभवशीर कारकून पैशाची लालूच दाखवून आपलेकडे ओढावा आणि त्याच्याकडून किंवा मोठ्या कंपनीच्या प्रास्पेक्टसमधील दर पाहून त्यांच्याहून थोडेसें सवलतीचे दर आपण ठरवून धंदा घेत ही बहुधा आमच्या कंपन्यांची पद्धत असते. अशा डळमळींत पायांवर उभारलेल्या कंपन्या केव्हां बुडतील याचा नेम नसतो यासाठीं सरकारनें कांहीं तरी बंदोबस्त करणें अवश्य आहे. विमा वगैरे व्यापारी शास्त्राचें योग्य ज्ञान व वाकबगारी असलेल्या ॲक्चुअरी शिवाय विमा कंपनी सरकारनें काढूंच देऊं नये. दुसरी गोष्ट प्रत्येक कंपनी कडून सरकारनें कांहीं तरी मोठी रकम अमानत ह्मणून ठेवून घेणें अवश्य आहे. ही रकम दोन लाख रुपये असावी अशी सूचना मुंबईच्या विमा कंपनीच्या सल्लागारांनीं केलेली आहे, पण ती आमच्यामतें नवीन साहसी देशी कंपन्यांची कंबर मोडण्या इतकी भारी आहे. अमुकच रकम अमानत ठेविली पाहिजे असें ठरविण्यांपेक्षा ती कंपनी जितक्या रकमेचा कारभार सालीना करीत असेल तिच्यावर शेकडा अमुक टक्के असें कांहीं प्रमाण ठरवावें हें अधिक संयुक्तिक व सोयीचें होईल व प्रजेच्या हिताचें रक्षण करणें हा जो या नव्या …लाचा उद्देश तोही बऱ्याच अंशांनीं सिद्धीस जाईल असें आह्मांस वाटतें.

---

## आयरिश होमरूल.

सध्यां विलायतेंत आयरिश होमरूला संबंधानें जोराची चळवळ सुरू आहे. प्रधानमंडळाचा तें बिल पास करून घेण्याचा निश्चय जितका प्रबळ आहे तितकाच किंबहुना कांकणभर अधिकच असा हट्ट अल्स्टर येथील प्राटेस्टंटाचा त्या बिला विरुद्ध आहे, आणि इंग्लडांतील टोरी वर्तमानपत्रें या हट्टाबद्दल अलस्टरची पाठ थोपटून त्याना उत्तेजन देत आहेत. मि. विन्स्टन चर्चिल हे अलस्टर येथील टाऊन हॉलांत सदर बिलाला अ… …णार होत, प… अलस्टर येथील लोकांचा जोराचा विरोध पाहून त्यांना थोडीशी माघार घ्यावी लागली. या बिलाला कसा विरोध करावयाचा त्याची दिशा व कार्यक्रम ठरविण्यांत आला आहे तो असा होमरूल बिल पास झाल्यास तें निरर्थक करण्यासाठीं बेलफास्ट येथें सर एडवर्ड कार्सन यांच्या प्रमुखत्वाखालीं अडीच लक्ष दांडगे अलस्टर… …च्या लोकांचें एक सैन्य तयार करून तें अलस्टर …परगण्याचा कारभार स्वतःचे हातांत घेणार आहे, आणि डब्लि… येथें स्थापन होणाऱ्या पार्लमेंटाच्या हातांत महसुलाची एक पै पडूं द्यावयाची नाहीं असा त्यांचा विचार आहे. थोडक्यांत सांगावयाचें ह्मणजे सरकारी अधिकाऱ्यां विरुद्ध उघड उघड बंड करण्याची तयारी अलस्टरनें करून ठेविली आहे. गंमत ही आहे कीं बंडवाल्याचे प्रमुख सर ए कार्सन हे स्वतः अलस्टरचे रहिवाशी नाहींत, इतकेंच नाहीं तर आयर्लंडचे सुद्धां रहिवाशी नाहींत. आयर्लंडच्या ज्या चार परगण्यांत ही बंडाळी माजत आहे त्या चार परगण्यां मिळून पार्लमेंटांत दहा सभासद आहेत. पैकीं ८ न्याशनालिस्ट व दोन टोरी आहेत.

---

## औद्योगिक अशांति

नुसत्या होमरूलाबद्दलच विलायतेंत गडबड चाललेली असें नसून उद्योगधंद्यासंबंधानेंही लोकांचीं मनें अत्यंत अस्वस्थ झालीं आहेत. कामकरी लोकांचे संपाचे विचार चालूच आहेत. कित्येक ठिकाणीं संप होऊन मजूर उपासमार व थंडीचा कडाका यांच्या दुहेरी तडाख्या-

ेताचें उत्पन्न दरसाल सारा जाता सुमारें म…
…ल्पयाचें असल्यानें तिला कोणाचें वपास ए…
…ाण ठेवणें किंवा शेताची परंतु आ…

खालीं बेजार झाले आहेत. कित्येक ठिकाणीं दंगे होऊन मजूर लोकनायकांच्या शिरत्राणीस जुमानीनातसे झाले आहेत. कोळशांचा पुरवठा कारखान्यांना कसा होईल या विवंचनेंत कारखानदार लोक आहेत. खाणींतल्या मजुरांनीं संप केल्यावर कोळसा कसा मिळणार ? आणि कोळसा नाहीं ह्मणजे कारखाने, गिरण्या, सगळ्या बंद पडणार, शहरांतून दिवेसुद्धां लागावयाचे नाहींत, सर्वत्र अंधार होईल, थंडीच्या दिवसात शेकण्यास न मिळाल्यामूळें हजारों लोक थंडीनें कुडकुडून मरणार, आणी एकंदर सर्व प्रकारें अनर्थ होणार अशी अत्यंत भयप्रद भविष्यें लोक वर्तवूं लागलें आहेत. कित्येकांना असा भरंवसा वाटत आहे कीं इंग्लंडावर अशी भयंकर ग्रहदशा आलीच तर जर्मनी किंवा अमेरीका या देशांतून कोळशाचा पुरवठा इंग्लंडला होईल. पण हा निव्वळ भ्रम आहे, जर्मनी व अमेरिका यांना इंग्लंडची दुःस्थिती पाहून गंमत वाटेल व ते लोक मदत न करतां कुचेष्टा मात्र करतील असें दुसऱ्या कित्येकांचें ह्मणणें आहे. सारांश, इंग्लंडांतल्या सध्याच्या प्रधानमंडळावर सर्व बाजूंनीं मोठें काहूर आलेले आहेत, आणि अशा आणीबाणीच्या प्रसंगांतून देशाच्या राज्यकारभाराचें तारूं पैलतिराला सुखरूपपणें नेण्याचें कितीसें सामर्थ्य त्या प्रधानमंडळाचे अंगीं आहे याची ही परीक्षेचीच वेळ आहे असें सर्वजण ह्मणत आहेत.

---

## धंदेशिक्षणाच्या शाळा.

### (आमचें उमरावतीचें टेकनिकल इन्स्टिटयूट)

हिंदुस्थानचा तरणोपाय आतां उद्योगधंद्यांची वाढ हाच आहे. ही गोष्ट इतकी निर्विवाद आहे कीं ती सिद्ध करून दाखविण्याचें आतां प्रयोजन उरलें नाहीं. सरकारी अधिकारी व लोकांचे पुढारी या दोघांचें-ही या बाबतींत एक मत आहे आणि उद्योगधंद्यांचें शिक्षण देणाऱ्या शाळा प्रांतोप्रांतीं काढण्याच्या तजविजी सुरू आहेत. मुंबईच्या टेकनिकल इन्स्टिटयूटमध्यें दरवर्षी कांहीं तरी नवी सुधारणा करून त्या संस्थेची वाढ करण्यात येत आहे. त्या संस्थेला जोडून विणकामाचे वर्ग काढण्याचें नुकतेंच ठरलें आहे. संयुक्त प्रांतांत अशीच एक संस्था स्थापण्याची तजविज सुरू आहे. बंगालमध्यें राष्ट्रीय कॉलेजला जोडून टेकनिकल विषयांचें शिक्षण देण्यांत येत असतें. इतर प्रांतांच्या मानानें उद्योग धंद्यांच्या बाबतींत मध्यप्रांत व वऱ्हाड हे प्रांत बरेच पुढें आहेत. या प्रांतांत कापसाच्या, कापडाच्या व तेलाच्या गिरण्या आहेत. आगकाड्यांचाही कारखाना कांहीं दिवस चालला होता. परलोकवासी मि० टाटा यांच्या धाडसी उद्योगाचें स्मारक ह्मणून कालीमाती येथें लोखंडाचा प्रचंड कारखाना आहे. इतक्या सर्व उद्योगांचें केंद्र असा जो हा प्रांत त्याच्या मानानें मोठें असें औद्योगिक शिक्षणाचें एकही विद्यालय नसावें ही गोष्ट प्रथम दर्शनी मोठी शोचनीय वाटते, आणि सरकार व लोकांचे पुढारी हे आपापल्या कर्तव्यांत असावेत तितके तत्पर नसावेत अशी ही शंका येते. पण तशी समजूत होऊं देणें ह्मणजे त्यांच्या संबंधानें अन्याय करणें होय. नागपूर येथें एक व उमरावती येथें एक अशी दोन टेकनिकल स्कुलें या प्रांतांत आहेत. हीं अगदीं अल्प प्रमाणावर आहेत, त्यांचीं नांवें सुद्धां कोठें ऐकूं येत नाहींत, व त्यांच्या मधून शिकून तयार झालेला छात्रवर्गही मोठा नाहीं, या गोष्टी खऱ्या आहेत, पण याबद्दलचा दोष सरकारी अधिकारी किंवा सदर संस्थेचे चालक यांना लावतां येईल असें आह्मांस वाटत नाहीं. आमच्या प्रांतांत कापसाच्या इतक्या गिरण्या, जिन, प्रेस, वगैरे असून व त्यांची संख्या दरवर्षी वाढत असून मेकॅनिकल इंजिनियरींग किंवा इलेक्ट्रिक इंजिनियरींग या विषयांचें ज्ञान मिळविण्यासाठीं आपल्या मुलांना या शाळांतून पाठविण्याचा विचार आईबापांच्या डोक्यांत येत नाहीं. यामुळें या औद्योगिक शिक्षणाच्या शाळा उन्हाळयांत पाणी आटून शुष्क होत चाललेल्या नदीप्रमाणें किंवा तरुण, सुंदर, व अलंकारांनीं विभूषित पण प्रिय पुरुषानें उपेक्षित अशी झुरणीस लागलेल्या दुर्भागी स्त्रीप्रमाणें क्षीणतनु दिसत आहेत. या संस्थांच्या चालकांजवळ सध्या पुरेसा फंड आहे, लायक शिक्षक आहेत, यंत्रें, पुस्तकें वगैरे शिक्षणाचें साहित्य पुरेसें आहे, विद्यार्थ्यांना उत्तेजन देण्यासाठीं स्कालरशिपा आहेत, पण शिक्षण घेण्यास येणारे या प्रांतांतले विद्यार्थीच नाहींत ! इतर प्रांतातून विशेषतः मुंबई इलाख्यांत धंदे शिक्षण घेण्यासाठीं हपापलेल्या विद्यार्थ्यांची संख्या येवढी मोठी आहे कीं मुंबईचें टेकनिकल इन्स्टिटयूट चांगलें मोठें आहे तरी लवकरच तेथें विद्यार्थ्यांची संख्या मर्यादित करण्याची पाळी येईल कीं काय अशी भीती वाटते, आणि आमच्या उमरावतीच्या टेकनिकल स्कुलाला विद्यार्थ्यांची पुरेशी संख्या न मिळाल्यामुळें एखादे दिवशीं कुलप लावून खिन्न वदनानें आपल्या बंगल्याची वाट धरण्याचा प्रसंग औद्योगिक परिषदेचें सेक्रेटरी ना. रावबहादूर मुधोळकर यांचेवर येईल कीं काय असें अशुभ स्वप्न पडतें. हा प्रकार अत्यंत शोचनीय आणि आमच्या प्रांताच्या हिताच्या दृष्टीनें अत्यंत अनिष्ट आहे यांत शंका नाहीं. अशी स्थिति येण्याला आमच्या लोकांचा हलगर्जीपणा हें तर कारण आहेच. पण थोडासा दोष या संस्थेच्या चालकांकडेसही येतो असें ह्मटल्यावांचून गत्यंतर नाहीं. उमरावतीस ही शाळा स्थापन झाल्यास तीन वर्षें झालीं, या संस्थेचा प्रवेश समारंभ झाला तेव्हां त्या संबंधानें वर्तमान पत्रांच्या द्वारे तिची जी काय माहिती झाली तेवढीच; त्या नंतर तिच्या कामाचे रिपोर्ट लोकांच्या नजरेला आणणें, तिच्या विषयींची माहिती चित्ताकर्षक जाहिरातीच्या, बक्षीस समारंभ सप्रयोग व्याख्यानमाला वगैरेच्या द्वारें प्रसृत करणें वगैरे गोष्टी सदर संस्थेच्या चालकांनीं केलेल्या आह्मांस तरी माहित नाहींत हल्लींच्या काळांत प्रसिद्धीवांचून सफलता नाहीं ही गोष्ट ध्यानांत ठेवून यापुढें तरी त्यांनीं [illegible], नाहीं-पेक्षां केवळ विद्यार्थ्यांच्या अभावी टेकनिकल इन्स्टिटयूट सारख्या सध्यांच्या काळीं अत्यंत अवश्य व उपयुक्त असलेल्या संस्थेला या प्रांताला मुकावें लागेल आणि तसें झाल्यास त्या बद्दचा सगळा दोष सेक्रेटरीच्या माथीं येईल हें त्यांनीं ध्यानांत ठेवावें. असा प्रसंग येणार नाहीं अशी आह्मी आशा करतों.

---

## कापूर

फोर्मोसा, सीलोन युनायटेड स्टेटस, जपान व हिंदुस्थान या देशात कापूराची पैदास विशेषतः होते. तथापि कापराच्या झाडापासून तो काढण्याच्या पद्धतींत शास्त्रीय ज्ञानाच्या साह्यानें सुधारणा करण्याचें श्रेय अमेरिकेनें घेतलें व त्यापासून आपल्या उत्पन्नांत जशी भर टाकली तसें दुसरें कोणीही केलें नाहीं. अमेरिकेंत एक एकर जमिनींत लावलेल्या झाडांपासून सुमारें ८००० रतल कापूर काढतात. अमेरिकन शास्त्रज्ञांची खटपट ही पैदास आणखी वाढविण्याविषयीं चालली आहे. कापूर काढण्याचे कामीं कंडेन्सरचा उपयोग ते करून पाहत आहेत. त्याचप्रमाणें त्या झाडांची चांगली निगा राखण्याचीही त्यांची खटपट आहे. एका शास्त्रज्ञानें अनुभवावरून असा शोध लाविला आहे कीं हीं झाडें उघड्या हवेंत ठेवण्यापेक्षां मोठ्याल्या वृक्षांच्या छायेखालीं किंवा एखाद्या इमारतींत लाविली तर त्यांच्यापासून कापूर अधिक निघतो. अमेरिका या उद्योगांत इतकें लक्ष घालीत आहेसें पाहून जपानी सरकारही सावध झालें आहे आणि त्यांनीं फोर्मोसा बेटांत जमीन मिळवून व तेथील जंगली लोकांना हातीं धरून त्यांचेकडून कापराच्या झाडांची लागवड वाढविण्याचा उद्योग चालविला आहे. जर्मन ईस्ट आफ्रिकेंतही कापराच्या झाडांचीं जंगलें सांपडलीं आहेत त्यामुळें व अलीकडे टर्पेंटाइन नांवाच्या तेलापासून कृत्रिम रीतीनें कापूर तयार होऊं लागल्यापासून कापराचा भाव उतरला आहे, तरी अमेरिका, जर्मन, व जपान हीं राष्ट्रें कापराच्या पैदाशीच्या वाढीसाठीं अतोनात खटपट करीत आहेत आणि त्यांच्या चढाओढीच्या प्रयत्नाखालीं सीलोन व हिंदुस्थान यांचा कापराचा उद्योग बसत चालला आहे. हिंदुस्थानांतून कोणी शास्त्रज्ञ अमेरिकेंत जाऊन व तिकडे शास्त्रीय शिक्षण मिळवून या उद्योगाला ऊर्जितावस्थेला आणील असा रंग तूर्त दिसत नाहीं, ही मोठी खेदाची गोष्ट आहे.

---

# वऱ्हाडवृत्त.

हवामान— गुलाबी थंडी पुनः अनंदवूं पहात आहे. यंदा वृक्ष गलितपर्ण फार लवकर झाले व त्यामुळें नूतन पालवीची शोभा वसंतऋतूला थोडा आगाऊ आणील असें वाटतें. रोगराई विशेष नाहीं.

रा. रा. वामनराव कस्तुरराव मंडलोई … आणि कमिशनर आकोला हे तीन महिन्याच्या रजेवर येत्या सोमवारपासून जाणार आहेत.

सर बेंजामिन राबर्टसन के. सी. एस. आय. यांची रजा आणखी चार महिन्यानीं वाढल्यामुळें मध्यप्रांताच्या चीफ कमिशनरच्या जागीं रा. रा. फॉक्सस्ट्रांग्वें फायनान्स कमिशनर यांस नेमण्यांत आलें पण ते रजेवरून परत येईपर्यंत रा. रा. कामास हेव यांस तूर्तातूर्त चीफ कमिशनरीचे अधिकार दिले आहेत.

रा. रा. काशीनाथ श्रीराम जठार असि. कमिशनर यांस आकोल्यास फॉरेस्ट खात्याकडे स्पेशल ड्युटीवर नेमल्या अन्वयें ते येत्या सोमवारीं दाखल होतील.

---

रा. रा. नारायण काशीनाथ दाते वकील यांच्या मातुश्री कै. गंगाबाई यांनीं आपल्या अंतःकालाच्या समयीं येथील 'श्री राजेश्वरा'च्या मंदिरांत संगमरवरी फर्शी करण्याकारितां १००० रुपये वर्गणी दिली. या थोर व उदार बाईस गेल्या गुरुवारीं रात्रीं वृद्धापकाळीं मुलाबाळाच्या आनंदी गजरात मरण आलें आणि त्यांच्या नश्वर देहाचें सोनें झालें !

आह्मास कळविण्यांस अत्यंत दुःख वाटतें कीं रा. रा. दत्तात्रय बाबाजी रत्नपारखी बी. ए. एल बी. यांस क्षयाच्या रोगानें गेल्या ८ दिवसा पूर्वीं नागपुरास देवाज्ञा झाली. हे गृहस्थ नुकतीच वकीली करूं लागलें होते इतक्यांत त्यांच्या मातुश्रीच्या व तरुण पत्नीच्या दुर्दैवानें त्याच्यावर असें आकाश कोसळलें !

वऱ्हाडचे सुप्रसिद्ध हरिदास रा. रा. कृष्णबोवा पातुरकर यांस गेल्या सोमवारीं सकाळीं काळजाच्या आजारानें न कळत एकाएकीं देवाज्ञा झाली. हे चांगलें विद्वान रसज्ञ व सहृदय हरिदास होते. यांनीं आज ३० वर्षें कीर्तनें करण्यांत घालविलीं. ते लहानपणीं ह्मणजे वयाच्या १६ व्या वर्षींच कीर्तनाला प्रथम उभे राहिले आणि त्यांच्या त्या पहिल्याच सभेला एवढा रंग आला कीं लोक त्यांस 'बाल हरिदास' असें संबोधीत असत. त्यांनीं आपल्या तीर्थरूपांच्या हाताखालीं उत्कृष्ट अध्ययन केलें. तीव्र व कुशाग्र बुद्धि, मधुर व गोड ध्वनि, दीर्घ व्यासंगाचा बहुश्रुतपणा यांनीं त्यांच्या कथा अत्यंत प्रेमळ, विनोदी व हृदयंगम होत असत. त्यांचा स्वभाव आनंदी असे आणि त्यांनीं धनदौलत पुष्कळ संपादन केली. त्यांचें श्रेष्ठ ध्येय दोन स्वकीय देवस्थानें चालविणें हें होतें आणि त्या प्रीत्यर्थ त्यांनीं स्वतांस पाहून घेतलें होतें. या अर्पणबुद्धीमुळें त्यांच्या संभाषणांत देखील सहजी मोहकपणा वाटत असें आमचे वेदमूर्ती कृष्णबोवा कीर्तनास उभे राहिले ह्मणजे भव्य देवालयें देखील श्रोत्यांनीं गजबजून जात असत. त्यांच्या वाणीमध्यें विलक्षण गोडी वाटे आणि तसाच सरस्वतीचा प्रभाव तेथें होता ! त्यांचें आयुष्यच ईश्वरभजनात गेलें तेव्हां दीव्य दृष्टीपुढें उत्तम लोकचीं राज्यें उभीं आहेत हें निराळें कां सांगावें.

## नोटीस

मारोती वा। भि... माळी पळशीबुनरुख यांस:

मी खाली सही ... यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं मी तुझाला माझे शेत सर्वे नं ८० पैकी १ व स० नं ८० पैकी ३ मौजे पळशीबुनरुख व खुली जागा मौजे पळशीबुनरुख येथील तुह्मास मी अंदाजा ८।९ महिने झाले २००० दोन हजार रुपयास खरेदी दिली होती व रजिस्टर करुनही दिली आहे. पण इस्टेट तुमच्या ताब्यांत दिली नाहीं. कारण ज्यावेळीं रजिस्टर केलें त्यावेळीं मी रक्कम भरुन पावलो ह्मणून सांगितलें कारण तुमचा आमचा घरोबा होता. पण आपला करार असा झाला होता कीं दोन हजारापैकीं १००० केळीवेळीच्या सावकारास १००० घरीं देईन ह्मणून सांगितलें. पण मी तुह्मास बरेच वेळां पैसे मागितले पण थापा देता या वरुन तुमच्या मनांत बदी आहेस दिसतें. सबब नोटीस देण्यांत येतें कीं ज्या अर्थी तुह्मी मला अजून भरणा दिला नाहीं त्या अर्थी ती खरेदी पोकळ असे. आजपर्यंत मी ताबाही दिला नाहीं व पुढें देणारही नाहीं. उगीच त्रास देण्याच्या इराद्यानें कांहीं व्यत्यय आणल्यास योग्य तजवीज करणें भाग पडेल कळावें. ता० २७-१-१९१२

सही

यादो वा। खुशाल पाटील राहणार पळशीबुनरुख

नं० नं० ६८

## नोटीस

रा० रामचंद्र गंभीरजी रा० हैसांग ता० व० जि० आकोला

यांस:-

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं. मौजे हैसांग येथील माझे पुर्ण मालकीचें शेत सर्वे नं. २१३ एकर गुंठे ५।६ आकार रुपये ११ हे शेत मी शेठ शिवनारायण मोहनलाल दुकान हैसांग यास ता. १०-१-१२ रोजीं खरेदी दिलें. मी खरेदीखत नोंदुन आल्यावर मनजवळून एक आण्याच्या तिकीटावर मागील तारीख घालून तेंच शेत खरेदी करुन देण्याचा पोकळ करार लिहून घेतला. त्यावेळीं मी आपल्या थारेंत येऊन चिठीही लिहून दिली. पण या नोटिशीनें कळवितों कीं मी शेठ शिवनारायण मोहनलाल यास लिहून दिलेली खरेदी खरी आहे. तुह्मी जो कागद लिहून घेतला तो पोकळ असल्यामुळें खोटा आहे. सबब रद असे. त्या कागदावरुन तुह्मी आपला कांहीं हक्क सांगू नये. सांगितल्यास तो पोकळ असे. कळावें. ता० २६-१-१२

सही

मारोती वा। धनाजी हाते रा. हैसांग द० खु०

नं० नं० ६९

## नोटीस.

विद्यमान म्युनिसिपाल कमेटी आकोट.

सदरहू नोटीशीनें सर्वत्र शहरवासी लोकांस कळविण्यांत येतें कीं तारीख १७।११।१२ ईसवी रोजीं स्पेशल मिटिंग भरली त्या वेळीं ठराव नंबर ४ मध्यें आकोट म्यु० कमेटीचें हद्दींत वऱ्हाड म्यु० कायद्यांचे कलम ४१ (१) (अ) (सी) सन १८८६ अन्वयें जीं वहानें अगर जनावरें ज्यांचा उपयोग बसण्याच्या कडेस अगर ओझे वाहून नेण्याकडेस केला जातो अशी वाहनें जनावरें व म्यु० हद्दींत जी पाळीव कुत्रीं असतील यावर कर बसविण्याबाबत खालील नियमाप्रमाणें (ठराव) पास करण्यांत आले आहे. नियमाची नकल या सोबत दिली आहे.

ज्या कोणत्याही वाहनाची सदरील कराच्या सुचनेस आपली लेखी हरकत अगर सुचना असल्यास नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याचे आंत कमेटी कडेस पाठवावी आणि कमेटीची मुदत संपल्या नंतर सदरहू हरकती अर्ज व सुचना याजबद्दल स्पेशल मिटिंग भरल्या वेळीं अखेर निकाल होऊन वरीष्ट अधिकारी वर्गाकडेस मंजुरी करितां पाठविले जातील तारीख २०।१।१२

सही

व्हाईसचेअरमन म्यु० कमेटी आकोट.

### प्रपोजल.

सदरहू आकोट म्युनिसिपाल कमेटीचें हद्दीतील सर्व वहानें, जनावरें (ज्यांचा उपयोग बसण्याकडेस, ओझें वाहून नेण्याकडेस केला जातो) व पाळीव कुत्रे यांजवर खालील सहामाही दराप्रमाणें तारीख १ माहे एप्रिल सन १९१२ पासून बसविला जाईल.

| | रु. | आ. | पै. |
|---|---|---|---|
| १ प्रत्येक चारचाकी गाडीवर | २ | ० | ० |
| २ प्रत्येक दोनचाकी गाडीवर | १ | ० | ० |
| ३ प्रत्येक हत्ती किंवा उंट | २ | ० | ० |
| ४ प्र० घोडा, तट्टू, बैल, रेडा | ० | ८ | ० |
| ५ प्र० गाढव अगर कुत्रे | ० | ४ | ० |

सही

आकोट तारीख २०।१।१२ } D. M. Hingme. व्हाईसचेअरमन.

नं० नं० ७०

## जाहिर नोटीस

गंगाई मर्द रामू पाटील राहणार आकोला आगरवेस माळीपुरा इस आणि सर्वत्र लोक यांस:—

तुकाराम वलद नारायण पाटील हल्लीं राहणार आलेगाव तालुके बाळापूर यांजकडून कळविण्यात येतें कीं गंगाईचा नवरा रामु पाटील हा माझा साक्षात चुलता होता त्यास मयत होण्यास सुमारें एक वर्ष होत आलें त्याला लोकाचें कर्ज मुळींच देणें नव्हतें त्याची आकोले येथील दोन शेतें शेत सर्वे नंबर १०९ एकर १९ गुंठे ११ आकार रुपये २९ शेत सर्वे नंबर ९८ एकर २१ आकार रुपये ३४ पैकीं १ नंबर ९८ चे खातें गंगाईचे नांवें लागलें. या शेतांत ह्मणजे सर्वे नंबर १०९ यांत निम्मा हिस्सा व शेत सर्वे नंबर ९८ यांत पाव हिस्सा ह्या प्रमाणें गंगाईचे हिस्से असून तिला फक्त तिचे हयाती पर्यंत त्याचें उत्पन्नमात्र खाणें या पलीकडे कांहीं हक्क नाहीं. तिचे पश्चात् सदरहू शेताचा वारस मजकडेच येणार आहे शेतांचें उत्पन्न दरसाल सारा जाता सुमारें १२५ रुपयाचें असल्यानें तिला कोणाचें कर्ज काढून गहाण ठेवणें किंवा शेताची विक्री करणें याची अवश्यकता नसतां मला बुडविण्याचे इरादानें ती वरील शेतें कोणास गहाण अगर खरेदी देऊन दुसरीकडे जाण्याचे विचारांत आहे. यासाठीं या नोटीशीच्या द्वारें गंगाईस कळवून सर्वत्र प्रसिद्ध केलें जातें कीं सदरहू शेता संबधानें गंगाई इच्याशीं कोणी गहाण, खरेदी, बक्षीस किंवा लावणीचे पट्याचा व्यवहार करूं नये. केल्यास त्यादी जबाबदारी त्यांजवर राहून त्या बद्दलची नुकसानी व खर्च त्यास सोसावा लागेल कळावें ता. ३०।१।१२ ई०

सही

तुकाराम वलद नारायण याची निशाणी रेघ.—

नं० नं० ७१

## नोटीस

रा० रामा आकाजी गोंधळी व सुपडी मर्द आकाजी रा० कारंजा ता० मुर्तिजापूर यांस:—

खालीं सही करणार ईजकडून नोटीस देण्यांत येतें कीं माझ्याशीं तुमशी लग्न होऊन सुमारें १२ वर्षे झालीं असून हल्लीं मी वयात आल्यास सुमारें ४ वर्षे झाली असून जेव्हां मी शहाणी झालें तेव्हां माझे बापानीं तुमचे घरीं आणून घातले होतें त्या वेळीं मी तुमचे येथें ६ महिने राहिले होते तेव्हां तुह्मी संसारास लायक नाहींत अशी माझी खात्री झाली व तुह्मी मजला मार हाण करुन बापाचें घरीं हाणून दिलें त्यास सुमारें ३॥ वर्षे झालीं मी आपले बापाचे घरीं राहात असून बापाची गरीबी अवस्थावरुन मजला लोकाचें कर्ज काढुन निर्वाह करावा लागला. त्यामुळें मजला १५० दीडशें रुपये देणें झालें आहे. करितां नोटिशीनें कळविलें जातें कीं तुमची प्रकृती प्रपंच करण्यासारखी झाली असल्यास वरील कर्ज देऊन तुह्मी मजला नोटीस पावले दिवसांपासून १५ दिवसांचे आत घेऊन जावें असें तुह्मी न केल्यास हीच फारखत समजून मी दुसरा घरठाव करीन मग तुमचा मजवर नवरे पणाचा हक्क राहणार नाहीं ता० ३०।१।१२ इ.

दस्तुर— विष्णु माधव फडके राहणार आकोला.

सही

चद्रभागा मर्द रामा गोंधळी राहाणार कोळंबी ता० आकोला इचा आंगठा उमटा.

शंकर बलद गणु गोंधळी नि० हातची तुकाराम वलद लक्षमण द० खु०

नं० नं० ७२

## नोटिस

नोटीस बेनामी— आकाजी वलद नागो उन्हाळे राहणार पातुर्डे ता० मलकापूर जि० बुलढाणा यांस:—

खालीं सही करणार यांजकडून या नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं आज सरासरी १२।१३ वर्षे झालीं आपले मुलीशीं माझे लग्न झालें तेव्हां पासून आजी दर वर्षास एक दोन वेळां नेण्यास येत असतो परंतु आपण पाठवितच नाहीं तरी याबद्दल आपण खाण्याचा खर्च मागाल तो मी मुळींच देणार नाहीं. माहे फेब्रुवारी सन १९१२ च अखेर पावेतों आपण कां पाठवीत नाहीं याचा जबाब यावा. नाहीं तर स्वत माझे घरीं वरील मदतींत आणून घालावी. जर असें न झालें तर पुढें मी कोणतीही सबब न ऐकता जबरीनें हात धरून नेईन कोणी मज्ज्ञाव केल्यास त्यावर फौजदारी केली जाईल आज पासून माझी पत्नी कोठें गेली तर याबद्दल आपणास जबाबदार धरलें जाईल. वरील इसमाची कन्या दोणीच आपले घरीं नकूं नये नेण्यास चोरी मुकदमा केला जाईल. तरी वरील मुदतींत आणून घालावें हातानीं फजीती करूं नये कळावें. ता० ३०-१-१२ इ०

सही

विठ्ठलराव वहादूरजी मोरे हेड मास्तर म. शाळा वडी ता. मलकापूर जि. बुलढाणा पो. नांदुरा.

नं. नं. ७३

## नोटीस.

रा० रा० नारायण कृष्णाजी देशमुख कारभारी पाटील मौजे वसाडी खुर्द तालुके मलकापूर यांस:—

नोटीस देणार जयवंतराव पांडुरंग देशमुख राहणार वसाडी खुर्द तालुके मलकापूर जि. बुलढाणा. नोटीस देतो तुमचे मौजे वसाडीखुर्द तालुके मलकापूर जिल्हा बुलढाणा येथील शेत सर्वे नंबर ४३ एकर १४ गुंठे २२ आकार रुपये २९ खाते खुद्द तुमचे नावे आहे हें संबंध शेत तुह्मी आह्मांस रक्कम रुपये ५७५० अक्षरी-सत्तावनशें पन्नास रुपयांस खरेदी देण्याचा सवदा करून तारीख २२ माहे जानेवारी सन १९१२ इसवी रोजीं बयाण्याबद्दल रुपये २० अक्षरी वीस रुपये चार पंचासमक्ष तुह्मास दिले आहेत बाकीचे रुपये विद्यमान सबरजिस्टर साहेब यांचे समोर घेऊन खरेदीखत आठ दिवसांत करुन देण्याचे तुह्मी कबूल केलें आहे. त्याप्रमाणें मी सदर्हू रक्कम तुह्मास देण्यास सावकारापासून आणली आहे ती तुह्मी घेऊन मुदतींत खरेदीखत करून द्यावें. तसें तुह्मी न केल्यास मी कोणतेही प्रकारचा जबाबदार नसून सर्व प्रकारें तुह्मी जबाबदार राहाल व सवदा प्रमाणें खरेदीखत कोर्टमार्फत दावा करून घेतलें जाईल व त्यास जो खर्च लागेल तोही भरून घेतला जाईल. करितां या नोटीशीनें अगाऊ कळविलें आहे. तुह्मास पोष्टमार्फत रजिस्टर नोटीस तारीख २६।१।१२ रोजीं पाठविली ती तुह्मी वापस केली आहे. सबब पुन्हा नोटीस देऊन तुह्मास सूचना केली आहे कळावें तारीख १।२।१२ इसवी.

सही

जयवंतराव पांडुरंग देशमुख दस्तुर खुद्द मुक्काम आकोला.

नं० नं० ७४

## जाहिर नोटीस

तमाम लोकांस आणि नथु वा जयराम कुणबी रा. पाथर्डी ता० आकोट

यांस.-

नोटीस देणार मंजाई मर्द तुकाराम कुणबी तर्फे वकील दत्तात्रय विनायक गाडगीळ या नोटीशीनें नोटीस देतो कीं आमचे पक्षकार मंजाइ हिनें वरील नथुस वि. आ. सबजज्ज कोर्ट आकोला यांतील मु. नं. ४२ सन १९१० हा तिचे तर्फे चालविण्यासाठीं जें मुकत्यारपत्र दिलें आहे व तिनें त्यास तिचे तर्फे इतर कामें करण्यासाठीं जे कुलमुखत्यारपत्र दिले आहे तें आजपासून रद्द केलें आहे. सदर्हु नथुस आता आमचे पक्षकारातर्फे कोणतेंही काम करण्यास अधिकार नाहीं. वरून तो आमचे बदल ह्मणून जो जो व्यवहार करील तो सर्व बिनअधिकाराचा असून त्याजबद्दल आमचे पक्षकार मंजाई ही मुळींच जबाबदार नाहीं. कळावें ता. ३१-१-१२ इ.

सही

मंजाई मर्द तुकाराम तर्फे वकील
दत्तात्रय विनायक गाडगिळ
आकोला

नो. नं: ७५

## नोटीस

नोटीस देणार लक्ष्मण विठोबा पंधे राहणार मौजे भांव तालुके मूर्तिजापूर जिल्हा आकोला

यांजकडून

नोटीस देण्यांत येते कीं माझी चुलती नामे संती उर्फ लक्ष्मी मर्द गणाजी पंधे राहणार भांव ही असून माझे वडिलोपार्जितची जमीन शेत सर्वे नं. ६६, ६४, २१३, २२० यांतील पाव हिस्सा व ११ पैकीं अर्धा हिस्सा व ११ पैकीं ८२४ गुंटे एकूण नंबर ५ आहेत. त्यांत इची फक्त खाण्यापिण्याची मालकी आहे व त्याला माझी मनाई नाहीं परंतु इजला विकण्याची मनाई आहे. इनें सर्वे नं. ६६।६४ यांतील पाव हिस्सा खरेदी दिला आहे व त्याजबद्दल रु. २०० घेतले आहेत. तरी तुह्मांस खरदी देण्याचा हक्क नसून माझे मालकीचें शेत तुह्मी खरेदी कंडू वा मुदगल मुदे यांस दिलें आहे ते रुपये मी वारस या नात्यानें भरण्यास कबूल आहे. तरी आपण आपसांत तडजोड करावी यापुढें आपण जर आणखी कांहीं कराल तर तें रद्द समजलें जाईल. व तुमची कोणतेच प्रकारें सबब ऐकली जाणार नाहीं तरी नोटीस पावल्यापासून १५ दिवसांचे आंत नोटीशीची समज घ्यावी व त्याबद्दल आपला विचार कळवावा कळावे तारिख ३१।१।१२ इ.

सही

लक्ष्मण विठोबा पंधे रा. मौजे
भांव ता० मूर्तिजापूर जि०
आकोला

नो. नं. ४२ ७६

## नोटीस

वि सबजज्ज साहेब बहादूर आकोला
यांचे कोर्ट

सक्सेशन सर्टिफीकीट नंबर २६ सन ११
सक्सेशन सर्टिफीकीट मिळण्याचा अर्ज
अर्जदार

रत्नाबाई जवजे पन्नालाल जात मारवाडी राहणार येकलार ता० आकोला.

सर्व लोकांस कळविण्यांत येते कीं अर्जदार यानें सक्सेशन सर्टिफीकीट मिळण्याबद्दल दिलेला अर्ज आमचे कोर्टांत तारीख २६।२।१९१२ रोजीं नेमिला आहे त्यातारखेस ज्यांची कांहीं तक्रार असेल त्यानीं सकाळीं १० वाजता आमचे कोर्टांत हजर व्हावे तसें न केल्यास पुढें कोणत्याच प्रकारची तक्रार ऐकली जाणार नाहीं. कळावें ता. २९।१।१२ इ.

Jankiprsad.
SubJudge.

नो. नं. ७७

## नोटीस

नोटीस बेशमी गंगाराम वलद दादूजी जाते काळी पाटील राहणार गामे आपोती ता० व जि० आकोला

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं माझा बाप उकर्डा व तुमचा बाप दादूजी हे चुलत भाऊ होते माझे बापाचा बाप हिरागी व तुमचे बापाचा बाप उदेभान हे मोगलाइपासून निराळे होते व माझे आज्यानें निराळेपणांत राहून जमीन कमाविली व तो जीवंत असेपर्यंत त्यानीं वाहून उपभोग घेतला व तो मेल्यानंतर जमीन माझे बापाचे नांवे लागुन त्यानीं उपभोग घेतला माझा बाप उकर्डा हा मेल्यानंतर वारस नात्यांनीं मौजे आपोती तालुके आकोला येथील सर्वे नंबर ४६ एकर गुंठ २६.२६ आकार रुपये ६० चे खाते माझे नांवे लागुन शेताचा उपभोग मी घेत आले सदर्हू शेती तुह्मांस स्वामीत्वानें लाविले आहे त्याप्रमाणें सदर्हू शेताचे स्वामीत्व तुह्मी देत आला हल्ली सन १३१९-२०-२१ या तीन साळाचे स्वामीत्वाची रक्कम दर साल रुपये ३०० प्रमाणें तीन वर्षीचे रुपये ९०० तुह्मी देतो देतो ह्मणून आजपर्यंत मला चाळविले परंतु दिले नाहीं करितां या नोटीशीनें तुह्मास कळविण्यांत येते कीं ही नोटिस पावल्यापासून आठ दिवसाचे आंत तुह्मी मालकीचे रुपये ९०० घरीं आणून घ्यावे व शेत वाहूं नये शेत जबरीनें वाहिल्यास मी शेत ताब्यांत मिळण्याबद्दल कोर्टांत दावा करून शेत ताब्यांत घेईन व मालकीचे रुपयेहि फिर्याद करून भरून घेईन ही नोटीस दिली कळावें ता. २६-१-१२ इ.

सही

काशी मर्द पीराजी कोळी इचे
हातचा आंगठा

नो. नं. ७८

## दिल्ली दरबार.

मानपत्राचें उत्तर देतानां "हिंदुस्थानची एक सारखी प्रगति होत जावी ही आपली उत्कट इच्छा आहे" असें बादशहानीं ह्मटलें. हिंदुस्थानांत शेंकडा ८० ऐशीं लोक शेतकीवर निर्वाह करितात. तेव्हां त्यांच्या मध्यें अगोदर प्रगति झाली पाहिजे. त्यांची प्रगति होण्यास शेती सुधारली पाहिजे. शेती सुधारण्यास सुधारलेल्या आउतांचा जास्त जास्त प्रसार झाला पाहिजे

हें ... ही सुधारलेली
शेतक... लोखंडी नांगर
कड... मोटेचीं चाकें, वगैरे
वगैरे ...म आह्मी करीत
आहों ... यंत्र आमच्या कडूनच
मागवा. क्याटलाग मागवा.

किर्लोस्करबंधु.
पोष्ट किर्लोस्करवाडी (सं० औंध
जिल्हा सातारा).

नो० नं० १२

ठिक ठिकाणी एर्जटस् पाहिजेत.

# सन लाइफ अशुअरन्स कंपनी
# ऑफ कानडा

[ १८६५ ]

इंग्लिश सरकारची सत्ता देखरेख सरकारी हुकुमाशिवाय भांडवल गुंतवता येत नाहीं.

**भांडवल तेरा कोटी रुपये.**

पॉलिसीचे नमूने फारच सुधारलेले आहेत.

पालिसी .... .... .... .... .... .... बिन अटीच्या.
पॉलिसी .... .... ... .. .... .... बिन तक्रारी.
पॉलिसी .... .... ... .... .... .... बिन बुडणारी.

हिंदुस्थनचे मुख्य ऑफिस, हार्नबी रोड मुंबई. } व्य. श्री मुधोळकर मध्यप्रांताचे वऱ्हाडचे जनरल एजंट अकोला ' प्रांतवऱ्हाड नो. नं. १३

# Oriental Govrnment security
# LIFE ASSURANCE COMPANY
## Limited

ESTABLISHED IN 1874.
R. Paterson, Brown, Manager,
HEAD OFFICE—BOMBAY

## FUNDS Exceed 4 crores

CLAIMS PAID FOR OVER 3 CRORES
IMMEDIATE SETTLEMENT OF CLAIMS

If there be one thing of more importance than another in connection with Life Assurance, it is when claims arise, that the amount due under the policy be paid to the Claimants at the earliest possible date. This the Directors of the 'Oriental' keep well before them and act in treating the clients with the utmost liberality.

UNQUESTIONABLE SECURITY.

It is not sufficient to read that a Company's funds amount to a given sum, but it is essential to know how such Funds are invested if in miscellaneous and risky investments or how secured.

The Funds of the 'Oriental' are invested in Government Securities and lodged with the Government Official Trustee of Bombay in terms the Company's Trust Deed, as Security for Claims arising, through decease of assured lives, and endowment policies matured.

Government Officers, Professional men, Tradesmen and others by employing portion of their annual income or profits in effecting life policies, at once create a fund equivalent to the savings of many years.

No man can be sure how long he will live. and although he may save money yet, if he dies early before he had time to save much, his wife and family may be in distress. Life Assurance is a means by which his danger is got over. Life being so uncertain, the sooner a man make up his mind to assure his life the better. Once satisfied of the propriety of the step, do not delay. There are numerous instances in the records of the Oriental' where the delay of a month or less, has left the family without the intended provision.

INFLUENTIAL AND ENERGETIC AGENTS WANTED. For term please apply to the undersigned.

Prospectuses, forms and any further information can be obtained on application

M. DESOUZA.
CHIEF AGENT, Nagpur

CHIEF AGENCY FOR C. P., BERAR & KHANDESH No. No. 14

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवआश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

डसमा[illegible]

*Registered No. N. N4*

# व[illegible]हाडसमाचार.

**Berar Samachar.**

वर्ष ४६ ] आकोला—सोमवार तारीख १२ माहे फेब्रुवारी सन १९१२ ई० [ अंक ७

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाउच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

## नोटिशीचें दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सुचनाः— गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील यापुढें येणाऱ्या नोटिसास स्पेशल चार्ज पडेल

### जाहिरात

**मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.**

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटींवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेव[illegible]

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा त्यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।९।०९ } G. A. Phillips. एजंट
नं १

## मुंबई बँकचें सोनें.

मुंबई बँकचा छाप असलेल्या उत्तम कसाच्या सोन्याच्या चिपा मुंबई बँकच्या आकोले व उमरावती येथील ऑफिसांत विकत मिळतील. गिऱ्हाइकानें जास्त माहिती करितां बँकेंत तपास करावा.

एका चिपचें वजन २६$\frac{३}{४}$ तोळे असतें. साधारण भाव वऱ्हाड समाचार वर्तमानपत्रांत बाजारभाव ह्या सदराखालीं सांपडेल.

मुंबई बँक आकोला २१-९-१० } G. A. PHILLIPS. एजंट
नो० नं० २

## चांदीचीं भांडीं.

### खरें सचोटीचें दुकान.

आमचें दुकानीं शुद्ध चिनई चांदीचीं सर्व प्रकारचीं सुबक व घाटदार भांडीं विक्रीस तयार असतात. माल काळजीपूर्वक वक्तशीर व्ही. पी. नें पाठवूं. मालाचे खरेपणाबद्दल जोखिमदार राहूं. एकवार अनुभव घ्यावा.

पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन.
३ आदितवारपेठ, नासिक

श्री राधावल्लभाजयति

### वर्षफल ।

हमारे पास सिर्फ १ पोस्टकार्ड पर किसी फल या फूल का नाम लिख भेजो हम आप के एक वर्ष का सुख, दुःख क्षोभ, हानि जीवन मरण, रोग, सन्तान तरेक्की, मौकूफी, व्यापार में किस वस्तु स लाभ होगा दिसावरी काम में कैसा लाभ होगा और जो महीना हानिकारक उस का उपाय महीनेवार वर्षफल व्ही० पी० द्वारा २। रुपये में भेज देंगे. हमारे यहां कई पत्रादि उत्तमोत्तम बनते है अनेक प्रशंसा पत्र मौजूद है, विशेष परिचय के अर्थ [illegible] का [illegible] भेज कर सूचीपत्र मंगा लीजिये.

मिलने का पत्ताः—
गोस्वामी राधामोहन शर्म्मा
नं ४ चित्तीखाना आगरा.

### जाहिर नोटीस.

सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं मुक्काम आकोला, प्रांत वऱ्हाड, येथें आमचे वडील कै० कृष्णाजी दिनकर, एंजिनियर, यांनीं संपादन केलेले व हल्लीं आमच्या मालकीचें घर, इमला व खुली जागा यासुद्धां, विकावयाचें आहे. हें घर आकोला येथें गांवांत जुम्मामशीदी नजीक आहे सदरील घराचे तीन चार सोयीवार पृथक् भाग होण्यासारखें आहेत. यापैकीं एक अगर अधिक भाग अथवा संबंध वाडा विकत घेण्याची ज्यांची इच्छा असेल त्यांनीं खालीं सही करणार यांजकडे खालीं दिलल्या पत्त्यावर किंवा रा० रा० नारायण खंडेराव फडके वकील, मुक्काम आकोला, यांजकडे किंवा रा० रा० लक्ष्मण जयराम हातवळणे आगरवेशी ज[illegible] मुकुंद बाळकृष्ण यांचा वाडा, मुक्काम आकोला, यांजकडे समक्ष अगर पत्रद्वारें कळवावें, म्हणजे किंमती वगैरे बद्दल खुलासा केला जाईल. व लागेल ती इतर माहिती देण्यांत येईल.

सही

काळू कृष्ण सहस्रबुद्धे मुक्काम पुणें, पेठ नारायण, घर नंबर ३४८
तारीख १७ माहे डिसेंबर सन १९११
नो० नं० ५

### श्री राजेश्वर इमारत खातें.

माहे ज्यानेवारी महिन्यांतील जमाखर्चाचा तपशिल

जमा

३३०॥।॥ मागील शिल्लक
७ ता. १०।१।१२
 ५ हरिरामचंद्र रोहिणखेडकर
 २ मोरेश्वर भिकाजी सावरकर
१५ ता. १५।१।१२
 १५ विनायक कृष्ण राजवाडे वकील
१० ता. १८।१।१२
 १० अनंत सखाराम आठले वकील
३५ ता. २१।१।१२
 १० विष्णू दामोदर भट वकील
 २५ हणमंत रावजी खानझोडे वकील
१२५ ता. २४।१।१२
 ५० के. इ. संजाना वकील
 ५० रा. केशव गोविंद दामले वकील
 २५ विष्णु बाळकृष्ण मराठे वकील
३१ ता. २८।१।१२
 ३१ [illegible]
 २२३

५९३॥।॥

नांवें

३९॥=। ता. ७।१।१२ इ.
 २।[illegible] चुन्यांचे भट्टी करितां गोवऱ्या
 ३७॥=। मजुरी गिलावा करण्या बद्दल
 ३९॥=।
।-। ता. १२।१।१२
 ।-। रंगाचें कामाकरितां कि. खर्च
॥-। ता. १७।१।१।१२
 ॥-। रंगाकरितां नारळ १
८४॥=। ता. १८।१।१२
 ५० मुकुंदलाल यांस जागेबद्दल
 ॥-। रंगाकरितां नारळ १
 ३४॥- मजूरी बद्दल ता० १४।१।१२ इ. हप्याबद्दल
२३॥।=। ।१।१२
 २३॥।=। मजूरी ता. २१।१।१२ इ० हप्त्याबद्दल
१०० ता. २४।१।१२
 १०० स्टॉडले यांस रोख नगदी दरवाज्या पैकीं,
१॥ ता २६।१।१२
 १॥ गोवऱ्या चुन्याचे भट्टीकरितां ४०० दर ।= आणें
२॥ ता. २७।१।१२
 २॥ तांगाभाडे वर्गणी वसूल करण्या करितां
२६॥.॥। ता. २८।१।१२
 २६॥.॥। मजुरी गवंड्याबद्दल
४।= ता. २९-१-१२
 ४।= खिळे ४ रु. व रस्सी ।= आ.
२८३
२७०॥।॥ शिल्लक

५९३॥।०॥

दोनशे सत्तर साडेबारा आणे जोगळेकर आणि कंपनी लिमिटेडचे ऑफिसमध्यें शिल्लक ता. १।२।१२ इ.

नारायण काशिनाथ दाते
परशराम चिंतमण जोगळेकर
व्यवस्थापक
श्री राजेश्वर कमेटी आकोला.

### जाहिरात

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येतें श्री राजेश्वर संस्थानची वर्गणी जमाविण्या करितां रा० रा० गणेश विष्णू खरे पेन्शनर यांची ऑनररी नेमणूक केली आहे. त्यांनीं संस्थानचें सेक्रेटरी गोपाळ हरी सावरकर यांणपासून [illegible] नावांची रसिद बुकें [illegible] लोकांनीं धार्मिक संस्थेस मदत देण्यांची संधी फुकट दवडवूं नये. जिर्णोद्धाराचें काम सूरू आहे. त्या कामाला पैशाची फारच जरूर आहे.

नारायण काशीनाथ दाते
चेअरमन.
श्री राजेश्वर कमेटी. आकोला.

### नोटीस

नोटीस बेशमी लहमी मर्द पुरन्या महार व तानकी मर्द मंगु महार रा० उभयतां काळेगांव यांनाः—

खालीं सह्या करणार यांजकडून नोटीस देण्यांत येतें कीं तुह्मी उभयतां माझ्या सख्या चुलत्या असून पुरन्या हा आमचा चुलता मयत होण्यास सरासरी १८ वर्षे झाले व मंगु याला मरण्यास अंदाज दोन वर्षे झाले ते जिवंत असतांना वडिलोपार्जित शेती ही सर्वेनंबर मिळून वाहून एकत्र राहून खात होतो. आतां ते मयत झाल्यावर त्या शेतीला वारस आह्मी दोघे बंधु आहो. तुमचा अन्नवस्त्राचा हक्क आहे. तर तुह्मी जोपर्यंत हयात आहा तो पर्यंत तुह्मी त्याचा उपभोग घ्यावा. पण कोणास सदर्हु शेती गहाण, खरेदी, बक्षीस, अगर मृत्यूपत्रानें देऊं नये. दिल्यास जो व्यवहार करील तो जबाबदार राहील कळावें. ता० ७।१।१९१२

सही
१ चिंध्या वल्लद साबन्या महार
२ मरज्या वल्लद साबन्या महार.
नो० नं० ८०

वऱ्हाडसमाचार.

माघ वद्य १० शके १८३२ दुंदुभिनाम संवत्सरे

## लुई कुन्हे व त्यांची चिकित्सा पद्धति.

हिंदुस्थानचा पाश्चात्य राष्ट्राशीं जडलेला संबंध अनेक प्रकारें हिंदुस्थानास हितावह झाला आहे ही गोष्ट खरी असली तरी कित्येक बाबतींत तो अनर्थावहही होऊं पाहत आहे ही खेदाची गोष्ट आहे. आमच्या लोकांची पूर्वींची साधी राहणी आणि उन्नत विचार कोणीकडे आणि आतांचे फ्याशनचे चोजले, शरीरास अपाय करणारे आणि अतिशय खर्चाचे प्रकार कोणीकडे जीवनकलह तीव्र करण्यास आमची फ्याशनेबल व अविचार मूलक अनुकरणजन्य राहणी सर्वथा कारण आहे आणि या जीवनकलहाच्या तीव्रतेच्या पाठोपाठ नीतिभ्रष्टता, दुष्टता, लोभ, वगैरे गोष्टी येत आहेत. आमच्या प्राचीन ऋषींच्या राहणीचें सर्वतोपरी पुनरूज्जीवन हल्लींच्या काळीं करा असें आह्मी ह्मणत नाहीं. पण त्यांच्या राहणींतल्या कित्येक अत्यंत हितप्रद आणि सहज करतां येणाऱ्या व्यावहारिक गोष्टी जर आह्मी आचरणांत आणिल्या तर आमच्या पिढीचा सध्या चाललेला शारीरिक, मानसिक व नैतिक ऱ्हास थांबेल यांत शंका नाहीं. आमच्या लोकांना सध्यां औषध सेवनाचें एक वेडच लागून राहिलेलें दिसत आहे. एक आठवडा असा लोटत नाहीं कीं वर्तमानपत्रांत एखाद्या नव्या औषधाच्या कालमच्या कालम लांबरुंद जाहिराती व गुण आल्याचीं सर्टिफिकिटें यांनीं वाचकास दृष्टिशूळ उत्पन्न केला नाहीं. इतकी 'रामबाण' औषधें दररोज निघूनही लोकांचे आरोग्य कितीसें सुधारलें आहे तें दिसतेंच आहे! खरी गोष्ट ही आहे कीं आह्मी दिवसेंदिवस खऱ्या उन्नतीच्या मार्गापासून घसरत दूर जात आहो. पाश्चात्य देशही आमच्या सारखेच प्रथम घसरत गेले, पण आतां ते शुद्धीवर येत चालले आहेत. औषधाच्या सेवनानें शरीरांतील रोगाचा नाश न होतां उलट ते बळावतात, असें त्या देशांतील डाक्टरांना आतां कळूं लागलें आहेत, व औषधावांचून रोग बरे करण्याच्या प्राचीन ऋषिकालीन पद्धतीचें पुनरुज्जीवन आमच्या हस्ते नव्हे तर पाश्चात्यांच्या हस्तें होऊं लागलें आहे? आमचे शास्त्रकारऋषींनीं नदींत नाभीपर्यंत पाण्यांत उभेराहून स्नान करणें व ओलेत्यानें सूर्यास अर्घ्य देणें तसेंच कंदमुळें किंवा निदान साधे सात्विक अन्नाचें सेवन या गोष्टी नित्यकर्तव्य ह्मणून सांगितल्या. पण त्या कोण करतो? पाश्चात्यांच्या अनुकरणानें आमच्यांत बिस्किटें, सोडा, आइसक्रीम, वगैरे खाद्य पेयांचे नवेनवे प्रकार शिरल्यामुळें व पूर्वींच्या नित्यकृत्यांकडे दुर्लक्ष झाल्यामुळें रोगांची वृद्धि झाली यांत काय आश्चर्य आहे? शास्त्रकारांनीं सांगितलेला स्नानाचा विधि व कुन्हे यांनीं अलीकडे पुनः प्रचारांत आणिलेला कटिस्नान विधि यांची तुलना करून पाहिली तर दोन्ही अगदीं एका तत्वावर बसविलेलीं दिसतील. कुन्हे यांचें मत प्राचीन ऋषींच्या मताशीं इतकें जुळतें आहे कीं जणूं काय एखादे प्राचीन ऋषिच लोकोद्धारार्थ पाश्चात्य राष्ट्रांत अवतीर्ण झाले आहेत असें वाटतें कुन्हे आपल्या जुन्या पद्धतीनें औषधावांचून कोणताही रोग बरा करूं शकतात. त्यांच्या चिकित्सपद्धतींत गुप्त असें कांहीं नाहीं. शिवाय ती अगदीं बिन खर्चाची आणि बिलकुल अपाय न करणारीही आहे. हिंदुस्थानासारख्या दरिद्री देशाला तर सध्याचे काळीं अशा स्वस्प चिकित्सापद्धतीची अत्यंत जरूर आहे; आणि शिवाय ही पद्धति आज जरी कुन्हे सारख्या विदेशीयानें काढली असली तरी ती मूळची अस्सल आर्य–स्वदेशी–आहे. तेव्हां सुशिक्षितांनीं तिचा आदर करून अनुभव पाहावा व अनुभवाअंती ती हितावह दिसल्यास आपल्या कृतीनें इतरांना उदाहरण घालून द्यावें व सध्यां अंधपणानें चाललेल्या आपल्या देशबांधवांस अधोगतीच्या मार्गातून काढून उन्नतीच्या मार्गास लावावें हें त्यांचे कर्तव्य आहे. कुन्हेच्या पद्धतीनें अत्यंत असाध्य असे रोगही बरें झाल्याचीं उदाहरणें आह्मांस स्वतःस माहीत आहेत व ती पद्धति सर्व रोगांत हितावह आहे हें आह्मी स्वानुभवावरून सांगू शकतो. तिचा प्रसार आज मद्रास इलाख्यांत व मुंबई इलाख्यांत हळूं हळूं वाढत्या प्रमाणावर होत आहे ही आनंदाची गोष्ट आहे आणि आमची खात्री आहे कीं हल्लींची नाहीं तरी पुढची पिढी तरी त्या पद्धतीच्या अंगच्या स्वाभाविक गुणाचा फायदा घेण्यास चुकणार नाहीं. ही पद्धति अगदीं बिनखर्चाची, हव्या त्या स्थळीं करतां येणारी, अल्पकाळांत गुण दाखविणारी आणि शरीरांत बाह्य द्रव्याची भर न टाकतां शरीरांतल्या दूषित रसांना बाहेर घालविणारी आहे ह्मणून तिची आह्मीं आनदानें वाचकांस शिफारस करतों.

## मध्यप्रांताकरितां कौंसिल

गेल्या दिल्ली दरबारचे वेळीं राज्यकारभारांत पुढें होणार जे फेरफार कळविण्यांत आले त्यांत चीफ कमिशनरांच्या मदतीला कौंसिलें देण्याचा समावेश करण्यांत आला होता, व सध्यां मध्यप्रांत व आसाम यांना अशीं कौंसिलें देण्याचा अधिकार हिंदुस्थान सरकारला देण्यासंबंधानें बिल तयार होत आहे असें कळतें. पूर्व बंगाल आणि आसाम मिळून सध्यां एक कौंसिल आहे. या जोड प्रांतांतून पूर्व बंगाल जरी निघाला तरी बाकी राहिलेला आसाम प्रांताला तें पूर्वींचें कौंसिल राहील. नवीन असें कौंसिल मध्यप्रांतालाच तूर्त मिळणार आहे. यांतही एक लहानशी अडचण पायोनियर पत्रानें दाखविली आहे. ती वऱ्हाड प्रांताबद्दलची होय. वऱ्हाड प्रांत निजाम सरकारच्या स्वामित्वाचा असल्यानें त्याला कौंसिलाचा फायदा कायदेशीर रीतीनें देतां येईल कीं नाहीं याबद्दल कित्येक साशंक आहेत असें सदर पत्रकर्त्यांचें ह्मणणें आहे. पण राज्यकारभारांत सल्ला मसलत देणाऱ्या कौंसलाचा आणि त्या प्रांताच्या स्वामित्वाचा अर्थाअर्थीं संबंध नाहीं. तेव्हां तें देण्यानें पुढें मागें कांहीं भानगडीचा प्रश्न उपस्थित होईल ही भीती व्यर्थ दिसते. मध्यप्रांत व आसाम यांना कौंसिलें देणें ही गोष्ट न्यायाची आहे इतकेंच नाहीं तर अत्यंत जरूरीचीही आहे. आज कित्येक वर्षें याबद्दल लोकांची मागणी सुरू आहे. आज पर्यंत या प्रांताबद्दलचे प्रश्नांचा विचार वरिष्ठ कायदे कौंसिलला करावा लागे. त्यामुळें त्या कौंसिलाचा निष्कारण पुष्कळ वेळ जाई व प्रांतिक गोष्टींची माहिती सगळ्याच मेंबरांस नसल्यामुळें एखाद्या भानगडीच्या प्रश्नावर चर्चा होण्याचे वेळीं अनेक मेंबरांना मोठी अडचण वाटे. मध्यप्रांत व वऱ्हाड यांना स्वतंत्र कौंसिल मिळाल्यावर ही अनवस्था टळून वरिष्ठ कौंसिलाच्या मेंबरांच्या मागची ही अडचणही दूर होईल.

## व्हाइसरायाविषयीं मत

पूर्वीं इंदुरास दिवाणाचें काम अत्यंत दक्षतेनें केलेले व सुप्रसिद्ध सुधारकाग्रणी दिवाण बहादूर आर. रघुनाथराव हे नानाविध विषयावर आपले विचार मद्रासच्या दैनिक पत्रांतून प्रकट करीत असतात. पूर्वीं देशी संस्थानांचा कारभार करीत असतांना त्यांचा संबंध व्हाइसराय साहेबांशीं वारंवार येत असे; व, सध्या पेनशन घेतलें आहे तरी त्यांची सूक्ष्मदृष्टि प्रचलित राज्यकारभाराबर असल्यामुळें त्यांच्या विचारांना कांहीं महत्व आहे. ते ह्मणतात कीं हिंदुस्थानच्या व्हाइसरायाचे हातून कोणतें ही महत्कृत्य घडण्याची अपेक्षा करणें हा शुद्ध वेडेपणा आहे. नवीन व्हाइसराय आले कीं त्यांच्या कारकीर्दींचीं पहिलीं दोन वर्षें इकडची परिस्थिति वगैरेंची माहिती करून घेण्यांत जातात. पुढचीं दोन वर्षें संस्थानिकांच्या मुलाखती, त्यांच्याशीं असलेले राजकीय संबंध आणि स्वतःच्या कार्यकारी कौंसिलांतल्या सभासदांशीं दृढपरिचय यांत जातात. शेवटलें वर्ष नाच, बॉल व इतर सामाजिक बाबती, मानपत्रें वगैरेंत जातात. लॉर्ड कर्झन सारखा कट्टा मेहनती व्हाइसराय असल्या शिवाय एखाद्या महत्त्वाच्या कार्याकडे मन घालण्यास त्याला फुरसतच मिळत नाहीं.

## विलायतच्या लोकांना संदेश.

बादशहाच्या आगमनासंबंधानें वर्तमानपत्रांत इतकेवेळां अभिनंदनपर लेख लिहिण्यांत आले आहेत कीं त्या संबंधानें नवीन कांहीं लिहितां येईल असें आह्मांस वाटत नाहीं. बादशहा व राणीसाहेब यांच्या अंगच्या अनेक सद्गुणांची प्रशंसा, त्यांच्या दीर्घायुष्याचें व भरभराटीचें चिंतन, त्यांनीं दिलेल्या अमूल्य देणग्यांचें महत्व लक्षांत आणून झालेलें मनाचें समाधान वगैरे गोष्टी अनेकदा व्यक्त करण्यांत आल्या कीं हिंदु- ...लें आहे व ...यात्र करून ...

११ ...ीं राजे दिग्विजयाला दुसरा ... लोकांना जिंकून व बंदिवान केलेले राजे याच थाटाचें प्रदर्शन करण्यासाठीं दिग्विजयाची मिरवणूक स्वदेशी परत आल्यानंतर काढीत पांचवें जॉर्ज बादशहांनीं सध्या संपादलेला विजय निराळ्या प्रकारचा असला तरी त्या विजयाहून यत्किंचितही कमी प्रतीचा नाहीं. त्यांनीं हिंदी प्रजेचीं मनें सहानुभूति, उदारता, व उपकारकृत्यें यांनीं पूर्णपणें जिंकून बंदिवान केलीं, व त्यांचे आशीर्वादाची लूट बरोबर नेली. तिचें प्रदर्शन गेल्या आठवड्यांत विलायतेस पोंचल्यावर मिरवणुकीच्या रूपानें झालें तेव्हां आपल्या राजानें संपादलेल्या या अपूर्व विजयाबद्दल प्रत्येक इंग्रजास साभिमान कौतुक वाटलें असें रूटर कळवितो. त्याच वेळीं इकडे हिंदुस्थानांतही ठिकठिकाणीं सभा भरून सर्व जातीच्या लोकांनीं एकत्र होऊन विलायतच्या लोकांना आभारपूर्वक कळकळीचा संदेश पाठविला व तो नामदार व्हाइसराय साहेबांच्या मार्फत तिकडे जाऊन पोंचला. तो वाचून इंग्रजाच्या अभिमानांत आणि संदिच्छेंत भर पडल्यावांचून राहणार नाहीं. बादशहाचें आगमन ह्मणजे हिंदी प्रजेचीं मनें प्रेमानें आणि सहानुभूतीनें वश करून घेणें किती सोपें आहे याचा जणू काय प्रत्यक्ष धडाच आहे. गेल्या पांच चार वर्षांत हिंदुस्थानांत सरकारी अधिकाऱ्यांनीं जी दडपशाही चालविली होती तिच्यामुळें हा धडा त्यांना लवकर मिळण्याची फार अवश्यकता होती हें जाणूनच कीं काय परमेश्वरानें हिंदुस्थानाला येण्याविषयींच्या बुद्धीची प्रेरणा बादशहाच्या मनांत केली. तसें असेल तर दिल्ली दरबार भरवून बादशहाला इकडे आणण्यांत परमेश्वराचा उच्च हेतु हिंदी प्रजेच्या भावी कल्याणाचा पूर्णपणें द्योतक आहे असें ह्मटलें पाहिजे.

## बेगम साहेबांचा प्रवास.

भोपाळच्या बेगम साहेबांनीं आपल्या विलायतेंतल्या मुसाफरीचें वर्णन नुकतेंच आपल्या एका भाषणांत केलें, तेव्हां त्या ह्मणाल्या कीं मी तुर्कस्थानच्या सुलतानाच्या मुलाकतीला गेलें होतें. तेव्हां पैगंबराच्या दाढीचे केस मला बक्षीस देऊन त्यांनीं माझा बहुमान केला. परदेशी राजाशीं मोकळेपणानें बोलूं चालूं देण्यानें इंग्रज सरकारानें देशी संस्थानिकाविषयीं आपला विश्वास व्यक्त केल्यासारखें झालें. पाश्चात्य लोकांची स्वतंत्रता, सुधारणा, स्वदेशाभिमान उच्चप्रतीचें जीवन, त्यांची हिंमत, देशाविषयींची कळकळ कामें करण्याची पद्धति, आरोग्य रक्षण वगैरे अनेक गोष्टी मी बारकाईनें पाहिल्या. या गोष्टी मोठ्या माणसांच्या अंगीं नव्हेत तर लहान मुलांच्या सुद्धां अंगीं बाणलेल्या पाहून मला नवल वाटलें. पाश्चात्यांचा खरा मोठेपणा याच एका गोष्टीवरून दिसून येतो. तिकडे लहानपणापासूनच मुलांना जें शिक्षण देण्यांत येतें त्यांत असत्या विषयीं चीड, मनाची उदारता, स्वदेशाविषयींचें प्रेम, देशाभिमान, वडील माणसांना मान, राजनिष्ठा, इ० गुणांचें बाळकडू घातलेलें

शिक्षण ही [illegible] डून सर्व [illegible] आहे. या तेज [illegible] री [illegible] माणकें वगैरे जवाहिर [illegible] डें आहे अशी माझी खात्री झाली. त्याचप्रमाणे [illegible] वैभव पाहून तुह्मी स्वतःच्या स्थितीविषयीं निराश होऊं नका. पाश्चात्यांची दोनशें वर्षांपूर्वींची स्थिति आपल्या हल्लींच्या स्थितींहूनही वाईट होती. पण तिकडील स्त्रियांनीं स्वतः उद्योग करून आणि श्रीमंतांनीं गरिबांना मदत करून ती इतक्या उच्च स्थितीला नेऊन सोडली आहे.

## कांग्रेसचे पुढारी आणि सरकार

दिवसें दिवस कांग्रेसविषयीं हिंदुस्थान सरकारचे मनांतली तेढ नाहींशी होऊन उलट आदर उत्पन्न झालेला दिसून येत आहे हें पाहून कोणा कांग्रेसभक्तांस आनंद होणार नाहीं? अलीकडे झालेल्या कित्येक बड्या नेमणुका सरकारच्या मनांतली कांग्रेसमनाविषयींचा गुप्त आदर उघडकीला आणीत आहेत. मद्रासच्या कार्यकारी कौन्सिलांत मि. कृष्णस्वामी आयर यांची नेमणूक झाली, नंतर परवा कलकत्ता हायकोर्टांत दोन जज्जांच्या जागा झाल्या त्या मि० हसन इमाम आणि मि. ए. चौधरी यांना देण्यांत आल्या. दोघे ही कट्टे कांग्रेसभक्त ह्मणून प्रसिद्ध आहेत. मि० हसन इमाम हिंदुस्थान सरकारचे लॉ [illegible] मि० अली इमाम यांचे बंधु असून [illegible] विचार व कार्यपद्धति त्यांना [illegible] सरकारनें दिलेले [illegible] हक्काविरुद्ध आपले विचार त्यांनीं उघडपणें बोलून दाखविले होते व गेल्या दिसेंबरांत भरलेल्या कांग्रेसच्या वेळीं पुढची कांग्रेस पाटणा येथें त्यांनींच बोलाविली. अशा सुप्रसिद्ध कांग्रेस भक्तांना हायकोर्ट जज्जासारख्या जबाबदारीची व सन्मानाची जागा देण्यानें सरकारच्या धोरणांत झालेल्या इष्ट फेरबदलाविषयीं लोकांचा अनुकूळ ग्रह झाल्यावांचून राहणार नाहीं.

## एकांतवास

बडोदे संस्थानचा गेल्या खानेसुमारी बद्दलचा कच्चा रिपोर्ट नुकताच प्रसिद्ध झाला आहे. त्यांत एक गोष्ट अपूर्व आहे. ती ही कीं इतर प्रांतांतून गेल्या दहा वर्षांत शहरांची वाढ आणि खेड्यापाड्यांचा ऱ्हास झालेला असा प्रकार असतां बडोदें संस्थानांत मात्र याच्या उलट ह्मणजे खेड्यापाड्यांची वृद्धि आणि शहरांचा क्षय होत चाललेला दिसून येत आहे. बडोदे संस्थानांतल्या लोकांना इतर ठिकाणच्या लोकांपेक्षां ग्रामवासाची येवढी आवड कां उत्पन्न व्हावी तें कळत नाहीं. गायकवाडी प्रजेच्या मनाचा कल आपल्या पूर्वींच्या ऋषींच्या सारखा एकांतवासाकडे होत चालला आहे काय? तसें असल्यास ती गोष्ट संतोषाचीच ह्मटली पाहिजे. आमचे लोक आमच्या प्राचीन आदर्शापासून जितके जितके दूर जातील तितके तितके अधिक दुःख त्यांच्या पाठीस लागणार आहे. शहरांतल्या लोकांना जिवनार्थ तीव्र कलह करावा लागत आहे व त्याच्या पायीं आध्यात्मचिंतनाला वेळही मिळत नाहीं व मिळाला तरी एकांत जागेच्या अभावीं ती इच्छा त्यांना दडपून टाकावी लागते. नगरवासी लोकांच्या जीवनांतल्या या दोषांचे भयंकर परिणाम घडलेले पाहून यूरोपांतल्या व अमेरिकेंतल्या विचारवंत पुढाऱ्यांना अतिशय दुःख होत आहे. प्रसिद्ध अमेरिकन तत्ववेत्ता इमर्सन यानें एके ठिकाणीं ह्मटलें आहे कीं मी एखादे वेळीं खेडेगांवांतल्या आपल्या झोपडींत जातो त्या वेळीं अनुभवण्यांत सांपडणाऱ्या सुखापुढें ग्रीस व रोमचे वैभवसुख तुच्छ असें मला वाटतें. प्राचीन काळीं अगर अर्वाचिन काळीं ह्मणा, मानव जातीचें अक्षय कल्याण करणाऱ्या थोर विचारांना प्रसवणारे ग्रंथकार निर्जन स्थानीं वर्षेंचीं वर्षें घालवित असें दिसून येतें. येशूख्रिस्त, गौतमबुद्ध, महंमद, चैतन्य यांना सद्गुरूची योग्यता प्राप्त होण्यापूर्वीं एकांतवासांत जीवात्मा आणि परमात्मा यांचें तादात्म्य चिंतनाच्या द्वारें करावें लागलें होतें. आपले उपनिषद ग्रंथ षद व आरण्यकें कोठें रचिलीं गेलीं? निर्जन अरण्यांत. या वरून सर्वांनीं उठून एकांतवास पतकरावा व संसाराविषयीं विरक्त व्हावें असा आमच्या ह्मणण्याचा अर्थ समजूं नये. आमचा भावार्थ येवढाच आहे कीं बाकीच्या तेवीस तासांत इतर उद्योगधंद्याचे विचार व कृत्यें करून उरलेला एक तास तरी निश्चितपणें अध्यात्म विचारांत मनुष्यानें एकांत जागीं घालविला पाहिजे. त्याचप्रमाणें वर्षांतले [illegible] तरी खेडगावासारख्या ठिकाणीं किंवा त्याहून निर्जन अशा एखाद्या अरण्यांत राहून मनुष्यानें चिंतनांत घालविला तर त्याचा परिणाम त्याच्या शरीरावर व मनावरही उत्तम प्रकारें होऊन त्याचा जिवनक्रम अधिक पवित्र, सुखाचा आणि शांतिप्रद होईल. या दृष्टीनें पाहतां बडोदे संस्थानांत शहरांचा होत असलेला ऱ्हास एका अर्थानें अभिनंदनिय ह्मटला पाहिजे.

## आंग्लो इंडियन वर्तमानपत्रें

हिंदुस्थान सरकारचें ठाणें कलकत्याहून उठवून दिल्लीस नेण्याचें ठरविण्यांत येण्यापूर्वीं आंग्लोइंडियन मंडळीचें मत विचारण्यांत आलें नाहीं ह्मणून कलकत्याच्या युरोपियन समाजांत एकच चळवळ उडून राहिली आहे आणि इंग्लिशमन व स्टेटसमन सारखीं आंग्लो इंडियनपत्रें त्यांच्या क्रोधाग्नींत तेल ओतीत आहेत! लोकमताची पर्वा न करतां हिंदुस्थान सरकारानें स्टेट सेक्रेटरीशीं अंधारांत संगनमत करून हें कृत्य केलें ह्मणून जीं पत्रें आतां ओरड करीत आहेत तींच पाच वर्षांपूर्वीं लॉर्ड कर्झन साहेबांनीं लोक मताला उघड उघड लाथाडून बंगालची फाळणी केली तेव्हां कां स्वस्थ बसलीं होतीं? दोन अडीच कोटि बंगाली लोकांचें तें 'लोकमत' नव्हे, आणि परक्या देशाहून इकडे केवळ पैसे मिळविण्याकरितां आलेल्या आणि तुंबडी भरल्याबरोबर हिंदुस्थानाकडे पाठ फिरविणाऱ्या मूठभर इंग्रज व्यापाऱ्यांचें व वर्तमानपत्रकारांचें मत तें काय तें खरें लोकमत असें ही पत्रें समजत आहेत आणि आजपर्यंत यांचे सरकारानें लाड केल्यामुळें हीं पत्रें इतकीं शेफारलीं आहेत कीं हिंदुस्थान सरकारला आतां वेड लागलें आहे व तें लोकांच्या तिरस्कारास स्वतःला पात्र करून घेत आहे असें ह्मणण्या पर्यंत त्यांच्या भाषेच्या कडकपणाची मर्यादा गेली आहे. अशी अमर्याद कडक भाषा वापरणारीं आंग्लो-इंडियन पत्रें पुनः आपलीं, नेमस्त राजनिष्ठ आणि सुविचाराचे आदर्श ह्मणून ह्मणविलीं जातातच. यांना जर नेमस्त ह्मणावयाचें तर 'जहाल' व 'नेमस्त' या शद्बांचे अर्थच फिरविले पाहिजेत. कदाचित् सरकारच्या कोशांत इंग्रज लोक व देशी लोक यांच्या संबंधानें या शद्बांचे निरनिराळे अर्थ दिले असतील.

## लोकमताविषयीं बेपर्वा.

'ह्मातारी मेल्याचें दुःख नाहीं. पण काळ सोकावतो' या ह्मणीचा उपयोग डाका येथें युनिव्हर्सिटी स्थापण्याच्या सरकारच्या विचारासंबंधानें आंग्लोइंडियनपत्रें करीत आहेत. त्यांचे ह्मणणें असें आहे कीं दिल्ली राजधानी करण्याचा बेत अगदीं आयत्या वेळेपर्यंत सरकारानें गुप्त ठेविला याला एकवार असें तरी कारण देतां येईल कीं तसा गुप्तपणा ठेविला नसता, तर दिल्लीस ज्यांच्या मालकीच्या जमिनी आहेत त्यांनीं अगोदर मिळालेल्या माहितीचा फायदा घेऊन जमिनीच्या किंमती भलतीकडेच वाढविल्या असत्य', आणि मग सरकारला [illegible] असतें. [illegible] स्थापण्याचा [illegible] बद्दल ह्मणारा [illegible] विचारें लोकांपुढें अगोदर [illegible] ही युनिव्हर्सिटी स्थापण्याचें सरकारचे मनांतच कां यावें? मुसल्मान लोक बंगालची फाळणी रद्द केल्यामुळें रागावले, त्यांची समजूत घालण्यासाठीं त्यांनीं न मागतां हा प्रसाद त्यांना सरकारनें दिला आहे काय? तसें असेल तर सरकारानें यांत भित्रेपणा व्यक्त केला असें सदर पत्रकर्त्यांचें ह्मणणें आहे. तसें नसेल आणि लोक मताची इतःपर पर्वाच करावयाची नाहीं असें सरकारचें ठरलें असेल तर त्याबद्दल जोराचा निषेध केला पाहिजे; कारण हिंदुस्थान सरकारला एकदां ही लोकमताला न विचारतां अंधारांत गोष्टी करण्याची चटक लागली ह्मणजे पुढें ती लोकांना जड जाईल. सदर पत्रकर्त्यांच्या या ह्मणण्यांत पुष्कळ तथ्य आहे यांत शंका नाहीं. पण कलकत्ता युनिव्हर्सिटीची फाळणी करण्याच्या सरकारच्या या विचाराविरुद्ध काहूर करणारे खुद्द बंगाल प्रांताची फाळणी झाली त्यावेळीं कां स्वस्थ बसले, व ह्मातारी मेली त्याचवेळीं काळाच्या पाठींत बडगा न घालतां त्याला त्यांनीं कां सोकावू दिलें या प्रश्नाचें उत्तर सदर पत्रकर्ते देतील काय!

## जगांतले थोर पुरुष.

रिव्हु ऑफ रिव्हूज पत्राचे संपादक मि० स्टेड यांनीं जगांतले वीस थोर पुरुषांची यादी निरनिराळ्या सुप्रसिद्ध गृहस्थांकडून मागविली होती, व आलेल्या जबाबावरून मतांच्या संख्ये प्रमाणें; त्यांनीं अनुक्रम लाविला तो येणें प्रमाणें:— शेक्सपियर ११ मतें, पहिला, कोलंबस १६ मतें दुसरा, सीझर, न्यूटन, १४ मतांनीं तिसरे, ड्यांटी, गर्लिन, स्टीफन्स, बुद्ध महमद वगैरे पुरुष त्यांचे खालीं या प्रमाणें यादी आहे. मीजा सातवे एडवर्ड बादशहा यांचेहीं नांव या यादींत आहे.

## वऱ्हाडवृत्त.

हवामान—गेल्या गुरुवारापासून वातावरणांत फार फरक पडला आहे. पर्जन्य कालच पुनः परतला असून झंझावात गारांची वृष्टि, जोराचा पाऊस इत्यादि अवकालीन तुफानें गडबड करीत आहेत. मध्यंतरीं उघाडी होते पण ढग वारंवार जमून पूर्व, दक्षिण इत्यादि भागांस विजा चमकत असतात.

येत्या बुधवारीं श्री० रा. रा. नामदार क्रॉडाक व त्याच्या पत्नी यांचा नागपुर येथें मोठ्या थाटानें सार्वजनिक आदरसत्कार होणार आहे.

(सहकारी पतपेढी— या संस्था वऱ्हाडांत प्रसृत व प्रचलित करण्यासाठीं रा. रा. विष्णु मोरेश्वर महाजनी व नटेश आप्पाजी द्राविड हे आकोला जिल्ह्यांत पुष्कळ ठिकाणीं फिरून आले. त्यांचा अनुभव भावी यशश्री ध्वनित करितो. काल व परवां ही मंडळी यवतमाळाकडे गेली आहेत.)

प्रोफेसर शहा यांचे खेळ येथें चालू आहेत. निशाणबाजीचे, जादूचे व गारुड्याचे हे प्रयोग [illegible] र नामी करितात. दुर्बिणीशां पुष्कळ सुधारणा दिसत गेले [illegible] कन्या श्रीमती चंपाबाई यांचा विवाह रा. रा. गंगाधरपंत जयवंत बी. ए. यांच्या बरोबर मोठ्या समारंभानें झाला. वधू इंग्रजी चौथी इयत्ता शिकली असून तिला स्वयंपाक, ललित कला इत्यादि गोष्टी चांगल्या माहीती आहेत. ईश्वर उभय दंपत्यांस सुखी व दीर्घायु करो!

**अभिनंदन** आमच्या प्रांतांतले एक सन्मान्य नागरिक व उमरावतीचे सुप्रसिद्ध वकील राजश्री मोरो विश्वनाथ जोशी यांची कन्या कु० नागूताई जोशी या लंडन येथील एल. आर. सी. पी व एम. आर. सी. एस. या परीक्षांत उत्तीर्ण झाल्याची खबर ऐकून वऱ्हाडांतल्या लोकांना अत्यंत समाधान व अभिमान वाटेल. डा. आनंदीबाई जोशी यांच्या मागून इतक्या अल्पवयांत परदेशी वैद्यशास्त्राच्या उच्च परीक्षेंत उत्तीर्ण झालेल्या अशा ब्राह्मण ज्ञातींत याच पहिल्या होत आणि हा मान वऱ्हाडसारख्या मागसलेल्या प्रांताला मिळाल्याबद्दल त्याला अभिमान वाटणें स्वाभाविक आहे. कु० नागूताई या मुंबईच्या ग्रांट मेडिकल कालेजांतून एल. एम. अँड एस. झाल्या होत्या, व त्यानंतर लंडन मधील वैद्यकीची मोठी पदवी मिळविण्यांत त्या यशस्वी झाल्या आहेत. आतां कित्येक महिने फ्रांन्स, जर्मनीसारख्या देशांतल्या प्रमुख दवाखान्यांत अनुभव घेऊन त्या स्वदेशी यावयाच्या आहेत. कु० नागूताई यांचें व त्यांनीं शिक्षणाचे कामी सर्वतोप्रकारें उत्साह व उत्तेजन देणाऱ्या त्यांच्या सन्मान्य मातापितरांचें या बद्दल आह्मी अभिनंदन करीतों.

## *Notice.*

The following extract from Government of India Home Department, Resolution No 2831-42, dated the 8th December, 1899 is published for general information.

NAGPUR:
*The 9th September 1911.*

E. A. DEBRETT,
*Chief Secretary to the Chief Commissioner, Central Provinces.*

---

RESOLUTION

The Secretary of State for India has brought to the notice of the Government of India that it not infrequently happens that natives of India, students or others who have proceeded to England, desire to obtain passports to enable, them to travel to foreign countries in which the possession of a passport is necessary or desirable, and that difficulty often arises from want of evidence to show that the applicant is a British subject and therefore entitled to a passport. Appeals for assistance are also frequently addressed to His Lordship by destitute Indians who desire to return to their country and by students who, owing to embarrassed circumstances, are unable to complete their course of education.

2 In order to enable the Secretary of State to deal with such cases satisfactorily, the Governor-General in Council has decided that it is necessary to press upon Indian students and others visiting England the desirability of providing themselves, before their departure from India with an authoritative certificate of ibentity, in the from appended to this Resolution, signed by the head of the district (in a Presidency, Town, the Commissioner of Police) in the case of residents of British Inbia and by the Political Officer in that of residents of Native states. For a otudent the certificate should be signed by the head of his last school or oollage and countersigned by the District Officer (in a Presidency Town, the Commissioner of Police) or Political Officer, as the case may be:—

FORM OF CERTIFICATE OF IDENTITY.

1. Name of applicant ____________
2. Father's name and caste ____________
3. Residence ____________
4. Age of applicant ____________
5. Nationality of applicant* ____________
6. Social and pecuniary status of father (or guardian) ____________
7. Date of probable departure of applicant ____________
8. Object of applicant's visit to England (Europe) ____________

*Signature of District Officer (in a Presidency Town, the Commissioner of Police), or Political Officer, or Head of School or College.*

Date ____________

N. N. 81

*i. e., whether a British subject by birth or by naturalization (or a subject of a Natve state).

+ Countersignature of the District or Political officer should be obtained on certificates signed by heads of schools or colleges. [1238—1]

## नोटीस

नोटीस बेशमी जाणुजी वल्लद गोमाजी कुंभार मु० सावंग (सावंककारचे) पो० बुइखेड ता० चांदूर रेल्वे जि० उमरावती यांस:—

खालीं सही करणार इनकडून नोटीस देण्यांत येते कीं मी तुमची लग्नाची बायको असून तुह्मीं मला आज दहा वर्षांपासून टाकून दिलें आहे कारण तुह्मी दुसरी बायको करून तिच्याशीं संसारसुख घेत आहां मी इतकें दिवस आपलें बहिणीचे घरीं राहून खाण्याचे खर्चाबद्दल दर साल ३० तीस रुपये प्रमाणें दहा वर्षाचे ३०० रुपये कर्ज काढून उदरनिर्वाह करीत आहे. इतकें दिवस मी केवळ तुमचे भरवशावर आहे. व तुह्मी तर मला नेत नाहीं व येऊं ही दिले नाहीं यावरून मी असे किती दिवस काढावे आतां खावटीचे खर्चाबद्दल पैसे देणारा इसम व्याजासुद्धां रकम मागत आहे. तरी तुह्मांस या नोटिशीनें कळविण्यांत येते कीं नोटीस पावल्यापासून आठ दिवसांचे आंत वरील पैसे व्याजासुद्धां देऊन मला आपलें घरीं घेऊन जाऊन सुखानें नांदवावे अगर आपले मनांत पैसे न देऊन नांदविण्याचे नसेल तर फारकती द्यावी. असे न केल्यास रीतीप्रमाणें खावटी बद्दल फिर्याद करून पैसे घेतले जातील व कोर्ट खर्चासुद्धां द्यावा लागेल सदरहू नोटीशीचा जबाब वरील मुदतींत न आल्यास आपला नवरेपणाचा हक्क मुळींच न राहून हीच फारकती समजून मी खुशाल दुसरा घरठाव करीन मग कोणतेच प्रकारे तक्रार ऐकिली जाणार नाहीं कळावें ता० ३१-१-१२ इ.

सही

पुरी मर्द जाणुजी कुंभार मु० उतखेड पो० खेर्डे जि० उमरावती

नो. नं. ८२

---

### खबर.

सर्वांस कळविण्यांत येते कीं आमचे येथें शेतकीचे कामाचे लोखंडी नांगर, बैलाचा तांगा, लोखंडी बिडची चक्की वगैरे चिल्हर सामान विकण्याचे आहे. ज्याला घेणें असेल त्यांनीं किंमत माल पाहून समक्ष ठरवावी. कळावें. तारीख. २८-१२-११ इ०

नो० नं० ९

गोपाल खुशालराव वकील आकोला.

## दिल्ली दरबार.

मानपत्राचें उत्तर देतानां "हिंदुस्थानची एक सारखी प्रगति होत जावी ही आपली उत्कट इच्छा आहे." असें बादशहानीं ह्मटलें. हिंदुस्थानांत शेंकडा ८० ऐशीं लोक शेतकीवर निर्वाह करीतात. तेव्हां त्यांच्या मध्यें अगोदर प्रगति झाली पाहिजे. त्यांची प्रगति होण्यास शेती सुधारली पाहिजे. शेती सुधारण्यास सुधारलेल्या आउतांचा जास्त जास्त प्रसार झाला पाहिजे.


हें व नोटिशीचा खर्चही ... ही सुध नोटीस
शेता० २-२-१२ ई० लोखंडी
क... यंत्रें, मोटेचीं चाकें, वगैरे वा कुकाजी
वगैरे तयार करण्याचें काम आह्मी करितों खामगांव
आहों. सबब हीं यंत्रें आमच्या कडूनच
मागवा. क्याटलाग मागवा.

किर्लोस्करबंधु.
पोष्ट किर्लोस्करवाडी (सं० औंध जिल्हा सातारा).

नो० नं० १२



ठिक ठिकाणी एजंटस् पाहिजेत.

# सन लाइफ अशुअरन्स कंपनी ऑफ कानडा

[१८६५]

इंग्रिश सरकारची सत्ता देखरेख सरकारी हुकुमाशिवाय भांडवल गुंतवता येत नाहीं.

**भांडवल तेरा कोटी रुपये.**

पॉलिसीचे नमूने फारच सुधारलेले आहेत.

पालिसी .... .... .... .... .... .... बिन अटीच्या.
पॉलिसी .... .... .... .... .... .... बिन तक्रारी.
पॉलिसी .... .... .... .... .... .... बिन बुडणारी.

हिंदुस्थानचे मुख्य ऑफिस, हार्नबी रोड मुंबई.
रा. श्री मुधोळकर मध्यप्रांताचे वऱ्हाडचे जनरल एजंट अकोला ' प्रांतवऱ्हाड
नो. नं. १३



## Oriental Govrnment security LIFE ASSURANCE COMPANY Limited

ESTABLISHED IN 1874.
R. Paterson, Brown, Manager,
HEAD OFFICE—BOMBAY

### FUNDS Exceed 4 crores

CLAIMS PAID FOR OVER 3 CRORES
IMMEDIATE SETTLEMENT OF CLAIMS

If there be one thing of more importance than another in connection with Life Assurance, it is when claims arise, that the amount due under the Policy be paid to the Claimants at the earliest possible date. This the Directors of the 'Oriental' keep well before them and act in treating the clients with the utmost liberality.

UNQUESTIONABLE SECURITY.

It is not sufficient to read that a Company's funds amount to a given sum, but it is essential to know how such Funds are invested if in miscellaneous and risky investments or how secured.

The Funds of the 'Oriental' are invested in Government Securities and lodged with the Government Official Trustee of Bombay in terms the Company's Trust Deed, as Security for Claims arising, through deceas of assured lives, and endowment policies matured.

Government Officers, Professional men, Tradesmen and others by employing portion of their annual income or profits in effecting life policies, at once create a fund equivalent to the savings of many years.

No man can be sure how long he will live, and although he may save money yet, if he dies early before he had time to save much, his wife and family may be in distress. Life Assurance is a means by which his danger is got over. Life being so uncertain, the sooner a man make up his mind to assure his life the better. Once satisfied of the propriety of the step, do not delay. There are numerous instances in the records of the Oriental' where the delay of a month or less, has left the family without the intended provision.

INFLUENTIAL AND ENERGETIC AGENTS WANTED. For term please apply to the undersigned.

Prospectuses, forms and any further information can be obtained on application

M. DESOUZA,
CHIEF AGENT, Nagpur

CHIEF AGENCY FOR C. P., BERAR & KHANDESH No. No. 14


हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवआश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

## जा...

...दि... ...ड्डनें सर्वत्र ... कळविण्यांत ... ...रीख ...।१९१२ इ. रा... येथें ...ऐवज खरेदीबद्दल करून ...साठीं ...लो होतो त्यावेळीं मी प्रथम १ नयराम ...ल्द दावल २ बळीराम वा दावल ...ळे रा. सोनाळे ता. आकोला यांना दस्तऐवज लिहून देण्याकरितां कागद विकत घेतला ... लिहून पुरा होतांच रुपये ४०० मागितले ... आपण मजला दिले नाहींत नंतर त्याचवेळीं मी ...पुरा कागद ... खुशाल वल्लद जानजी होनाळ रा. ...ळे यानें मजला चारसे ४०० रुपये दिले त्या ऐवजी मी त्यास माझे खरेदी मालकीचे मौजे सोनाळे ता. आकोला येथील शेत धावे, गायवाड्या ही लिहून देऊन रजिस्टर करून दिली. ... प्रथम लिहिलेला कागद नयराम व बळीराम यानपाशीं त्याचवेळीं परत मागितला असतां त्यांनीं मजला परत दिला नाहीं व त्यावर मी आपली शेवटी निशाणी ही केली नाहीं तरी सदहू लिहिलेले खरेदी खत पोकळ आहे व रजिस्टर झालेले नाहीं मला लिहितां येत नाहीं ह्या मुळे मी सर्वत्र लोकांना कळण्यासाठीं ही मुद्दाम जाहिर नोटीस दिली आहे. कळावे ता. ३१।१।१२ मुं. आकोला

सही

सखाराम वा धनाजी हागे रा. येवत ता. आकोला याचे हातचा आंगठा असे.

नो० नं० ८३

## नोटीस

रा. गोविंदा वल्लद बालाजी कुणबी रा. लाखपुरी ता० मूर्तिजापूर यांसः—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं तुमचे पासून ९९ रु० कर्जाऊ घेऊन त्यांस २ रुपये व्याज कबूल करून पुर्जा लिहून दिला त्यास ता० ११।१२।११ चे सुमारा पावेतों २ वर्ष ९ महिनें झालें होते; त्यास पुर्जा लिहून दिल्या वर १२ महिन्याचें व्याज २४ रुपये तुह्मांस दिलें. व एक वर्ष ९ महिन्याचें व्याज रुपये ४० व मुद्दल रु० ९९ असें १३९ रु० आंबरगीर गुरु नारायणगीर याचे हातानें तुह्मास पुरण्या वल्लद संतु धनगर याचे समक्ष सदहू रु० ता० ११-१२-११ रोजीं दिलें असून तुह्मी माझा पुर्जा मजला रद्द करून परत देण्याचे प्रथम कबूल केलें रु० पदरांत पडल्यावर तुह्मी पुर्जा तिन्हा-येती सदरील पुरण्या धनगर याचेपाशीं ठेऊन नंतर तुह्मी असें सांगितलें कीं माझे शेत तोंडी करारानें तूं वहितीस घेतलें होतें त्याचे स्वामीत्व रु० १६० आणून देऊन पुर्जा तिन्हायती ठेवला आहे ता घेऊन जाणें त्याप्रमाणें मी तुह्मांस आज ७ रोज झालें ह्मणजे रविवारी ता० २८-१-१२ रोजीं तुमचे स्वामीत्वाचें रु० १६० तुकाराम नारायण धनगर व पुर्ण्या वगैरे बरेंच लोका समक्ष तुह्मास दिलें ते तुह्मी पदरांत घेऊन पुरजा पुरण्या धनगर याचे पाशी ठेविलेला तुह्मी परत देतो ह्मणून यास मागून हातांत घेऊन मजला न देतां तुह्मी घरीं घेऊन गेला करितां तुह्मांस नोटीस देण्यांत येतें कीं स्वामीत्वाचे रु० ... ... व माझा पुरजा असें ... ... अथवा जास्त इसमांस अगर दिल्या बद्दल तुह्मी मजला, ...

## नोटीस.

बेशमी— तुकाराम कृष्णाजी पाटील राहणार निळेगांव ता० खामगांव व पोष्ट विहीगांव यांसः—

खालीं सही करणार अशी नोटीस देते कीं मी तुमची गंधर्वाची बायको असून आज सुमारें वर्ष दीड वर्षापासून तुह्मांस रक्तपिती नांवाचा रोग झाल... असें मला वाटतें त्या दिवसांपासू... तुमच्याकडे रहात नाहीं परंतु त... रोग झाला नाहीं असें ह्मणतां परंतु खोटे आहे तरी याची खात्री पटण्यासाठीं तुह्मी मे० सिव्हील सर्जन साहेब यांचे सर्टिफिकीट आणून दाखवावें व ते १९ दिवसांचे आंत आणावें व त्या प्रमाणें होत नसल्यास मला आपण आपले सहीची पावती (सोडचिठी) ... आपण १९ रुपये ... हा गोष्ट्या... दिवसांचे आंत न केल्यास हीच नोटीस फारकती समजून मी दुसरा घरठाव करून जाईन मग माझेवर तुमचा नवरेपणाचा हक्क राहणार नाहीं. ह्या नोटिशीचा खर्च तुह्मांस द्यावा लागेल. कळावें. तारीख २।२।१२ इसवी.

सही

सोनी मर्द तुकाराम पाटील नि० बां० राहणार किन्ही पोष्ट विहीगांव ता० खाममांव.

नो० नं० ८४

## जाहिर नोटीस.

...लोकांस कळविण्यांत येतें कीं १९ दिवसांचे आंत ...ळा, प्रांत वऱ्हाड, येथें मी तुमच्यावर दिवाणी ... के० कृष्णाजी दिनकर, करून घेण्या विषयीं ... संपादन केलेली व हल्लीं या नोटिशीचे खर्चासुद्धां ... घे...र, इमला व खुली तुह्मास कळावें. ता० ३।२।१२ ... ...लें आहे. हें घर

सही ...ामशींदा नजीक

सखाराम वल्लद फकिरा चांभार ...ार सोयीबार लाखपुरी मुकाम आकोला यापैकीं नि० हातचा असे. ...वाडा ...नीं

नो० नं० ८९

## नोटीस

नोटीस बेशमी तुकाराम वा॥ कृष्णाजी पाटील. राहणार नीळेगांव ता० खामगांव पास.

खालीं सही करणार अशी नोटि... कीं माझ्या बापाची ईस्टेट होती. माझाबाप मयत झाल्या नंतर वारसाच्या नात्यानें ती ईस्टेट माझे नांवें आली नंतर मीं ती ईस्टेट विकून त्याची जी रक्कम आली ती अजमास रुपये १००० तुह्मांस दिले परंतु तुह्मांस मी मजला सोडचिट्टी देण्याविषयीं आज रोजीं नोटीस देत आहे करितां तुह्मांसही दिलेली रक्कम माझी मजला नोटीस पोंहचल्या पासून ८ दिवसाचें आंत रकम रुपये १००० परत यावी याप्रमाणें न केल्यास तुमचेवर कोर्टात कायद्याप्रमाणें



तजविज केली जाईल व नोटिशीचा खर्चही घेतला जाईल कळावें ता० २-२-१२ ई०

सही

सोनी मर्द तुकाराम पाटील निशाणी बांगडी राहणार किन्ही पोस्ट विहीगांव

नो० नं० ८६

## नोटीस

नोटीस बेशमी गुणापा व लक्ष्मण आपा वा॥ ईरापा कचार राहणार मौजे चोंडी तालुके बाळापूर जि० आकोला.

यांस ...

खालीं सही ... रु० ३०० ... देतों कीं, आह्मी ... पटेखताबद्दल व वहिवाटी- २०० गहाणावरून ... मिळून रु० २०० एकूण एक वर्षानें रोख ...२॥ ...शें रु० तुमचे कडून रुपये ९०० व ... ...फेड ... मी बद्दल असें दोन्ही ... रा. सर्व रुपये ७०० ... रोजीं ... ...ठापूर मला पावलें व त्याची ... येथील सातशें रा. रा. आनंदराव मारुतीराव देशमुख ...पासून पिंपरडोली पो० आलेगांव ता० बा... ...शोबानें याचे हस्तें केली परंतु मजकडे ७००... ...चल्या- रुपये निघत असतां लबाडीनें म... आपसांत ९०० रुपये घेतलें तरी ते काय हि... प्रमाणें न घेतलें त्याचा खुलासा नोटीस पोंहचल्या पासून ४ दिवसांचे आंत करून ... खर्चही तुह्मास काय तो निकाल करावा या... ...नो सही ता० केल्यास कोर्टात कायदेशीर री... केली जाईल व त्याबद्दल होणारा सोसावा लागेल. ही नोटीस ... ३१।१।१२ इ०

| | | |
|---|---|---|
| ... आयेन | | |
| मोठी | " | l= |
| लहान | " | -l- |
| लिनिमेंट आयोडिन | " | .ll. |
| टि. आयोडिन | " | l= |
| महावातास्त्र तेल | " | |
| मोठी | " | ll= |
| मध्यम | " | l-ll |
| लहान | " | ✓= |
| उसांचा शिर्का | " | l= |
| मध बाटली. | | |
| मोठी | " | l= |
| लहान | " | ✓-ll |
| पेनसाकर तेल | " | .ll. |
| ग्लिसराईन बाटली. | | ✓= |
| गजकर्ण अर्क | " | l= |
| गजकर्ण मलम | " | ✓=ll |
| ...द्रव. | तोळा | .ll. |
| ...दि वटी | " | .ll. |
| | | ✓= |

...आवश्यक औषधें तयार आहेत. ... कंपनी लि. आकोला.

झा... आमचे... आतां ... विचार वाढि... फर करण्याचा ...सरा का... नाहीं. मी नोटीस देतो येतें कीं तझा अन्न हक्क आहे ... आपले अलवल घे नर असें न करितां तूं ती शेती कुं गहाण, खरेदी, बक्षीस, अगर मृत्यूप नये. दिल्यास ज्याचा तो जबा... कळावें. ता० ७।१।१९१२

सही

गंगाराम वल्लद ग...

नो० नं० ...

## नोटीस

रा. रा. रावजी वा॥ कुकाजी तेली ...

अडनांव खोडगे रा. खामगांव

यांसः—

खालीं सही करणार यांजकडून अशी नोटीस देण्यांत येतें कीं तुह्मी मला आपली मुलगी नामे भुली ईस गंधर्वानें देण्याचें पंचासमक्ष कबुल करून चोळी पातळ ही झालें आहे. आतां आह्मीं गंधर्व ठरवावयास आलें होतो पण तुह्मी गंधर्वानें देत नाहीं ह्मणतां व मला असें समजलें तुह्मी तीला वाडेगांव येथें किसन तेली यांच्या... ...ली केली व तीचें गंधर्व येथ... कळवितो ...ची सर्व लबाडी नये कारण आमचा ... झाल आह्मांस कमीपणा आहे व आह्मास ... निमित्त अंदाजा ३५० रुपये खर्च ... तोही व्यर्थ जाईल. इतकेही करून तुह्मी दुसऱ्याशीं गंधर्व लावून द्याल मला योग्य कोर्टात दाद मागावी ल... व त्यास लागणारा सर्व खर्च व ... झालेली नुकसान ३५० रुपये व अ... कसानी बद्दल या नोटीशीच्या खर्चासह भ... घेऊं पुढें कांहीं तक्रार ऐकली जा... नाहीं. कळावें ता. १०-२-१९१२ इ...

सही

गोविंदा सोनाजी तेली ...

...तर सब ... जबाबदार ठरशील याच शेता... ...मास बद्दल दिवाणींत दावा झाला होता त्या... जबद्दल खर्चाची रकम मजला आणून द्यावी नाहींतर याजबद्दल दिवाणींत दावा करिन ही दिली नोटीस कळावें ता. १२-२-१२

दस्तुर गोविंद वा बापूजी पो० रा० आकोला.

सही

गंगाराम वा दादुजी राहणा आपोती बु॥ नि० मोहर

नो० नं० ९१

## नोटीस

इलिचपूर सिव्हिल स्टेशन म्युनीसिपल कमेटीचे हद्दींत राहणार सर्व लोकांस या नोटिशीनें जाहीर करण्यांत ... उमेदवारांना ता. २२ माहे जानेवारी सन ... काम शिक- इसवी रोजीं भरलेल्या सब ... सर बेझनगी १९१२-१३ सालाकरितां पोलीस ... मंडळीच मंगीपट्टी व होदपट्टीचा ठराव ... आहे. शिवाय तरी सदहू कमिटीनें वरील ता... पाची से.य, ठराव ज्या कोणास नामंजूर अस... उत्तेजनार्थ नोटीशीचे तारखेपासून ३० दिवस ... वर्षी- कमिटीकडेस लेखी अर्ज करावे ह्मणजे ... अर्जाचा योग्य विचार केला जाईल दिवसांत मुदतीनंतर कोणाची ही कोणत्याही ... व्यव- तक्रार ऐकली जाणार नाहीं. वरील लोकांना ठरावाचे तक्ते कमेटीचे आफिसांत ... सचे वेळांत सर्वांस पहाण्यास ... कामें कळावें ता. २३ माहे जानेवारी मिळण्या ... ठरतील १९१२ इसवी.

आर. डी. ... होता सेक्रेटरी कमिटी एलिचपूर सिव्हिल स्टेशन म्युनिसिपलिटी

नो. नं. ९२

Registered No. N. 4

# वऱ्हाडसमाचार.

Berar Samachar.

४६ ] आकोला—सोमवार तारीख १९ माहे फेब्रवारी सन १९१२ ई० [ अंक ८


## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाउच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

## नोटिशींचें दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सुचनाः— गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील पाठुडें येणाऱ्या नोटिसास स्पेशल चार्ज पडेल

### जाहिरात

मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटींवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा त्यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर त्यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पाच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमाच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक, आकोला ९।९।०९ } G. A. Phillips. एजंट
नं १

### मुंबई बँकचें सोनें.

मुंबई बँकचा छाप असलेल्या उत्तम कसाच्या सोन्याच्या चिपा मुंबई बँकच्या आकोले व उमरावती येथील ऑफिसांत विकत मिळतील. गिऱ्हाइकानें जास्त माहिती करितां बँकेंत तपास करावा.

एका चिपचें वजन २६३/३ तोळे असतें. साधारण भाव वऱ्हाड समाचार वर्तमानपत्रांत बाजारभाव ह्या सदराखालीं सापडेल.

मुंबई बँक, आकोला २१·९·१० } G. A. Phillips. एजंट
नो० नं० २

## चांदीचीं भांडीं.

### खरें सचोटीचें दुकान.

आमचें दुकानीं शुद्ध चिनई चांदीचीं सर्व प्रकारचीं सुबक व बाटदार भांडीं विक्रीस तयार असतात. माल काळजीपूर्वक वक्तशीर व्ही. पी. नें पाठवूं. मालाचे खरेपणाबद्दल जोखिमदार राहूं. एकवार अनुभव घ्यावा.

पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन.
३ आदितवारपेठ, नासिक

श्री राधावल्लभाजयाति

### वर्षफल ।

हमारे पास सिर्फ १ पोस्टकार्ड पर किसी फल या फुल का नाम लिख भेजो हम आप के एक वर्ष का सुख, दुःख लोभ, हानि जीवन मरण, रोग, सन्तान तरेक्की, मौकूफी, व्यापार में किस वस्तु स लाभ होगा दिसावरी काम में कैसा लाभ होगा और जो महीना हानिकारक उस का उपाय महीनेवार वर्षफल व्ही० पी० द्वारा २। रुपये में भेज देंगे. हमारे यहां जन्म पत्रादि उत्तमोत्तम बनते है अनेक प्रशंसा पत्र मौजुद हैं, विशेष परिचय के अर्थ ०॥ आना का टिकट भेज कर सूचीपत्र मंगा लीजीये.

मिलने का पत्ताः—
गोस्वामी राधामोहन शर्म्मा
नं ४ चिर्त्ताखाना आगरा.


### जाहिर नोटीस.

सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं मुक्काम आकोला, प्रांत वऱ्हाड, येथें आमचे वडील कै० कृष्णाजी दिनकर, एंजिनियर, यांनीं संपादन केलेलें व हल्लीं आमच्या मालकीचें घर, इमला व खुली जागा यासुद्धां, विकावयाचें आहे. हें घर आकोला येथें गांवांत जुम्मामशीदी नजीक आहे सदरील घराचे तीन चार सोयीवार पृथक् भाग होण्यासारखें आहेत. यापैकीं एक अगर अधिक भाग अथवा संबंध वाडा विकत घेण्याची ज्यांची इच्छा असेल त्यांनीं खालीं सही करणार यांजकडे खालीं दिलल्या पत्त्यावर किंवा रा० रा० नारायण खंडेराव फडके वकील, मुक्काम आकोला, यांजकडे किंवा रा० रा० लक्ष्मण जयराम हातवळणे आगरवेशी जवळ मुकुंद बाळकृष्ण यांचा वाडा, मुक्काम आकोला, यांजकडे समक्ष अगर पत्रद्वारें कळवावें, म्हणजे किंमती वगैरे बद्दल खुलासा केला जाईल. व लागेल ती इतर माहिती देण्यांत येईल.

सही

काळू कृष्ण सहस्त्रबुद्धे मुक्काम पुणें, पेठ नारायण, घर नंबर ३४८
तारीख १७ माहे डिसेंबर सन १९११
नो० नं० ५


### खात्रीचीं औषधें विक्रीस तयार.

जोगळेकर आणि कंपनी लिमिटेड आकोला.

यांचें दुकानीं जोगळेकर आणि कंपनी यांनीं तयार केलेलीं खात्रीलायक व सशास्त्र औषधें विक्रीकरितां तयार आहेत तरी ग्राहकांनीं अनुभव घेऊन खात्री करून घ्यावी.

| | | |
|---|---|---|
| सूतशेखर | दर तोळा | ५ |
| चंद्रपुटी प्रवाळ | ” | २॥ |
| सूर्यपुटी प्रवाल | ” | २ |
| अग्निपुटी प्रवाळ | ” | १ |
| नागाच्या गोळ्या | ” | २ |
| महायोगिराज गुग्गुळ | ” | २ |
| खोकल्याच्या गोळ्या | ” | २ |
| पोलादभस्म | ” | ३ |
| लक्ष्मी विलास | ” | १५ |
| त्रिभुवन कीर्ती | ” | ~ |
| श्वास कुठार | ” | ~ |
| सुवर्णमालनीवसंत | ” | ६॥ |
| लघुमालनीवसंत | ” | २ |
| समिर पन्नग | ” | ५ |
| रससिंदुर | ” | ३ |
| चंद्रोदय | ” | १५ |
| हिंगाष्टक चुर्ण | बाटली | ०= |
| डोळ्यांचें औषध | ” | |
| मोठी | ” | ।= |
| लहान | ” | ·।· |
| लिनिमेंट आयोडिन | ” | ·॥· |
| टि. आयोडिन | ” | ।= |
| महावातास्त्र तेल | ” | |
| मोठी | ” | ॥≡ |
| मध्यम | ” | ।–॥ |
| लहान | ” | ०≡ |
| उसांचा शिर्का | ” | ।≡ |
| मध बाटली. | | |
| मोठी | ” | ।– |
| लहान | ” | ०=॥ |
| पेनसावर तेल | ” | ·॥· |
| ग्लिसराईन बाटला. | | ०≡ |
| गजकर्ण अर्क | ” | ।= |
| गजकर्ण मलम | ” | ०≡॥ |
| शंखद्राव. | तोळा | ·॥· |
| कुंचल्यादि वटी | ” | ·॥· |
| हिंगणबेटाचे तेल | ” | ०= |
| नारायण चुर्ण | ” | ०= |
| इच्छाभेदी जुलाब इझन | | ०= |
| ग्रहणी कपाट | तोळा | २॥ |
| मौक्तिक शुक्ति | ” | २ |
| शितोपला चुर्ण | ” | ०= |
| चोपचिन्यादी चुर्ण | | |
| आम वातावर चुर्ण | ” | ०= |

येणेंप्रमाणें औषधें विक्रीस तयार आहेत.
ता. १।१।१२ जोगळेकर आणि कंपनी लि.
नो० नं० आकोला.


### नोटीस

नोटीस बेशमी काशी मर्द पीराजी कोळी रा. घोडचंडी ता. दर्यापूर जि. उमरावती इसः—

खालीं सही करणार रा. आपोती बु॥ ता० व जि० आकोला नोटीशीचें उत्तर देण्यांत येतें कीं तूं दिलेली नोटीस पावली खोटेपणा लिहिण्यांत साधलास परंतु कायदेशीर कामांत त्याचा वाईट परिणाम होण्याचा संभव दिसतो. या पूर्वी तूं मजला राधाची पालण कर्ती आपणास लाऊन ता. १९-५-४ रोजीं माझे नांवें खरेदीखत लिहून आकोले येथील सबरजिस्टरचे कचेरींत बु० नं० १ अ० नं० ४५५ सन ९४ यांस नोंदुन दीलें. असें असतां लबाड लोकांच्या संगतीनें असें खोटेपणाचें कर्म करण्यास तयार होऊन विनाकारण मजला खर्च करण्याचा प्रसंग आणला आहे हें बरोबर नाहीं तुझें मजवर कोणते प्रकारचा हक्क नाहीं तूं केले रपट्यानें शेत दिलें नाहीं व देण्याचा हक्क नाहीं विनाकारण दावा करशील तर सर्व प्रकारचे खर्चाचे जोखमीस जबाबदार ठरशील याच शेताबद्दल दिवाणींत दावा झाला होता त्याबद्दल खर्चाची रक्कम मजला आणून द्यावी नाहींतर याजबद्दल दिवाणींत दावा करिन ही दिली नोटीस कळावे ता. १२-२-१२

दस्तुर गोविंद वा बापूजी पी० रा० आकोला.

सही
गंगाराम वा दादुजी राहणार आपोती बु॥ नि० मोहर
नो० नं० ९१

### नोटीस

इलिचपूर सिव्हिल स्टेशन म्युनीसिपल कमेटीचे हद्दींत राहणार सर्व लोकांस या नोटिशीनें जाहीर करण्यांत उमेदवारांना ता. २२ माहे जानेवारी सन काम शिक- इसवी रोजीं भरलेल्या सभ वर्षे येथें सर बेझनजी १९१२-१३ सालाकरितां पोलीस झेली मंडळीच भंगीपट्टी व हौदपट्टीचे ठराव आहे. शिवाय तरी सदरहू कमिटीनें वरील ता ण्याची सोय, ठराव ज्या कोणास नामंजूर असे उत्तेजनार्थ नोटीशीचें तारखेपासून ३० दिवस वर्षा- कमिटीकडेस लेखी अर्ज करावे म्हणजे दिवसांत अर्जाचा योग्य विचार केला जाईल मुदतीनंतर कोणाची ही कोणत्याही व्यव- तक्रार ऐकली जाणार नाहीं. वरील लोकांना ठरावांचे तर्फे कमेटीचे आफिसांत स्वतःचाच सचे वेळांत सर्वांस पहाण्यास टून कामें कळावे ता. २३ माहे जानेवारी प्रेस मिळल्या १९१२ इसवी. पंत ठेवतील

आर. डी. हेंगा
सेक्रेटरी प्रेसामिल
एलीचपूर सिव्हिल स्टेशन
नो. नं. ९२ म्युनिसिपलिटी

## सन्स आफ इंडिया ऑर्डर

पूर्वी 'भारत संतान' संस्थेबद्दल व तिचे एकंदर घटनेबद्दल, तिचे मूळ उद्देश, त्यांतील मुख्य चालक व संरक्षक तसेंच तिची उत्सुकता, तिचा राजकारणाशीं तसाच सामाजिक धार्मिक व औद्योगिक चळवळीशीं संबंध कसा आहे याबद्दलची हकीगत आपणास पूर्वीच कळविलेली आहे. संस्थेचे मूळ हेतू पूर्ण होऊन सर्व पृथ्वीवर शान्तता देवीचें निशाण फडकेल, सर्वत्र भ्रातृभगिनी भावाचें साम्राज्य होईल. तें युग येईल तो सुदीन आहे. आमचें ध्येय व इष्ट तेंच आहे.

संस्थेचा प्रत्येक सभासद ज्या प्रार्थनेचा नित्य उपयोग करितो व संस्थेचे मूळ उद्देश जे संस्थेचे सभासद होणारास मान्य असणें अत्यंत आवश्यक आहेत त्याचा निर्देश करणें जरूर आहे-- संस्थेची प्रार्थना याचा अर्थ– जो अनेक नामानें आळविला जातो तो विश्वंभर प्रभू आह्मां बंधू भगिनींमध्यें अंतःकरणद्वारें सर्व भारत भूमींत ऐक्यता, सेवा आणि प्रेमाचा उत्साह उत्पन्न करो. संस्थेच्या उद्देशावरून हें सहज लक्षांत येईल कीं संस्थेचें मुख्य ध्येय तरुणास उत्तम नागरिकत्वाचें वळण लावणें हें होय विद्युत् शक्तीस योग्य वळण दिल्यानें अनेक लोकोपयोगी कामें घेतां येतात त्याप्रमाणें जनतेचे ठिकाणीं असणारी उत्सुकता, कर्तबगारी दाखविण्याची ईर्षा लोकोपकारबुद्धि, वगैरे प्रगतीपर गुणास योग्य वळण देणारा मिळाल्यास शेकडों कामें होऊं शकतात. "योजकस्तत्रदुर्लभः" योजनेंप्रमाणें कामें घडत असतात. आज आपणास युरोप अमेरिकेची तसेंच त्यांचे मागून जपान व तुर्कस्थानची जी सुधारणा दिसत आहे तिचें बीज त्या त्या राष्ट्रांतील धुरिणांची योजना होय. थेंबाथेंबानें तळें साठतें व नद्यानालें अमोघ जलौघास पाण्याचा पूरवठा करितात. त्याप्रमाणें राष्ट्रांतील अनंत शक्तिंचीं एकेठिकाणीं संघटना करणारा चतुर पुरुष मिळाल्यास काय होणार नाहीं. जेथें एका काळीं वशिष्ठ वामदेव, वेदव्यास, वाल्मिकी, भवभूति कालिदास, गंगाचार्य, भास्कराचार्य, ब्राह्मण रामकृष्णादिक अवतार एके ... विले तरी राजा हरिश्चंद्र, मकरध्वज राजा शिबी, अगदीं अलीकडील राजे, श्री शिवाजी महाराज, व ...रखे क्षात्रधर्मी राजे वगैरे झाले, ...जरो शिल्पकार ज्यांच्या कामाची ...आज देखील सुधारलेल्या देशांत ...शकत नाहीं असे लोक ज्या ... झाले, ती भूमी आतां अगदींच ...स झाली काय? जमीन ना पीक ...स तिचा एक तर कस गेला पाहिजे ... त्यांत जंगल वाढला असला पाहिजे. दोहोंपैकीं भारत भूमीची सांप्रत स्थिति ... आहे हें पाहिल्यास ती नाकस खझाली नाहीं. तींत जंगल ज्यास्त ...ा आहे. परमेश्वरी सृष्टींत एकही पदार्थ ...र्थ नाहीं या प्रमाणें या जंगलांतील प्रत्येक जीवात्मा महत्वाचाच आहे. परंतु त्यास बगिच्याचें स्वरूप देणाऱ्या माळ्याचीच अवश्यकता आहे. असो, अशा तऱ्हेचें योग्य वळण देण्याकरितां 'भारत संतान' संस्थेचे प्रयत्न आहेत. फायदा करून घेणें न घेणें जनतेचें काम आहे. मागचे वर्षी मी आपणास १९१० सालचे सप्तेंबर अखेरपावेतो, संस्थेचे कामाबद्दल रिपोर्ट केला होता. त्याचे नंतर संस्थेकडून कोणाचीं कामें झालीं याबद्दल थोडक्यांत हकीकत देण्याचा विचार आहे.

इ० स० १९११ हें साल अनेक तऱ्हेनें अत्यंत महत्वाचें झालें. केवळ स्थूलभूमिकेवर काम करण्यास बादशहाचे राज्यारोहणासारखे प्रसंग अद्भुत व स्मरणीय आहेतच परंतु सूक्ष्मभूमिकेवर देखील असेच कांहीं प्रकार घडले असल्याबद्दल तत्वद्रष्टे लोक सांगत आहेत. ता० ११ जानेवारी १९११ रोजीं ग्रहांची अशी कांहीं एक विशिष्ट स्थिति होती कीं ती स्थिति अत्यंत महत्वाची होती, असें तज्ज्ञ लोक व ज्योतिष शास्त्रकोविद सांगत आहेत. याच दिवशीं– 'पूर्वेकडील तारा'–नांवाची संस्था स्थापित झाली. याजबद्दलची हकीकत आपणास मी लवकरच सांगणार आहे. संस्थेच्या मुख्यचालक श्रीमती बेझंटबाई. यांचें मुख्य ध्येय, पृथ्वीवर शांततेचें साम्राज्य व्हावें हा आहे व तदनुरोधानें त्यांचा प्रयत्न सुरू आहे. साम्राज्याचे मुख्य भाग दोन– पूर्व व पश्चिम या दोहोंचे ऐक्य हेंच शांततेचें साम्राज्य. त्यानीं हिंदुस्थानची भावी स्थिति–नावांचा निबंध से. हि. कॉ. मॅगझीन मध्यें लिहिला आहे. तो अत्यंत वाचनीय आहे. त्यांनी ह्मटलें आहे. "इंग्लंड अथवा हिंदुस्थान हीं प्रथकपणें एकंदर मानवजातीच प्रगतीस फारच थोडी मदत करतील. दोहोंच्या ऐक्यतेंत आर्यन बादशाहीचा पाया घातला जाऊन दोन्ही मानववंशांतील जे उत्तम, जें वैभवदायक तें एकवटलें जाईल. असो अशाप्रमाणें त्यांचे महान प्रयत्न सुरू आहेत. त्यांची दिनचर्या अवलोकन केल्यास हें सहज समजून येईल कीं त्यांचें प्रत्येक कृत्य परमार्थाचें असून त्यात स्वार्थाचा लवलेशही नाहीं. बेझंटबाई यानीं चालू वर्षांत त्यांचे नेहमीचे परिपाठाप्रमाणें अनेक ठिकाणीं भाषणें केलीं, नवीन पुस्तकें लिहिलीं, लेख लिहिले. या सर्वांचा इतिहास थोडक्या अवकाशात सांगणें कठीण आहे. हिंदुस्थानांत १९११ सालीं उत्तर हिंदुस्थानात— दिल्ली, आग्रा, कानपूर वगैरे ठिकाणीं त्यांनीं दवरा केला असून त्या ब्रह्मदेशांत गेल्या होत्या. हल्लीं युरोप मधील विशेष करून इंग्लंड, स्कॉटलंड व फ्रान्स वगैरे देशाची सफर करून त्या त्यांचेच शद्बाप्रमाणें आपल्या घरीं परत आल्या आहेत. बेझांटबाई थि० सो० सोसायटीच्या अध्यक्ष असल्यामुळें सोसायटीचा, बाईचा व भारतसंतान संस्थेचा इतिहास एकच असणार. मागेच दिसेंबरमध्यें मद्रास येथें व चालू सालीं बनारस येथें थिऑसोफिचें वार्षिक संमेलन झालें. संमेलनचे वेळीं-भारत-संतान संस्थेंतर्फेही बाईचें निराळें व्याख्यान झालें. व यावेळीं संस्थेंत पुष्कळ नवीन सभासद आले. ...कळवून ...रोधानें वागण्याबद्दल संस्थेचा ...स्थानिशा करीत आहे व त्याप्रमाणें त्यांनीं ... बारंवार छात्र वर्गास उपदेश ...

ता. ११ जानेवारी रोजीं 'प्रभात सूर्य' नांवाची संस्था स्थापित झाली. हीच संस्था जिचा उल्लेख मी कांहीं वेळां पूर्वी केला होता ती पूर्वेकडील तारा' या नावांनें हल्लीं प्रसिद्ध आहे व तिचें कामही मोठ्या उत्साहानें सुरू आहे. या संस्थेचे मुख्य ध्येय लवकरच आपल्या कर्मभूमीवर अवतार घेणाऱ्या जगद्गुरुचें आगमनार्थ तयारी हें आहे. जगावर धर्म संबंधीं जी लाट उसळली आहे तिचा फायदा घेऊन ही संस्था काढली आहे. व तिचे उद्देश फार महत्वाचे आहेत, परमेश्वराचे अथवा श्रीगुरुचे आगमनार्थ तयारी नेहमींच असली पाहिजे यात कांहीं वावगें नाहीं. भारत संतान संस्थेच्या अनेक कार्यांपैकीं हल्लीं विचार सुरू असलेल्या बनारस विश्वविद्यालयाबद्दल प्रयत्न हें एक काम आहे. या संबंधानें वर्तमान पत्रातून चाललेली चर्चा आपण वाचलेली आहे. वर्तमानपत्रांत येणारी चर्चा कितपत निःपक्षपात बुद्धीची व सभ्यतेस धरून असते याचा निर्णय आपणच कराल. वर्तमानपत्रांचे जें पवित्र कर्तव्य योग्य असें लोकमत तयार करणें तसें न करितां राष्ट्र कल्याणास ज्यांनीं आपणास वाहून घेतलें आहे, अशा लोकांची नालस्ती करणें हें झालें आहे. सर्वच वर्तमानपत्रें या आरोपास पात्र आहेत असें मात्र माझें ह्मणणें नाहीं. विश्वविद्यालयाचे कल्पनेस जय मिळण्याचे आड फार मोठीं विघ्नें आहेत. परंतु यात जरी जय मिळाला नाहीं तरी आपणास या भांडणांत शिकण्यासारखें असें पुष्कळ मिळेल. दोन जातीचे लोक एक विशिष्ट गोष्टी करिता प्रयत्न करतात, एकास जय मिळतो दुसरे आपले मस्तकाचे केश तोडीत बसतात या वरून कविरानीं ह्मटल्याप्रमाणें "करमगती टारोनटरे" इतके ह्मणून स्वस्थ बसावें ह्मणजे झालें. अलीकडे झालेल्या एक विचारानें बरीच आशा वाटते आहे. भारत संतान संस्थेतर्फे बेझांटबाईच्या आणखी कांहीं कामाबद्दल उल्लेख करून मी आपली रजा घेतो. बेझांट बाईची इंग्लंडमध्यें बरीच व्याख्यानें झालीं. व तेथील समाजास तीं फारच आवडलीं असें दिसतें. भौतीक शास्त्रांत पारंगत व बहुतेक नास्तिक राष्ट्रांत वाहवा मिळविणें हें कांहीं सामान्य नाहीं. या संबंधानें ख्रिश्चन कामनवेल्थमधील तसेंच रिव्ह्यू आफ रिव्ह्यू मधील बेझांटबाई संबंधानें काढलेले उद्गार वाचल्यानें तुह्मास तेथील लोकमताचे वळण समजून येईल. पॅरिसमधील विद्वान लोकांचे संस्थेकडून बेझांटबाईस व्याख्यान देण्याकरितां बोलाविणें होतें. व्याख्यानाचा विषय 'जी ऑर्डेनोब्रेनो याचा निरोप' हा विषय होता. कित्येक लोकांचे मते या व्याख्यानास सहा हजार पावेतो समाज जमला होता. बाई इंग्रजी प्रमाणें फ्रेंच चांगले बोलतात. इंग्लंड मध्यें निरनिराळ्या मानव जाती तर्फे जी सभा भरली होती त्या सभेंत बेझंटबाईचें भाषण झालें. खरोखर गेल्या सालच्या विशेष व अत्यंत महत्वाचे दोन उद्योगापैकीं या एका उद्योगाचा पाया घातला गेला व त्याचें इष्ट असें फल भावी मानव जातीस मिळो अशी सर्वशक्तिमान परमेश्वराशीं प्रार्थना आहे. बेझंट बाईचे लंडन शहरांत स्वयंसेवक स्त्रियांची जी मिरवणूक निघाली होती. त्यांतही अंग होतें. त्यांचें भाषण सुरू झालें तेव्हां एकदम झालेल्या शांततेचें इंग्लिश वर्तमानपत्रांत फार गमतीचें वर्णन आलें आहे. व्याख्यानांत स्त्रियास बेझांट बाईचा जो उपदेश आहे तो प्रसंगाप अनुसरून खवळलेल्या मनोवृत्तीस उच्छृंखल करण्याचा नसून त्यांचा उपदेश ह्मणजे त्रिकाला बाधित 'सत्य' असा आहे.

## हिंदुस्थानची लोकसंख्या.

हिंदुस्थानात गेल्यासालीं झालेल्या खानेसुमारींत कोण कोणत्या धर्मांचे किती लोक होते या विषयींची माहिती आतां प्रसिद्ध झाली आहे. ती येणें प्रमाणें–

एकंदर लोकसंख्या ३० पासून ३२ कोटि भरेल. त्यांत हिंदु २१॥ कोटि ह्मणजे सरासरी शेकडा ७० आहेत. मुसलमान ६ कोटी ६६ लक्ष आहेत. गेल्या दहा वर्षांत बंगाल्यांत ब्राह्मसमाज व आर्यसमाज याच्या सभासदांची संख्या बरीच वाढली आहे. नुसत्या आर्यसमाजाचे मेंबर १००० नें वाढले आहेत. पंजाब प्रांतात प्लेग व मलेरिया यांनीं सारखें ठाणें दिलें असल्यामुळें तेथील लोकसंख्या बरीच कमी झाली आहे. ख्रिस्ती लोकांची संख्या गेल्या तीस वर्षांत दुपटीवर गेली आहे. सन १८८१ सालीं ती १८ लक्ष ६२ हजार होती. गतवर्षीच्या खानेसुमारीचे वेळीं ती ३८ लक्ष ७६ हजार भरली.

# वऱ्हाडसमाचार.

फाल्गुन शुद्ध २ शक १८३२ दुंदुभिनाम संवत्सरे

## फौजदारी गुन्हे.

मध्यप्रांत आणि वऱ्हाड यांचा १९१० सालचा फौजदारी कोर्टाविषयींचा रिपोर्ट नुकतांच बाहेर पडला आहे, त्यांत पुढील गोष्टी नमूद केल्या आहेत– सर्वांत जास्ती अपराध नागपूर जिल्ह्यांत घडतात. वऱ्हाडात अपराधांची संख्या फार कमी ह्मणजे स्थानिक कायदे मोडल्याचा अपराध करणार १३७९ :१ व इतर अपराध करणारे ९४८ :१ असें प्रमाण आहे. वऱ्हाडांतल्या वऱ्हाडांत तुलनात्मक दृष्टीनें पाहिलें तर इंडियन पीनलकोडाविरूद्ध अपराध करण्यांत उमरावती जिल्ह्याचा नंबर पहिला व आकोला आणि बुलढाणा त्याच्या खालोखाल आहेत. विलायतेंत खटल्यांची सुनावणी फार लांबणीवर पडून निकाल लागण्यास अतिशय विलंब लागतो अशी इंग्रजीत ह्मण आहे. पण आमच्याकडे तरी तशी स्थिती दिसत नाहीं. सामान्यतः खटल्याची मुदत गेल्या सालीं १७ दिवस होती. १९०८

साली हीच १९ दिवस होती. यावरून दिवसेंदिवस सुधारणा आहे असें समाधान मानण्यास जागा आहे. याही वर्तीत मध्यप्रांतापेक्षां वऱ्हाडची कोर्टें आपला श्रेष्ठपणा शाबीत करीत आहेत हें पाहून आह्मांस अभिमान वाटतो. मध्यप्रांतांत रायपूर सारख्या कोर्टाची सरासरी २९ दिवस आहे; मंडाला ३७ दिवस व छिंद्वाडा ४१ आहे! तीच आमच्या आकोल्याची फक्त ९॥ दिवस आहे! ज्युडिशिपल कमिशनर साहेबाकडे झालेल्या अपिलांची संख्या गेल्या साली फारच कमी होती. सेशन्सकोर्ट व डिस्ट्रिक्ट कोर्ट यांच्याकडच्या अपिलांचीही हीच स्थिति होती. यावरून खालच्या कोर्टांनीं दिलेले निकाल लोकांना समाधानकारक व न्यायाचे वाटूं लागले आहेत असें समजावयाचें कीं अपिल करण्यांत अर्थ नाहीं, पैसा मात्र फुकट जातो अशी समजूत लोकांची झाली आहे असें मानावयाचें तें कळत नाहीं. कदाचित् अपराधी ठरलल्यांचें दारिद्र्यही अपील करण्याला प्रतिबंधक होत असेल. अपराधांची संख्या कमी कमी होत चालली आहे तरी मॅजिस्ट्रेटांची संख्या वाढत आहे. र्स्टक्लास पॉवर माजिस्ट्रेटांची संख्या गेल्या साली १० झाली. सेकंड क्लास ६९ व थर्ड क्लास ची संख्या २१७ होती. कित्येक लोकांना निष्कारण दुसऱ्याचे विरुद्ध फौजदारी कोर्टांत तक्रार करून खटला उपस्थित करण्याची खोड लागली असते. तक्रारींत कांहीं अर्थ नसतो व या कधीं कधीं द्वेषमूलक असून निष्कारण कोर्टाचा वेळ मात्र घेतात. यासाठीं नॉन कॉग्निझबल केसमध्यें कोर्ट फी वाढवावी अशी सूचना नागपूर, सीवनी व जबलपूर येथील डि. मॅजिस्ट्रेटांनीं केल्या आहेत.

## म्याजिस्ट्रेटांचा ढिलेपणा

कित्येक लोक दुसऱ्यांच्या विरुद्ध निष्कारण खोट्या फिर्यादी लावून फौजदारी कोर्टाला व त्या बरोबरच निरापराधी सद्गृहस्थांना त्रास देतात, सबब अशा तक्रारींना निर्बंध घालण्यासाठीं कोर्ट फीचे दर वाढवावे ह्मणजे खर्चाला भिऊन तरी लोक अशा कृत्यापासून पराङ्मुख होतील अशा सूचना मध्यप्रांतांतील कित्येक डि० माजिस्ट्रेटांनीं केली आहे याबद्दलचा उल्लेख वर आलेलाच आहे. हाच प्रश्न मुंबई इलाख्यांतल्या अधिकाऱ्यांना येऊन पडला असतां त्यांनीं निराळाच मार्ग सूचविला आहे आणि तो नवीन आहे असें नाहीं. तो मार्ग ह्मणजे क्रिमिनल प्रोसीजर कोडच्या २५० व्या कलमानें म्याजिस्ट्रेटाला जो अधिकार दिला आहे त्याचा वेळोवेळीं उपयोग करणें हा होय. फिर्यादी केवळ दुसऱ्यास त्रास देण्यासाठीं किंवा द्वेषानें दुसऱ्या विरुद्ध तक्रार करीत आहे असें दिसून येईल तेथें म्याजिस्ट्रेटांनीं फिर्यादीला दंड करावा किंवा त्याचेकडून आरोपीला नुकसानी देववावी असें त्या कलमांत सांगितलें असतां या अधिकाराचा उपयोग माजिस्ट्रेट वेळोवेळीं करून कां दाखवीत नाहीं तें कळत नाहीं. माजिस्ट्रेटांचा हा ढिलेपणा अशा फिर्यादींना अप्रत्यक्ष उत्तेजन देत असतो. सदर कलमाच्या अर्थासंबंधानें कांहीं वाद असला तर तो अर्थ स्पष्ट करून घेण्याची खटपट माजिस्ट्रेटांनीं करावी; पण कोर्ट फी वाढवून या गोष्टीचा बंदोबस्त होईल असें आह्मांस वाटत नाहीं. स्वतःचे पैसे घालवून दुसऱ्यास त्रास देण्यांत आनंद मानणाऱ्या नरपशूंना कोर्ट फी वाढविण्यानें कायद्याचा धाक कसा वाटेल?

## एक महत्वाचा प्रश्न

सुशिक्षित हिंदी लोकांमध्यें अल्पवयांत होणाऱ्या मृत्यूचें प्रमाण दिवसें दिवस वाढतें आहे ही गोष्ट पुष्कळ वर्षांच्या अनुभवावरून सर्वांना बहुतेक पटल्या सारखी आहे. हा प्रश्न सुमारें पंधरा वर्षांपूर्वीं परलोकवासी न्या० रानडे यांनीं लोकांच्या निदर्शनास आणिला होता, आणि त्याला अंशतः कारण युनिव्हर्सिटीचा अभ्यासक्रम हें आहे असें सूचित केलें होतें. तें कारण गेल्या पंधरा वर्षांत कोणत्याही अंशानें आमच्यानें दूर करवलें नाहीं; उलट दिवसें दिवस अभ्यासाच्या विषयांत वाढ होऊन परीक्षकांची अपेक्षाही वाढत चालली आहे. या गोष्टीचा परिणाम विद्यार्थ्यांच्या शरीरावर घडून त्यांच्या शक्तीचा ऱ्हास झपाट्यानें होत आहे. अभ्यासाचें ओझें हें एकच कारण या ऱ्हासाला असतें तरी ती विचार करण्यासारखीच गोष्ट होती पण त्या बरोबर इतरही कांहीं कारणें देतां येतील. पैकीं कांहीं सामाजिक व औद्योगिक स्वरूपाचीं आहेत. दिवसें दिवस जीवनार्थ कलह ज्यास्त ज्यास्त तीव्र होत चालल्यामुळें व सरकारी नोकऱ्या मिळविण्याचे मार्गांत जाति, पोटजाती, वगैरे सारख्या नव्या नव्या अडचणी येऊं लागल्यामुळें निर्वाहाचीं साधनें कशीं मिळतील ही चिंता तरुण वयांतच मुलांना जाळून टाकीत आहे. या जीवन कलहाच्या तीव्रपणा बरोबरच आमच्या तरुणांत खाण्यापिण्यासंबंधानें, व पोषाख, नाटकासारखे करमणुकीचे प्रकार इ० संबंधानें नवीं नवीं व्यसनें जडत आहेत. वाढतें दारिद्र्य, नोकऱ्या मिळण्याची अडचण, आणि महागाईचे दिवस ही त्रयी आमच्या तरुणांचें रक्त शोषून घेणाऱ्या जळवा एकसारख्या लागल्यावर शक्तीच्या ऱ्हासाविषयीं अधिक बोलण्याचें कारणच नाहीं. हीं सगळीं किंवा निदान यातलीं बरींचशीं कारणें दूर करणें हें व्यक्तींच्या हातचें नाहीं. हा प्रश्न सरकार, शिक्षण खात्याचे अधिकारी, युनिव्हर्सिटी व समाजाचे पुढारी यांनीं एका ठिकाणीं जमून सर्वांच्या अनुमतीनें सोडविण्याचा आहे. पण या दिशेनें अद्यापपर्यंत कोणी प्रयत्न केलेला नाहीं आतां ना. मि. कृष्ण स्वामी आयर यांच्या अकालीं मृत्यूनें सदर प्रश्न पुनः एकवार पुढें आणिला आहे व मि० लाला बैजनाथ सारख्या सामाजिक सुधारणावादी पुढारी गृहस्थानें तो हातीं घतला आहे. तेव्हां त्यांनीं आह्मी वर दर्शविल्याप्रमाणें युनिव्हर्सिटीचे चालक, सरकारी अधिकारी व लोकांचे पुढारी यांचें साह्य मिळवून या प्रश्नाची पूर्ण शहानिशा करावी अशी आमची नम्र विनंति आहे.

## इंग्लंड, रशिया, इराण व चीन.

इराणांत राशियानें धूम माडून तेथें एक लहानसा वणवा पेटवून दिल्यावर त्याचें लक्ष आतां चीनकडे लागलें आहे. चीन देशाचा एखादा तुकडा तरी आपणांस मिळावा ही राशियाची इच्छा आज फार दिवसांची आहे. मंगोलिया प्रांताला न्याय मिळवून देण्याचा बहाणा करून राशीया चीनच्या कारभारांत ढवळाढवळ करूं पाहत आहे अशी बातमी थोड्या दिवसां पूर्वीं रूटरनें कळविली होती. चीन देशांत जागृति होऊन लोक तेथील राजसत्तेला उलथून पाडतील व तेथच्या सिंहासनावर लोकसत्तात्मक राज्याच्या अध्यक्षाला बसवितील असें स्वप्न फार दिवसांपासून राशियाला पडलें होतें. चीनच्या जागृतीचा फायदा घेऊन मांगोलियन लोकांची चीन विरुद्ध उठावणी करण्यास रशियाला आयतीच संधी मिळाली. इराण कमकुवत झालेलें पाहून तो देश आपल्या काबूत आणण्याची संधी जशी राशियानें साधली, तसाच प्रकार चीनमध्यें करण्याचा रशियाचा प्रयत्न आहे, व यासाठीं इंग्लंडशीं असलेल्या आपल्या स्नेहसंबंधाचा उपयोग करण्याचेंही त्याच्या मनांत आहे. इंग्लंडच्या परदेशखात्याच्या प्रधानानें तर उघड उघड सांगितलेंच आहे कीं इराणची स्वतंत्रता किंवा अखंडपणा कायम ठेवण्यांस इंग्लड वचनबद्ध नाहीं. इराणसंबंधानें कदाचित् हें खरें असेल, पण चीनच्या संबंधानें तसें ह्मणतां येईल कीं नाहीं याची शंका आहे. कारण चीन व जपान यांच्यांत झालेला तह व जपान आणि इंग्लंड यांच्यांत झालेल्या स्नेहसंबंधाच्या शर्ती या पाहिल्या ह्मणजे चीनची स्वतंत्रता आणि अखंडपणा कायम ठेवण्याची जबाबदारी जेवढी जपानच्या तेवढीच इंग्लंडच्या डोक्यावर आहे असें खात्रीनें कोणाला ही वाटेल. दृष्टीनें पाहिलें ह्मणजे रशियानें चालविलेल्या कारस्थानाला आह्मी ओळखून आहों, व हें त्याचें वर्तन आह्माला बिलकुल नापसंत आहे असें इंग्लंडनें जाहिर करावयास पाहिजे व राशियालाही तशी सूचना द्यावयास पाहिजे आहे. मंगोलिया प्रांतांतून चीनमध्यें रेलवेची सडक आणून सगळा चीन देश आपल्या काबूत आणण्याचें राशियाचें धोरण स्पष्ट दिसत आहे. जपानी लोकांना हें धोरण दिसूं लागलें आहे व यांत भावी अनर्थाचें बीज आहे असें जपानी पत्रें उघड उघड ह्मणूं लागलीं आहेत. मग इंग्लडनेंच येवढें अज्ञानाचें घुंगरट घेऊन बसण्याचें कारण काय तें कळत नाहीं.

## अतिशय भरभराटलेला स्वदेशी कारखाना.

पार्लमेंटचे माजी सभासद मि० हारोल्ड कॉक्स यांनीं कलकत्त्याच्या स्टेटसमन पत्रांत नागपूरच्या एंप्रेस मिलला 'खरें स्वादशी घाडस' असें नांव देऊन तिच्या सुव्यवस्थेची, आणि कामकरी वर्गाबद्दलच्या काळजीची आणि मालाच्या [illegible] तारीफ केली आहे व [illegible] र सर बेझनजी दादाभाई यांना त्याबद्दलचें योग्य [illegible] य दिलें आहे. ही तारीफ व सर बेझनजी [illegible] दिलेलें श्रेय अगदीं वाजवी आहे कोण ह्मणणार नाहीं? एंप्रेस मिल[illegible] उभारणी पसतीस वर्षांपूर्वीं मि० [illegible] एन० टाटा यांच कडून झाली. त्या[illegible] त्यावेळीं १९ लक्षांचें भांडवल उभार[illegible] कामाला सुरुवात केली त्या वेळीं नागपुर किंवा त्याच्या आसपास दुसरी कापडा[illegible] गिरणी नसल्यामुळें कच्चा माल सगळा [illegible] गिरणीकडे येऊं लागला. शिवाय जमीनह[illegible] स्वल्प किंमतींत मुबलक मिळाल्यामुळें गिर[illegible]णीचा विस्तार हवा तेवढा करतां आला[illegible] गिरणीची व्यवस्था आरंभापासून त्यावेळचे मि० [ आतां सर ] बेझनजी यांच्या सारख्या उद्योगी, मुकाट्यानें काम करणारे अत्यंत विश्वासु आणि व्यापारी पण उदार दृष्टीचे माणसाचे हातीं असल्यामुळें ३५ वर्षांत या गिरणीचा उत्कर्ष अपेक्षेच्या बाहेर अमर्याद झाला यांत नवल नाहीं. पूर्वी या गिरणीच्या एकेका शेअरची किंमत ५०० रु. होती ती आतां १९०० रु. झाली आहे! मूळच्या १९ लक्ष रुपयांच्या भांडवलावर व्याज व नफा मिळून आतां सुमारें ९४ लक्षांची वाढ झाली आहे. जमिनीची व यंत्रांची किंमत मिळून ही किंमत झाली. याशिवाय मोडतोड व नवीं यंत्रें मागवावीं लागतात त्यासाठीं काढून ठेवलेले २९ लक्ष रु. निराळच आहेत. आतांपर्यंत शेअरहोल्डरांना शेंकडा ४२ या प्रमाणें व शिवाय एकेका शेअरामागें दोन दोन शेअर नफ्याचें मिळाले. असलें भाग्य हिंदुस्थानांत दुसऱ्या कोणत्याही कारखान्याचे वाट्यास आलेलें नाहीं. खुद नागपुरांत एंप्रेसमिलच्या समोर नागपूरच्या नामांकित देशी गृहस्थांच्या देखरेखीखालीं व त्यांच्याच उभारणीनें 'स्वदेशी' या नांवानें एक गिरणी निघाली होती, पण दहाबारा वर्षांतच तिचें पाऊल खोलांत जाऊन ती शेवटीं एंप्रस मिलनेंच खरीद केली! व आमच्या पुढाऱ्यांच्या कर्तृत्त्वाबद्दलचा भ्रमाचा भोपळा फटला. एंप्रेस मिलच्या या अनपेक्षित अमर्याद भरभराटीला जीं कारणें झालीं त्यांपैकीं कांहींचा उल्लेख वर केलाच आहे. कॉलेजांतल शिक्षण मिळालेल्या व खऱ्या हुशार उमेदवारांना या गिरणींत व्यवस्थापकाचें काम शिकविण्याची सोय असल्यामुळें येथें सर बेझनजी यांच्या तालमींत तयार झालेली मंडळीच बहुधा येथें काम करणारी आहे. शिवाय मजुरांना व नोकरांना राहण्याची सोय, चांगलें काम केल्याबद्दल उत्तेजनार्थ दरसाल बाक्षिसें, २५ वर्षांच्या नोकरीनंतर पेनशन, दुष्काळाचे दिवसांत स्वस्त दरानें धान्य विकत मिळण्याची व्यवस्था वगैरे गोष्टीमुळें एंप्रेस मिलच्या लोकांना हा कारखाना ह्मणजे आपला स्वतःचाच आहे इतकें प्रेम वाटून ते झटून कामें करतात. सगळेच कारखानदार एंप्रेस मिलच्या उत्कर्षाचें हें रहस्य नीट लक्षांत ठेवतील आणि केवळ द्रव्यलोभास वश न होतां मजूर वर्गाचें प्रेम संपादतील तर एंप्रेसमिल प्रमाणें तेही द्रव्यलाभाबरोबर कीर्ति लाभ आणि उद्योगाचा उत्कर्ष संपादतील.

## बंगाली भाषेचा उत्कर्ष.

हिंदुस्थानांतल्या सगळ्या देशी भाषांत ग्रंथसंग्रह व ग्रंथाचा उत्कृष्टपणा या दोहो-बाबतींत बंगाली भाषाच श्रेष्ट ठरते आणि तसें होण्याला तशींच कारणेंही आहेत. बंगाली लोकांचीं मनें भावनाप्रधान आहेत. ह्मणून मातृभाषेविषयीं त्यांचें ठायीं जसें प्रेम आहे तसें अन्य लोकांत दिसत नाहीं. शिवाय मायलेक मधुसूदन दत्त यांच्या काळापासून ह्मणजे समारें ३०।४० वर्षे इंग्रजी शिकून तिच्यात निष्णात झालेल्याचा ओघ मातृभाषेंत ग्रंथरचना करण्याकडे वळल्यामुळें राजा राममोहनराय, मायलेक मधुसूदन दत्त, मि. रमेशचंद्र दत्त, मि० सत्येंद्रनाथ टागोर, मि० अक्षयकुमार दत्त, बंकीमचंद्र व मि० बिपिनचंद्रपाल यासारखी मंडळी जशी इंग्रजींतले फर्डे लेखक ह्मणून प्रसिद्ध तशीच बंगाली भाषेंतले नाणावलेले लेखक ह्मणनही प्रसिद्धीला आली. मातृभाषेचा अभिमान याच्या मुळाशीं आहे व त्यामुळेंच स्वभाषेंतल्या उत्कृष्ट लेखकांचा सन्मान ते वेळोवेळीं करीत असतात. बाबू रवींद्रनाथ टागोर यांनीं गेल्या पंचवीस वर्षांत बंगाळी भाषेची एकनिष्टपणें सेवा करून कविमंडळांत श्रेष्टपद मिळविलें ह्मणून नुकतीच त्यांची ज्युबिली बंगाली लेखक वर्गानें मोठ्य थाटानें केली. आतां दुसऱ्या एका चांगल्या लेखकाचाही असाच सन्मान करण्याचें घाटत आहे. बंगाली भाषेंत एन्सायक्लोपीडियासारखा प्रचंड कोशग्रंथ लिहून 'विश्वकोष' या नांवानें प्रसिद्ध करणारे प्राच्यविद्या महार्णव बाबू नगेंद्रनाथ बोस यांस सार्वजनिक मानपान देण्याचा विचार चालू आहे. मि० बोस हे आज २६ वर्षे या विश्वकोषासाठीं अविश्रांत परिश्रम करीत होते. शेवटीं एकदांची त्यांच्या हातून त्या ग्रंथाची समाप्ति होऊन बंगाली वाङ्मयांत 'विश्वकोषा'नें अढळ पद मिळविलें. या ग्रंथाचे सुमारें ६० भाग असून त्यांची किंमत १०० रुपयांच्यावर आहे असें कळतें. ज्या भाषेंत येवढाले प्रचंड ग्रंथ लिहिणारे लेखक व वाचणारे वाचक आहेत त्या भाषेनें इतर देशी भाषांवर श्रेष्ठत्व मिळवावें यांत काय आश्चर्य आहे!

## मद्यपान निषेध व शास्त्राधार.

कांहीं वर्षांपूर्वी पुण्यास सोमरस हा मद्यासारखा मादक पदार्थ होता काय याविषयीं पर लो० प्रो० जिनसीवाले व सुधारकपक्षाचे कांहीं लोक यांच्यामध्यें वाद निघाला होता. जरी तो मादक होता असें गृहीत धरलें तरी त्यावरून प्राचीन काळीं आमच्यांत मद्यप्राशनाचें व्यसन होतें असें ह्मणतां यावयाचें नाहीं. मद्यप्राशनाविरुद्ध आमच्या संकृत ग्रंथांतून इतके आधार काढून देतां येतील कीं विरुद्धपक्षाचा यत्न अगदींच निष्फळ ठरेल. मनुसंहितेंत मद्यपान हा केवढा घोर अपराध गणिला आहे! ब्रह्महत्या, व गुरुपत्नीगमन यांच्या इतका तो घोर समजला आहे! हा अपराध करणारानें सदेह अग्निप्रवेश करावा किंवा जलसमाधि घ्यावी, किंवा तप्त तेल, तूप, किंवा जल यांत मज्जन करावें असें सांगितलें आहे (मनुसं अध्याय ११) मद्य हें नुसतें अपेयच आहे असें नाहीं तर अदेय व अग्राह्यही त्याच ग्रंथांत ठरविलें आहे. वायुपुराणांत ह्मटलें आहे 'चतुर्वर्णेरपेया स्यात् सुरा स्त्रीभिश्च नारद।' श्री रामचंद्र क्षत्रीय असून मद्यपान करीत नसत ('न मांसं राघवो भुक्तं न चैव मधु सेवते'।) बौद्धकाळीं मद्यपान बुद्धाच्या आज्ञेनें पूर्णपणें निषिद्ध केलें होतें. पुढें वैष्णवपंथाचा उदय झाला तेव्हां श्री चैतन्यदेव यानेंही मद्यपानाचा निषेधच केलेला आढळतो. आमच्या साधुसंतांनीं मद्यपानाविषयीं उल्लेख कोठें केलेले नाहींत. तथापि मद्यपि समाजांतून सर्वथा वर्ज्य होत असें ह्मणून उदाहरण देतांना आपल्या मनांतला निषेध प्रकट केला आहे. त्याकाळीं शास्त्रग्रंथांविषयीं लोकांच्या मनांत पूर्ण आदर वसत असल्यामुळें शास्त्रांनीं निषिद्ध मानलेल्या गोष्टी 'दुरतःपरिवर्जयेत्' असें सगळे लोक मानीत व त्याप्रमाणें आचरण ठेवीत आतां शास्त्रांनाच दूरतःपरिवर्जयेत् ह्मणून बहिष्कार घालण्याची वेळ आली आहे तेव्हां 'मद्यपान करण्याचा हक्क' यासारखे कर्णकटु शब्द ऐकू येऊं लागले आहेत! हीच कां आमची ब्रिटिश अमलाखालची नैतिक उन्नति!

## साखरेचे कारखाने

हिंदुस्थानांत असे अनेक उद्योग धंदे आहेत कीं ज्यांना सरकार कडून थोडेंसें उत्तेजन मिळाल्यास ते लवकर भरभराटतील, पण तें न मिळाल्यास कायमचे नष्ट होतील साखर तयार करण्याचा उद्योग हा असा प्रकारचा आहे. हिंदुस्थानांत उंसाची लागवड बरीच आहे. ही उंसाची जात वेस्ट इंडीज किंवा मारिशस बेटांत होणाऱ्या उसा इतकी चांगली— साखरेचें भरपूर माप पदरांत टाकणारी- नाहीं हें खरें, तरी हिंदुस्थानाली दरसाल लागणाऱ्या ८० लक्ष टन साखरे पैकीं एक चतुर्थांशाहून अधिक इतकी साखर सध्या या देशांत उत्पन्न होते. अधिक साखरही तयार करतां येईल पण त्यापूर्वी आपल्या देशांतल्या उंसाच्या लागवडींत आणि साखर करण्याच्या कृतींत पुष्कळच सुधारणा केली पाहिजे. पुसा येथें कांहीं महिन्यापूर्वी या प्रश्नाचा विचार करण्यासाठीं शास्त्रज्ञांची एक परिषद भरली होती आणि पुष्कळ विचार व चर्चा होऊन शेवटीं असें ठरलें कीं या सुधारणा फार अवश्य आणि लवकर व्हावयास पाहिजे आहेत. यासाठीं अग्रिकलचर बोर्डानें उंसाच्या लागवडीच्या प्रयोगासाठीं कांहीं स्थळें निवडलीं आहेत, आणि या ठिकाणीं ऊंस पिकवून तेथेंच त्याच्या रसाची साखर करण्याचे कारखानेही उभारण्याचा विचार आहे. अशा कामासाठीं सरकारनें सवलतीं अगदीं माफक दरानें—किंबहुना फुकट सुद्धां—दिल्या पाहिजेत. कारखाने काढणाऱ्यांना भांडवलही सरकारानें पुरवावें. त्या कारखान्यांचे शेअर विकत घेतले पाहिजेत तसेंच लागेल ती शास्त्रीय सल्लामसलत सरकारी खोटी नोटीच्याकडून फुकट देववावी; व या कारखान्यांत उत्पन्न होणाऱ्या साखरेचा खप वाढविण्यासाठीं अन्य तऱ्हेनेंही उत्तेजन द्यावें. सरकारची इच्छा मदत करण्याची आहे याविषयीं शंका नाहीं. तेव्हां वर सांगितलेल्या पैकीं एक, अनेक किंवा सर्व दिशांनीं मदत करून साखरचे कारखाने उदयास आणण्याचें श्रेय तें घेईल अशी हिंदुस्थानच्या राजनिष्ट प्रजेस आशा वाटत आहे.

## पार्लमेंट उघडलें.

ता० १९ रोजीं पार्लमेंट उघडलें त्यावेळच्या बादशहाच्या भाषणांत परकीय राष्ट्रांशीं इंग्लंडचा संबंध, साधारणपणें युरोपची राजकीय स्थिती, पार्लमेंटपुढें येणारीं बिलें इ० गोष्टी नेहमीं प्रमाणें होत्याच; पण विशेषतः हिंदुस्थानातल्या लोकाची वर्तणूक दिल्ली दरबारच्या वेळीं कशी राजनिष्टेची व शांततेची होती तें सांगून बादशहांनीं हिंदुस्थाना विषयींचा आपला आदर व्यक्त केला ही गोष्ट यंदा विशेष होती. बादशहाच्या मागून झालेल्या वादविवादाचे वेळींही लॉर्ड क्रू यांनींही बादशहाच्या विधानास आपल्या स्वतःच्या अनुभवाची पुष्टी दिली, आणि बादशहाचें हिंदुस्थानांतलें आगमन इतकें यशस्वी झालें या बद्दलचें श्रेय पुष्कळ अंशानें बादशहाचा निर्भिडपणा, साधी राहणी, आणि सरळ व्यवहार यांना दिलें पाहिजे असें सांगितलें. बंगालच्या फाळणींत केलेले फेरफार व कलकत्याचे ऐवजीं दिल्ली राजधानी करणें वगैरे विषयासंबंधानें व एकंदर हिंदुस्थानच्या राजनितीसंबंधानें येत्या बुधवारीं पार्लमेंटांत वादविवाद व्हावयाचा आहेच. तथापि हा वादविवाद आतां केवळ शाब्दिक होईल, त्या वादविवादाच्या योगानें बादशहानें स्वतः जाहिर केलेल्या देणग्यांत किंवा राज्यकारभारविषयक गोष्टींत उलथापालथ व्हावयाची नसल्यामुळें त्या वादविवादाचें महत्व बरेंच कमी झालें आहे. पार्लमेंटातल्या वादविवादांत आणखी दुसऱ्या ज्या गोष्टी निघाल्या त्या मुख्यतः हाल्डेन साहेबाचें 'रहस्यमय मिशन,' इराणाविषयींचें इंग्लंडचें धोरण, होमरूल इ० होते. हाल्डेन मिशनला मि० बॉनरलॉ यांनीं रहस्यमय असें जें विशेषण दिलें तें सर्वथैव योग्य आहे. लॉर्ड हाल्डेन यांचा जर्मनीला जाण्यांत युनिव्हर्सिटीसंबंधाचा शोध हा एक हेतु असेल, पण तोच केवळ हेतु हाता असें मानण्यास लोक अद्याप तयार नाहींत. अंतःस्थ हेतु कांहीं ही असो, पण इंग्लंडचे प्रधान जर्मनीला व जर्मनीचे इंग्लंडला वेळोवेळीं गेल्यापासून त्या दोन राष्ट्रांत परस्पराविषयीं स्नेहभाव वाढत गेला तर ती गोष्ट इष्टच आहे. इराणांतून राशिया आपलें सैन्य काढून नेत आहे, व इराणाचा राज्यकारभार सुव्यवस्थितपणें चालण्यासाठीं राशिया एक लक्ष पौंड, हिंदुस्थान सरकार पन्नास हजार पौंड, व विलायत सरकार पन्नास हजार पौंड अशा रकमा कर्जाऊ देणार आहे असें मि० आस्क्विथ यांनीं जाहिर केलें. पार्लमेंटापुढें बजेटावर लवकरच वादविवाद व्हावयाचा आहे. त्यावेळीं या कर्ज देण्याचे मुद्यावर चर्चा होईलच.

## वऱ्हाडवृत्त

हवामान--ढग जमतात व गर्मी भासूं लागते. पण थोडा कांहीं अधीक काल राहील असें वातावरण सांगतें. गेल्या वद्य पक्षांतील पर्जन्यानें व गारपिटीनें रब्बीच्या उभ्या पीकास बराच धक्का पोचला. ईशकृपेनें रोगराई कांहीं नाहीं.

रा० रा० काशीनाथ श्रीराम जठार असि० कमिशनर हे येथील फारेस्ट खात्याच्या स्पेशल कामावर दाखल झाले.

**पंचांग**—नागपूर रेखांशाचें ग्रहलाघवीय पंचांग वे. सं. रा. रा. भाऊजी धुंडिराज ग्रामजोशी यांनीं केलें आहे. ह्याची छपाई चांगली असून आपल्या प्रांताला फार उपयोगी आहे. १८३४ चें हें प्रांतिक पंचांग ग्राहकांनीं अवश्य घ्यावें अशी आह्मी शिफारस करितों.

रा. रा. सय्यद अहमद हुसेन एक्स्ट्रा असि. कमिशनर यांस आकोल्यांस नेमण्यांत आलें.

रा. रा. देवराव तुकाराम देशमुख कुऱ्हे यांस चांदूर येथील बेंचावर आननरी माजिस्ट्रेट नेमण्यांत आलें.

**कृषिविद्यालय**—वऱ्हाडच्या 'एडवर्ड स्मारक फंडां'च्या रकमेचा विनियोग येथील शेतकीच्या प्रयोगालयाला जोडून एक शेतीची शाळा काढण्याकडे करावा असा विचार आहे. आर्ट कालेज नको पण त्याच्या ऐवजीं ही संस्था स्थापित करावी ह्मणून विचार करण्यासाठीं गेल्या मंगळवारीं एक कची सभा भरली होती. दोन वर्षांचा अभ्यासक्रम ठेवण्यांत येणार असून मराठी शिकलेल्या विद्यार्थ्यांस याचा लाभ करून घेतां येईल. नागपूरच्या शेतकी कॉलेजाला इंग्रजी म्याट्रीक्युलेशन परीक्षा लागते. ती नड दूर केली असून अभ्यास तितक्याच उच्च प्रतीचा लवकर संपादण्याची सोय होणार आहे.

## आकोला बाजारभाव.

| | | |
|---|---|---|
| हुंडी दर्शनी | | ९९।॥≡ |
| मुंबई ब्यांकेची सोन्याची चीप दर तोळ्यास | | २४८- |
| चांदीचा | | ७३ |
| जवारी नवी | ६० | ६५ |
| गहूं | | १०० |
| गहूं बनशी | ११० | ११५ |
| चणे | | ३॥. |
| तेल | | ८।- |
| तुप | | १३ |
| सरकी | | १०॥ |
| कापूस | | ६८ |
| जवस | | १९० |
| तीळ | | १६५ |


## *Advertisement.*

It is hereby notified for the information of the public that the following moveable property belonging to late Mr. A. C. Brice of Murtizapur will be sold by public auction in the local market at Akola on the 15 th March 1912:—

1 Double—barrelled 12 bore shot gun (left barrel burst) with a brown canvas cover.

1 Single-barrelled rifle (bore not known) with a wooden case containing re-sizer (4 pieces in all) and a piece of wood.

1 Air Gun. No 103

Dated Akola, the 15 th February 1912 } A. D. Bair District and Sessions Judge, West Berar.

## नोटीस

आकोला म्यु० कमेटी

आकोला म्युनिसिपल कमीटीनें लागू केलेले नवीन संगीपट्टीचे नियम, सी. पी. ग्याझेट नोटिफिकेशन नंबर ५६ तारीख २०-१ १२ (सी. पी. ग्याझेट तारीख २७-१-१२ पहा) मध्यें प्रसिद्ध झाले आहेत. सदहू कर ता० १-४-१२ इ. पासून अमलांत आणण्याबद्दल कमीटीनें ता० ७ २-१२ इ. रोजीं स्पेशल ठराव केला आहे. व वऱ्हाड म्यु० कायद्याचे कलम ६१ (१) अन्वयें सदरील कर माफी वगैरे बद्दल खालील केलेले नियम सर्वांचे माहितीकरितां प्रसिद्ध करण्यांत येत आहेत.

१ कोणत्याही घराचे अगर जमीनीचे वहिवाटदारास, अगर त्याठिकाणीं राहणारांस सदर्हु घर अगर जमीन सोडून जाणें असल्यास व त्याबद्दल कराची माफी मागण्याची अगर दुसरे कोणत्याही सबबीवर कर कमी करून घेण्याची इच्छा असल्यास त्यानें प्रत्येक तिमाहीचे पहिल्या १० दिवसाचे आंत (ह्मणजे एप्रिल, जुलै, ऑक्टोबर व जानेवारीचे १० तारखेचे आंत त्याबद्दल म्युनिसिपालीटीकडे लेखी खबर द्यावी.

२ नियम १ प्रमाणें नमूद केलेले मुदतीचे आंत वर प्रमाणें खबर न दिल्याव म्युनिसिपालीटीचे हद्दींतील कोणत्याही घराचे अगर जमीनीचे वहिवाटदारास अगर त्यांत वस्ती करणारांस, तिमाहीबद्दल पूर्ण कराची रकम द्यावी लागेल. आकोला ता० १०-२-१९१२

R. M. Gupte

चअरमन स्यानिटेशन कमीटी आकोला

नों० नं०

---

## जाहिरात

आकोले म्यु० कमीटी करतां एप्रिल १९१२ इ. पासून दरमहा १५ रुपयावर एक कॉनसरव्हन्सी क्लार्क पाहिजे. ज्यांची येण्याची इच्छा असेल त्यांनीं १५ मार्च १९१२ पर्यंतचे आंत खालीं सही करणाराकडे अर्ज करावा. ज्याला इंग्रजी येत नाहीं, त्यांना अर्ज करण्याचे कांहीं कारण नाहीं. अर्जांत किती शिक्षण झालें आहे, वय किती, व पूर्वीं कोठें नोकरी केली असल्यास त्याजबद्दलची माहिती असावी. आकोला ता० १०-२ १२

R. M. Gupte

चेअरमन स्यानिटेशन कमीटी आकोला

नों० नं० ९४

---

## नोटीस.

रा० रा० जवंतराव पांडुरंग देशमुख रा० वसाडी खुर्द ता० मलकापूर यांसः--

खालीं सही करणार नारायण कृष्णाजी देशमुख कारभारी पाटील मौजे वसाडी खुर्द ता० मलकापूर यांचे कडून नोटीस देण्यांत येतें ती खालील प्रमाणें:-

तुह्मी आह्मास आकोला येथील वऱ्हाड-समाचार वर्तमानपत्राचा ता० ५ माहे फेब्रुवारी सन १९१२ चें अंकांतून छापिल नोटीस दिली ती आह्मास रजिष्टर पोष्टानें ता० १० फेब्रुवारी सन १९१२ इ० रोजीं मिळाली ती वाचून आह्मास फारच आश्चर्य वाश्चर्य वाटलें. त्या नोटीशींतील मजकूर प्रथमपासून अखेरपर्यंत शद्वशः खोटा बनावटीचा आहे. मौजे वसाडी खुर्द ता० मलकापूर जिल्हा बुलडाणा येथील आमचे मालकीचें शेत सर्वे नंबर ४३ एकर १४ गुंठे २२ आकार रुपये २५ हें शेत तुह्मांस रु० ५७५० अक्षरी पांच हजार सातशें पन्नास रुपयांस विक्रत देण्याचा करार किंवा सवदा आह्मी तुमच्याशीं कधीच केला नाहीं. व त्याबद्दल तुह्मी लिहल्याप्रमाणें आह्मी तुमच्यापासून बयाण्याबद्दल रुपये २० अक्षरी वीस रुपये कधीच घेतलें नाहींत. व तुह्मी आह्मास मुळींच दिले नाहीं. शेताचे सवद्या संबंधानें तुमची-आमची बातचीत किंवा भाषणही झालें नाहीं. पाटीलकी संबंधानें तुमची आमची अदावत आज सुमारें चार वर्षांपासून सुरू आहे व सरकारनी मला पाटीलकीवर नेमिलें व तुह्मास नेमिले नाहीं. ह्मणून तुह्मी माझ्याशीं हरहमेश अदावत करीत असता व कोणत्याही तऱ्हेनें मला फसविण्याचे पाठीमागें लागला आहात. त्याच दुष्टबुद्धीनें मला खर्चांत घालण्याकरितां व माझें नुकसान करण्या करितां ही नोटीस दिली आहे. तरी या नोटीशीनें तुह्मास कळविण्यांत येत आहे कीं जर आपण आमच्यावर दिवाणी फौजदारी कोर्टांत नालिश कराल तर त्याबद्दल आह्मी जबाबदार नाहीं. व दाव्यांत आमचा जो खर्च होईल तो सर्व तुह्मास भरून द्यावा लागेल व त्या दाव्याबद्दल सर्व तऱ्हेनें तुह्मीच जबाबदार रहाल कळावें. ही नोटीस दिली ता० १३।२।१२

सही

नारायण कृष्णाजी देशमुख दस्तुर खुद्द.

नो० नं० ९५

---

## नोटीस

नोटीस बेशमी- बाजीराव वल्लद महादेव पाटील राहणार केळीवेळी ता० अकोट यांसः-

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येतें कीं ता० २६ माहे जानेवारी सन १९१२ रोजीं केळीवेळी पोष्टांतून वतनदार प्रेसची छापील नोटीस नंबर ३२९ ची दिली ती मधील आपण लिहिलेला मजकूर खोटा आहे कारण आमचे तीर्थरूपाजवळ तुमचे तीर्थरूपानें घरवर मुळींच ठेवली नाहीं व आमचे जवळही ठेवली नाहीं आमचे तीर्थरूपाचे रु० तुमचे तीर्थरूपावर निघतात रा० काशीराव पाटलाचे लग्ना करितां भगाजी चिंधाजी मुंडे यांचे दुकानांतून कापड विकत घेतलें ते रु० तुमचे बापाचे नावे लाविले असून आमचे तीर्थरूपानें दिलें तें अद्यापी रु० आले नाहीं शिवाय तुमचे तीर्थरूपावर विटाचे व सरकीचे व चिल्लर व लाकडाचेच रु० निघतात ते असें तिन्ही मिळून सरासरी १५० रु० तुह्मास आह्मी आमचे तीर्थरूप मयत झाल्यापासून मागितलें तरी तुह्मी रु० न देतां तुह्मी उलट आमचेवर खोटी नोटीस दिली. तरी ही नोटीस पावले दिवसांपासून आठ दिवसांचे आंत आह्मांला रु० पोंहचते करावें व आमचे जवळून रु० पावल्याची पावती घ्यावी असें करण्यास चुकाल तर सरकार रीतीप्रमाणें दिवाणी कोर्टांत फिर्याद केली जाईल. नोटिशीचा खर्च व फिर्यादीचा खर्च तुह्मास द्यावा लागेल ही नोटीस दिली सही ता० १३-२-१२ इ०

सही

आनंदा अज्ञान पालन करणार आई जानकाई व जनार्दन जवजे अर्जून पाटील द० जैराम मारुती तायडे राहणार केळीवेळी नि० खु० हातची बागडी.

नो० नं० ९६

---

## नोटीस

नोटीस बेशमी चीनकी मर्द लाडू महार राहणार ग्रारस ता० बाळापूर ईस--

मी खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तूं माझी लग्नाची बायको असून तुजला वयात यण्यास अजमास दीड वर्ष झालें असून माझे घरींच नांदत होती. माझी बहीण अनी ईचे गंधर्वा करितां नीमकर्द येथें खटल्यासूद्धा गेलो होतो परत आपले गांवी येताना तुझे आईनें व भावानें मजला ह्मटलें कीं चीनकीं ईजला च्यार दिवस करीतां ठेवावे मी आणून घालीन. असें ह्मटल्यावर मी ठेऊन माझे माझे घरीं परत आलो त्यास अजमास ८ ९ महिने झाले त्या दरम्यान आह्मी त्रीवर्ग भाऊ व जातीवाले लोकांसह बरेच वेळां मी घेण्यास आलों असतां तुझा भाऊ शंकर यानें ह्मटलें कीं, तूं संसारास योग्य नाहींस. तुझी बहीण मुळींच बोलली नाहीं. तुझ्या भावानें सदु पाटील यांस बोलावून आणून ह्मणाला कीं तूं आमच्या महाराशीं कां भांडतोस बायकोची गरज असेल तर मजला ५० रु० दे. तुझे बायकोस शंकऱ्या माहारा कडून पाठवितों. नाहीं तर पाठवीत नाहीं. तुझा भाऊ ह्मणतो कीं संसारास योग्य नाहीं. तूं तर ह्मणत नाहीं विनाकारण माझी बदलामी तुझे भावानी केली असून तुझा भाऊ तुजला नांदू देण्याचे विचारांत दिसत नाहीं तुजला दुसऱ्यास गंधर्वानें देऊन पैसा खाण्याचें विचारांत आहे. हें बरोबर नाहीं. नोटीस पावल्यापासून ८ दिवसांचे आंत तूं माझे घरीं डागिन्यासह येऊन राहावें मी तुजला वागविण्यास राजी आहों. तुझें भावाचें मतानें वागून जर न आलीस मी कोर्ट मार्फत ताब्यांत घेईन मजकडून फारकती मुळींच मिळणार नाहीं. तुझा भाऊ माझी विनाकाण नामोशी करून राहिला आहे. तर अब्रू संबंधानेंही तुझे भावावर रीतीप्रमाणें फिर्याद तुझेवर व तुझे भावावर करून कोर्ट व नोटिशीचा खर्च जो येईल ते उभयतापासून घेतला जाईल. कळावें. ता० ७-२-१२ इ०

सही

लाड्या वल्लद मर्दा महार राहणार लाजूंड याचे हातची नि० असे.

नो० नं० ९७

---

## नोटीस.

चाहदू वा तानु गोवारी राहणार डोंगरगांव (व पंच जातीचे)

यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येतें कीं मी सखी ईचा चिंतामण गोवारी यांच्या पोटची मुलगी नामे एलाई ईस माझ्या भावास बायको करून घेतली आहे. तीच्या लग्नाला अंदाजा २ वर्षे झालीं. लग्नामध्यें तुमच्या गावचे पंचही होते तेव्हां त्यांनीं लग्न मंजूर केलें. व व्यवहार नीट चालला पण तुह्मी नंतर चार महिन्यानीं अशी भानगड उपस्तीत केली कीं ती मुलगी चिंतामणचीच नव्हे तेव्हां मी तुह्मास खरे करून दाखविण्यास सांगितलें पण तुह्मी कांहींच केलें नाहीं व मला जातींतही घेतलें नाहींत. नंतर फौजदारींत फिर्याद केली तेव्हां उलट सांगितले कीं ही मुलगी जातीचीच आहे असें ह्मणून त्यांतून सुटका करून घेतली पण मला जातीत घेतले नाहीं सबब मी पुनः जातपंचाईत केली तेव्हा चाहदूनें लेखी करार केला कीं मी ती मुलगी दुसऱ्या-जातीची ह्मणजे कुणब्याची आहे असें सिद्ध करून देईन न दिल्यास त्याबद्दल दंड व जातीचा व माझा खर्च देईन त्या गोष्टीसही आज ६ महिनें होऊन गेलें पण त्यांनीं कांहीं सिद्ध करून दिलें नाहीं व मला अजून जातींत घेतलें नाहीं सबब त्यास व सर्व जात पंच यांस नोटीशीनें कळवितों कीं ही नोटीस पावल्या पासून आठ दिवसाच्या आंत या गोष्टीचा योग्य निकाल लावावा. जर चाहदू सारखा निकाल झालाच तर आह्मी दंड वगैरे देऊन जातींत येऊं. अगर चाहदुनें ही गोष्ट सिद्ध न केली तर त्यांनीं माझें नुकसान झालेले भरून घ्यावें, पंचास कबुल केलेला दंड १०० रु. व जातीचा खर्च द्यावा. असें जर मुदतींत तुह्मी केलें नाहीं तर दिवाणी फौजादारी करून मला योग्य तो निकाल लाऊन घ्यावा लागेल. विनाकारण त्रास होऊं नये ह्मणून आगाऊ सुचना देत आहे. कळावें ता. १२-२-१९१२

सही

लक्ष्मण वा सिताराम जात गोवारी राहणार आकोला (आकोलखेड) नि. आ.

नो. नं. ९८

---

## नोटीस

नोटीस बेशमी विष्णाजी पुर्णाजी मोदें साहू दुकान केळीवेळी तालुका अकोट जिल्हा आकोला

यांसः—

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी माझा दीर नामें रामचंद्र जयराम पाटील याचे जवळून मौजे केळीवेळी येथील शेत सर्वे नंबर ५९ २२ एकर १ गुंठा या शेतांतील एक द्वितीयांश हिस्सा तुह्मी खरेदी घेतला परंतु तो एक द्वितीयांश हिस्सा नसतां नुसता ९ एकर जमिनीचा हिस्सा आहे आणि खरेदी घेतल्या तारखेपासूनही तुमचा सदर्हू

शेतावर ह्मणजे एक द्वितीयांश हिश्यावर तावा नाहीं फक्त ९ एकर जमिनीच्या हिस्यावरच तावा आहे. करितां तुह्मी माझे दिराजवळून मी ९ एकर जमिनीची खरेदी न घेतां एक द्वितीयांश हिश्याची खरेदी घेतली तरी ती खरेदी खोटी आहे तर नोटीस पावल्या तारखेपासून तुह्मी आठ दिवसांचे आंत माझा दीर नामे रामचंद्र पाटील यांचे जवळून एक द्वितीयांश हिश्याची खरेदी बदलून तुमचा जितक्यां जमिनीवर तावा आहे तितकीच जमिन ह्मणजे ९ एकराची खरेदी करून घ्यावी जर असें न कराल तर पुढें सरकार मार्फत ही तुमची ९ एकराचाच खरेदी कायम राहिल व जास्त जमिन वाढल्यास ती बातल असें. आतां आहे ती खरेदी खोटी आहे कळावें ता. १३-२-१२ इ.

सही

सारजाबाई जवजे विठुजी पाटील

नि० खु० हातची बगडी

नो० नं० ९९

## नोटीस

रा० रा० सिताराम मोतीसा डोंगरे रा० आकोला यांसः—

खालीं सही करणार यांजकडून कळविण्यांत येतें कीं तुमची तारीख ३।२।१२ ची पोष्ट मार्फतनें आलेली नोटीस पावली तिला मी खालीं लिहिल्या प्रमाणें उत्तर देतो. मी तुमचे जवळून रुपये ७०६ दरमहा दरशेकडा ॥= व्याजानें घेऊन त्याचे तारणासाठीं खालील माल तुमचे जवळ गहाण ठेविला तोः—

१ ठुसी १ वजन तोळे ४।९ अं० किंमत ८०।९०

१ नथ १ मोत्यांची अं० किं० १२९

१ कंठी १ मोत्यांची सोन्याचें सुतांत गाठविलेली किं० ५००।६००

१ मुद्या ४ जडीताच्या अ० किं० ७५

सरासरी दोन महिनें झालें मी तुमचे कडेस १।२ वेळां गहाणाचे रुपये घेऊन आलो होतो. तुह्मी व्याजाचा हिशोब केला व मजकडून व्याज मुद्दलसुद्धां रुपये घेऊन माझा माल मला परत द्यावा तसें न करितां तुह्मी बेमानकी करून माझे मालापैकीं मोत्यांची कंठी काढून घेऊन त्या ऐवजी हलकी कंठी अंदाज रुपये ५०--६० ची माझी ह्मणून मला देऊं लागले. ती माझी नसल्यामुळें मी आपले पैसे घेऊन परत आलो. तुह्मी सराफ ह्मणवितां व तुह्मी दोन पैश्याची जिन्नस एक पैश्यावर ठेविल्यावाचून १ पैसा कोणास देणार नाहीं हा तुमची रीत आहे. केवळ तुमचे मनात माझी कंठी पचविण्याची इच्छा आहे परंतु तसें करणें तुमच्या सारख्या गृहस्थास शोभत नाहीं. माझे पैसे व्याजासह घेऊन माझा माल परत दिल्यांस मी घेण्यास तयार आहे. तुह्मी विनाकारण दावा केल्यास मी तुमचे कोर्ट खर्चास जबाबदार नाहीं. कळावें ता० १०-२-१२

सही

सखाराम नारोबा सोनार रा० आकोला.

नो० नं० १००

---

**विहार आनन्दका सागर रंगीन तसवीरे सहित चारो भाग तथा पांचो अंग सचित्र कोख शास्त्र.**

असली हमसे मंगावो धोकेसे बचो स्त्री पुरुषोंके जात, भेद, लक्षण अनेक देशस्थ स्त्रीनायका, कुमारी प्रकृती, सत्व दुती कुलटा, पतिव्रता, व्यभिचारणी आदिको 'पहचान, रजोधर्म लक्षण, ऋतुविहार मय सहवास स्थान क्रया, शैय्यातिथ, कामस्थान सालासगरिं, वतीसोआमूशण, वस्त्रतअर्दिवमधान पुत्रस्टीकर्म, नपुंसकविद्या, उपदंश प्रमेह आदि अनेक रोगोंकी चिकित्सा औषधि, पशुदे भाषा जाननेकी रीति, मंत्रतंत्र, यंत्र, वशीकरण सुद्धां विद्या आदि अमुल्य विषयका भंडार किंमत रु०

पं० गंगाप्रसाद इंजीनियर शहापडी
नो० नं० १९ अलीगड

---

## खबर.

सर्वांस कळविण्यांत येते कीं आमचे येथें शेतकीचे कामाचे लोखंडी नांगर, बैलाचा तांगा, लोखंडी बिडची चक्की वगैरे चिल्हर सामान विकण्याचे आहे. ज्याला घेणें असेल त्यांनीं किंमत माल पाहून समक्ष ठरवावी. कळावें. तारिख. २८-१२-११ इ० नो० नं० ९

गोपाल खुशालराव वकील आकोला.

---

## नोटिशीचे उत्तर

रा. त्र्यंबक दिवाकर घेंगे रा. मेहकर यास तुमचे ता० १०-१०-११ इ. चे नोटिशीवरून कळविण्यांत येते कीं यमुनाबाई जवजे बापूभट घेंगे इजला तिनें तिचे मुलीचें लग्नाकारितां काढलेलें पुष्कळसें कर्ज देण्याचें होतें व तें कर्ज फेडण्याकारितां तिनें आमचेजवळून कर्ज काढून तिनें आपलें घर आह्मास तावेगहाण लिहून दिलें. हें घर अगदीं जुनाट असून मोडकळीस आलेलें आहे व त्याचे पडझडीचे रिपेरी यमुनाबाईचे ह्मणण्याप्रमाणें होत आहे. घराचें भाडे ही पराकाष्ट ३ रुपयावर येऊं शकत नाहीं व जोपावेतों घर आमचे ताब्यांत आहे तोपावेतों त्याचे भाड्याचे प्रश्नाची आह्मास जरूरीही नाहीं. आह्मी दिलेले कर्जाची व रिपेरीस लागलेले पैश्याची दस्तऐवजांतील शर्तीप्रमाणें फेड झाल्यास घर सोडण्यास आमची कांहीं हरकत नाहीं. आपला ह्या घराशीं काय संबंध आहे हें आह्मास मुळींच माहित नाहीं. तुह्मी विनाकारण दावा वगैरे केल्यास त्याचे खर्चाचें आह्मी जबाबदार नाहीं. या नोटिशीचा खर्च तुह्मास द्यावा लागेल. कळावें तारीख १४-२-१२

सही

गोविंद रामचंद्र धोंडसे

नो० नं० १०१

## WONTED

A corresponding clerk on Rs 25 per Mausum for the Khamgaon Municipalty. The applicant should have passed the Matriculation examination.

Preference will be given to those having previous expiriane of Municipal work.

Appication with copies of testimonials which will not be returned, should reach the under signed by the 12 th March 1912 at the latest

No 102

K. S. Bhadang
Vice Chairman
Municipality Khamgaon

Khamgoan
12—2—1912

---

# दिल्ली दरबार.

मानपत्राचें उत्तर देतानां "**हिंदुस्थानचा एक सारखी प्रगाति होत जावी ही आपली उत्कट इच्छा आहे.**" असें बादशहानीं ह्मटलें. हिंदुस्थानांत शेंकडा ८० ऐशीं लोक शेतकीवर निर्वाह करीतात. तेव्हां त्यांच्या मध्यें अगोदर प्रगाति झाली पाहिजे. त्यांची प्रगाति होण्यास शेती सुधारली पाहिजे. शेती सुधारण्यास सुधारलेल्या आउतांचा जास्त जास्त प्रसार झाला पाहिजे. हें उघड आहे. आणि ही सुधारलेली शेतकीची आऊतें ह्मणजे लोखंडी नांगर कडबा कापण्याचीं यंत्रें, मोटेचीं चाकें, वगैरे वगैरे तयार करण्याचें काम आह्मी करीत आहों. सबब हीं यंत्रें आमच्या कडूनच मागवा. क्याटलाग मागवा.

किर्लोस्करबंधु.

पोष्ट किर्लोस्करवाडी (सं० औंध जिल्हा सातारा).

नो० नं० १२

---

ठिक ठिकाणी एर्जटस् पाहिजेत.

# सन लाइफ अशुअरन्स कंपनी ऑफ कानडा

[१८६९]

इंग्लिश सरकारची सत्ता देखरेख सरकारी हुकुमाशिवाय भांडवल गुंतवता येत नाहीं.

**भांडवल तेरा कोटी रुपये.**

पॉलिसीचे नमूने फारच सुधारलेले आहेत.

पालिसी .... .... .... .... .... .... बिन अटीच्या.

पॉलिसी .... .... .... .... .... .... बिन तक्रारी.

पॉलिसी .... .... .... .... .... .... बिन बुडणारी.

हिंदुस्थानचे मुख्य ऑफिस, हार्नबी रोड मुंबई. } व्य. श्री मुधोळकर मध्यप्रांताचे व वऱ्हाडचे जनरल एजंट अकोला ' प्रांतवऱ्हा नो. नं. १३

---

# Oriental Govrnment security LIFE ASSURANCE COMPANY Limited

ESTABLISHED IN 1874.
R. Paterson, Brown, Manager,
HEAD OFFICE—BOMBAY

## FUNDS Exceed 4 crores

CLAIMS PAID FOR OVER 3 CRORES
IMMEDIATE SETTLEMENT OF CLAIMS

If there be one thing of more importance than another in connection with Life Assurance, it is when claims arise, that the amount due under the policy be paid to the Claimants at the earliest possible date. This the Directors of the 'Oriental' keep well before them and act in treating th clients with the utmost liberality.

UNQUESTIONABLE SECURITY.

It is not sufficient to read that a Company's funds amount to a given um, but it is essential to know how such Funds are invested if in miscellaneous and risky investments or how secured.

The Funds of the 'Oriental' are invested in Government Securities and lodged with the Government Official Trustee of Bombay in terms the Company's Trust Deed, as Security for Claims arising, through decease of assured lives, and endowment policies matured.

Government Officers, Professional men, Tradesmen and others by employin portion of their annual income or profits in effecting life policies, at once create a fund equivalent to the savings of many years.

No mān can be sure how long he will live. and although he may save money yet, if he dies early before he had time to save much, his wife and family may be in distress. Life Assurance is a means by which his danger is got over. Life being so uncertain, the sooner a man make up his mind to assure his life the better. Once satisfied of the propriety of the step, do not delay. There are numerous instances in the records of the Oriental' where the delay of a month or less, has left the family without the intended provision.

INFLUENTIAL AND ENERGETIC AGENTS WANTED. For term please apply to the undersigned.

Prospectuses, forms and any further information can be obtained on application

M. DESOUZA.
CHIEF AGENT, Nagpur

CHIEF AGENCY FOR C. P., BERAR & KHANDESH No. No. 14

---

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवआश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

Registered NoN. N4

# वऱ्हाडसमाचार.

Berar Samachar.

] आकोला—सोमवार तारीख २६ माहे फेब्रुवारी सन १९१२ ई० [ अंक ९

खाली सही
देण्यांत येत
पार्तीत ) टुन
बुलढाणा ये
अकुनांव
१० व

## वर्गणीचे दर

दिलेल्यांतील लोकांस........१ रुपया
हिरगांवें. ट. हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाउच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

## नोटिशींचें दर

दर ओळीस दीड आणा.
इंचिंचा दोन ओळी धरल्या जातील नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सुचनाः— गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील वापुढें येणाऱ्या नोटिसास स्पेशल चार्ज पडेल

### जाहिरात

मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.

ह्या बँकेंत खाली दिलेल्या अटींवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा त्यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर त्यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पाच हजार.वरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।९।०९ } G. A. Phillips. एजंट
नं १

### मुंबइ बँकचें सोनें.

मुंबई बँकचा छाप असलेल्या उत्तम कसाच्या सोन्याच्या चिपा मुंबई बँकच्या आकोले व उमरावती येथील ऑफिसांत विकत मिळतील. गिऱ्हाइकानें जास्त माहिती कारितां बँकेंत तपास करावा.

एका चिपचें वजन २६३/४ तोळे असतें. साधारण भाव वऱ्हाड समाचार वर्तमानपत्रांत बाजारभाव ह्या सदराखालीं सांपडेल.

मुंबई बँक आकोला २१-९-१० } G. A. PHILLIPS. एजंट
नो० नं० २

## चांदीचीं भांडीं.

### खरें सचोटीचें दुकान.

आमचें दुकानीं शुद्ध चिनई चांदीचीं सर्व प्रकारचीं सुबक व घाटदार भांडीं विक्रीस तयार असतात. माल वाजवीपर्वक

वक्तशीर व्ही. पी. नें पाठवूं. मालाच खरेपणाबद्दल जोखिमदार राहूं. एकवार अनुभव घ्यावा.

पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन.
३ आदितवारपेठ, नासिक

श्री राधावल्लभाजयाति

### वर्षफल ।

हमारे पास सिर्फ १ पोस्टकार्ड पर किसी फल वा फुल का नाम लिख भेजो हम आप के एक वर्ष का सुख, दुःख लोभ, हानि जीवन मरण, रोग, सन्तान तरक्की, मौकूफी, व्यापार में किस वस्तु स लाभ होगा दिसावरी काम में कैसा लाभ होगा और जो महीना हानिकारक उस का उपाय महीनेवार वर्षफल व्ही० पी० द्वारा २। रुपये में भेज देंगे. हमारे यहां जन्म पत्रादि उत्तमोत्तम बनते है अनेक प्रशंसा पत्र मौजूद हैं, विशेष परिचय के अर्थ ८॥ आना का टिकट भेज कर सूचीपत्र मंगा लीजीये.

मिलने का पता:---
गोस्वामी राधामोहन शर्म्मा
नं ४ चित्तीखाना आगरा.

### खात्रीचीं औषधें विक्रीस तयार.

जोगळेकर आणि कंपनी लिमिटेड आकोला.

याचें दुकानीं जोगळेकर आणि कंपनी यांनीं तयार केलेलीं खात्रीलायक व सशास्त्र औषधें विक्रीकरितां तयार आहेत तरी ग्राहकांनीं अनुभव घेऊन खात्री करून घ्यावी.

| | | |
|---|---|---|
| सूतशेखर | दर तोळा | ५ |
| चंद्रपुटी प्रवाळ | ” | २॥ |
| सूर्यपुटी प्रवाळ | ” | २ |
| अग्निपुटी प्रवाळ | ” | १ |
| नागाच्या गोळया | ” | २ |
| महायोगिराज गुग्गुळ | ” | २ |
| खोकल्याच्या गोळ्या | ” | २ |
| पोलादभस्म | ” | ३ |
| लक्ष्मी विलास | ” | १५ |
| त्रिभूवन किर्ती | ” | २ |
| श्वास कुठार | ” | २ |
| सुवर्णमालनीवसंत | ” | ६॥ |
| लघुमालनीवसंत | ” | २ |
| समिर पन्नग | ” | ५ |
| रससिंदुर | ” | ३ |
| चंद्रोदय | ” | १५ |
| हिंगाष्टक चुर्ण | बाटली | ८= |
| डोळ्याचें औषध | ” | |
| मोठी | ” | ।= |
| लहान | ” | + |
| लिनिमेंट आयोडिन | ” | ॥. |
| टि. आयोडिन | ” | ।= |
| महावातास्त्र तेल | ” | |
| मोठी | ” | ।≡ |
| मध्यम | ” | ।-॥ |
| लहान | ” | ८≡ |
| उसांचा शिर्का | ” | ।≡ |
| मद्य बाटली. | | |
| मोठी | ” | ।= |
| लहान | ” | ८=॥ |
| पिनसावर तेल | ” | .॥. |
| ग्लिसराईन बाटली. | | ८≡ |
| गजकर्ण अर्क | ” | ।= |
| गजकर्ण मलम | ” | ८≡॥ |
| शंखद्राव. | तोळा | ॥. |
| कुंचल्यादि वटी | ” | .॥. |
| हिंगणबेटाचे तेल | ” | ८= |
| नारायण चुर्ण | ” | ८= |
| इच्छाभेदी जुलाब डझन | | ८= |
| ग्रहणी कपाट | तोळा | २॥ |
| मौक्तिक शुक्ति | ” | २ |
| शितोपला चुर्ण | ” | ८= |
| चोपचिन्यादी चुर्ण | | |
| आम वातावर चुर्ण | ” | ८= |

येणेंप्रमाणें औषधें विक्रीस तयार आहेत.
ता. १।१।१२
जोगळेकर आणि कंपनी लि.
नो० नं० २१ आकोला.

### नोटीस

आकोला म्यु० कमेटी

आकोला म्युनिसिपल कमीटीनें लागू केलेले नवीन भंगीपट्टीचे नियम, सी. पी. ग्याझेट नोटिफिकेशन नंबर ९६ तारीख २०-१-१२ (सी. पी. ग्याझेट तारीख २७-१-१२ पहा ) मध्यें प्रसिद्ध झाले आहेत. सदर्हू कर ता० १-४-१२ इ. पासून अमलांत आणण्याबद्दल कमीटीनें ता० ७-२-१२ इ. रोजीं स्पेशल ठराव केला आहे. व वऱ्हाड म्यु० कायद्याचे कलम ६१ (१) अन्वयें सदरील कर माफी वगैरे बद्दल खालील केलेले नियम सर्वांचे माहितीकरितां प्रसिद्ध करण्यांत येत आहेत.

१ कोणत्याही घराचे अगर जमीनीचे वहिवाटदारास, अगर त्याठिकाणीं राहणारांस सदर्हु घर अगर जमीन सोडून जागें असल्यास व त्याबद्दल कराची माफी मागण्याची अगर दुसरे कोणत्याही सबबीवर कर कमी करून घेण्याची इच्छा असल्यास त्यानें प्रत्येक तिमाहीचे पहिल्या १० दिवसाचे आंत ( म्हणजे एप्रिल, जुलै, ऑक्टोबर व जानेवारीचे १० तारखेचे आंत त्याबद्दल म्युनीसिपालीटीकडे लेखी खबर द्यावी.

२ नियम १ प्रमाणें नमूद केलेले मुदतीचे आंत वर प्रमाणें खबर न दिल्यास म्युनिसिपालीटीचे हद्दींतील कोणत्याही घराचे अगर जमीनीचे वहिवाटदारास अगर त्यांत वस्ती करणारांस, तिमाहीबद्दल पूर्ण कराची रक्कम द्यावी लागेल. आकोला ता० १०-२-१९१२

R. M. Gupte
चेअरमन स्यानिटशन कमीटी आकोला
नो० नं० ९३

### जाहिरात

आकोले म्यु० कमीटी करतां एप्रिल १९१२ इ. पासून दरमहा १५ रुपयावर एक कॉनसरव्हन्सी क्लॉर्क पाहिजे. ज्यांची येण्याची इच्छा असेल त्यांनीं १५ मार्च १९१२ पर्यंतचे आंत खालीं सही करणाराकडे अर्ज करावा. ज्याला इंग्रजी येत नाहीं, त्यांना अर्ज करण्याचे काहीं कारण नाहीं. अर्जांत किती शिक्षण झालें आहे, वय किती, व पूर्वी कोठें नोकरी केली असल्यास त्याजबद्दलची माहिती असावी. आकोला ता० १०-२-१२

R. M. Gnpte
चेअरमन स्यानिटेशन कमीटी आकोला
नो० नं० ९४

### *Advertisement.*

It is hereby notified for the information of the public that the following moveable property belonging to late Mr. A. C. Brice of Murtizapur will be sold by public auction in the local market at Akola on the 15 th March 1912:--

1 Double—barrelled 12 bore shot gun ( left barrel burst ) with a brown canvas cover.

1 Single-barrelled rifle ( bore not known ) with a wooden case containing re-sizer ( 4 pieces in all ) and a piece of wood.

1 Air Gun. No 103

Dated Akola, the 15 th February 1912 } A. D. Barr District and Sessions Judge, West Berar.

## आकोला बाजारभाव.

हुंडी दर्शनी ९९।॥=॥
मुंबई ब्यांकेची सोन्याची चीप दर तोळ्यास २४८-

| | | |
|---|---|---|
| चांदीचा | | ७३ |
| जवारी नवी | ६० | ७५ |
| गहूं | | १०० |
| गहूं बनशी | ११० | १२० |
| चणे | | ४।. |
| तेल | | ८।- |
| तुप | | १३ |
| सरकी | | १०॥= |
| कापूस | | ७२ |
| जवस | | १९१ |
| तीळ | | १९३ |

## नोटीस

मि० सबजज्ज साहेब बहादूर आकोला यांचे कोर्ट.

सक्सेशन सर्टिफिकीट नंबर १ सन १९१२ इ०

सक्सेशन सर्टिफिकीट मिळण्याबद्दल अर्ज

अर्जदार

रुखमाबाई भ्रतार हरीभाऊ पिसोल्कर ब्राह्मण रा० आकोला.

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते कीं अर्जदार इनें सक्सेशन सर्टिफिकीट मिळण्याबद्दल दिलेला अर्ज आमचे कोर्टात तारीख ११-३-१९१२ रोजीं नेमला आहे. त्या तारखेस ज्यांची कांहीं तक्रार असेल त्यांनीं सकाळीं १० वाजतां आमचे कोर्टांत हजर व्हावें तसें न केल्यास पुढें कोणत्याच प्रकारची तक्रार ऐकली जाणार नाहीं. कळावें. ता० २१-२ १२ इ०

Janakiprasad

No 110 सबजज्ज आकोला

---

रा रा. बाबासाहेब गर्दे यांनीं खामगाव येथें वेदान्त विषयावर पहिलें प्रवचन केलें त्याचा सारांश असा कीं,

धर्म शद्बाचें अनेक अर्थ होतात. जसें—

[ १ ] विभाग ( Property )

[ २ ] पितापुत्रासंबंधी कर्तव्य, ईश्वरविषयक ज्ञान ज्यांत सांगितलेलें आहे वगैरे धर्मामध्यें पूर्व मीमांसा आणि उत्तर मीमांसा असे दोन भाग करता येतील. आमचे लोकांचे विचाराप्रमाणें तत्वज्ञानाचाही संबंध धर्माशी येतो. पाश्चिमात्य लोकांत तसें नाहीं. धर्म व तत्वज्ञान हीं दोन पृथक आहेत असें ते समजतात. '' चोदनालक्षणो धर्मः '' अशी धर्म शद्बाची व्याख्या आहे. श्रुतिस्मृति प्रणीत जो धर्म तोच धर्म.

धर्मः—- फक्त आज्ञा करतो अमूक अमूक क्रिया ब्राह्मणानें केली पाहिजे, अशा तऱ्हेनें हुकूम करणारा धर्म आहे तेथें अमूक क्रिया कां करावी ? हा प्रश्न योग्य नाहीं. जसें शिपायांस वरिष्ठ अधिकाऱ्याकडून झालेला हुकूम त्यानें मुकाट्यानें पाळलाच पाहिजे, तसेंच धर्माज्ञे संबंधानें आहे.

नीतीशास्त्रः—– अमूक गोष्ट करावी तसें करणें बरें, असें सांगतें.

तत्वज्ञानः-- अमूक अमूक सिद्धांत असा आहे येवढेंच सांगतें. तत्वज्ञानांत आणि नीतिशास्त्रांत आज्ञा नाहींत. धर्मशास्त्र आज्ञा करितें, व त्याचें रहस्य अथवा हेतु तत्ववेत्ते जाणतात. साधारण जनसमुदायास तें समजण्याची आवश्यकता नसते. अमूक गोष्ट केली असतां पुण्य आहे व अमूक केली असतां पाप आहे असें धर्मशास्त्र सांगतें. परंतु हल्लींचें युग कां ? हा प्रश्न विचारावयाचा आहे. वैदिक लोक अमूक गोष्ट कशी करावी म्हणून सांगतात, त्यांस असें का ? हें विचारतांच मोठ्या घोटाळ्यांत पडतात. त्यांचें रहस्य त्यांना तरी काय समजणार? एका स्त्रीस तिचा पति तिला रोज मारीत असे. तिला एका वृद्ध पण अनुभवी बाईनें पतीचा मार बंद होण्यास हें औषध सांगितलें कीं दररोज पति रागावतांच मिठाचे पाण्याचा गुळणा तोंडांत धरण्यास सांगितला असा क्रम बरेच दिवस चालला असतां तिचा पति तिला मारेनासा झाला. याचें रहस्य असें कीं, उत्तर देऊन पतीचे क्रोधात अधिक भर घालीत असे. तिनें त्या वृद्ध बाईचें ऐकलें त्यामुळें उलट उत्तरें बंद झालीं व व म्हणूनच तिला गूण आला. आमच्या वेदोक्तकर्माची गोष्ट अशीच आहे. आपले मनावर हजारो जन्माचे झालेले वाईट संस्कार काढून टाकण्या करतां धर्माचा प्रयत्न आहे. व म्हणून धर्मानें कर्म सांगितलें आहे ज्या भागात हीं सर्व कर्में सांगितलीं आहेत त्यास पूर्व मीमांसा अथवा कर्म मीमांस असेंही म्हणतां येईल. त्यातील पहिलें सूत्रः— अथातो धर्मजिज्ञासा असें आहे. हे ज्ञान धर्म स्थापकां करितां आहे. त्यांनीं अमूक धर्म असा कां हें समजून घ्यावें. धर्मानें ज्या गोष्टींचा निषेध केला आहे त्या कारणें हें पाप व ज्यांचा विधी सांगितला आहे तें पुण्य आहे. पुण्य आणि पाप हीं सापेक्ष आहेत. जें एक वेळ पुण्य आहे तें दुसरे वेळीं पाप होतें. कर्मत्याग हें गृहस्थांस पाप आहे परंतु तेंच संन्याशास पुण्य आहे. कर्म केल्या पासून अंतःकरण शुद्धि होते. मनाची शुद्धि म्हणजेच मनुष्याची सुधारणा. कारण मन म्हणजेच मनुष्य. प्रमाणें ६ आहेत.

१ प्रत्यक्ष २ अनुमान ३ शद्ब ४ उपमान ५ अर्थापत्ति ६ अनुपलब्धि. जें इंद्रियगोचर तेंच प्रत्यक्ष होय. पांच इंद्रियें सूक्ष्म पंच भूतांपासून झालीं आहेत व त्या प्रत्येक भुतांचा गूण त्या त्या इंद्रियास गोचर असतो. परंतु नुसतें प्रत्यक्ष प्रमाण खरें मानून कोठें भागत आहे? चंद्रमा नेत्रांस अगदीं लहान दिसतो, म्हणून तेवढा थोडाच आहे. अनुमानाचा अंगिकार करणें जरूर आहे. जसें:— चंद्रप्रकाशा वरूनच बिंबाची कल्पना हें अनुमान होय. केवळ अनुमानानें ही भागत नाहीं. शद्ब प्रमाण मानणें भाग येतें. घरांतील मुलानें येऊन सांगितलें कीं बाबा घरांत साप निघाला आहे. या शद्बावर भरंवसा न ठेवल्यास केवढा घोटाळा होईल. सर्व व्यवहार शद्बानेंच होत आहेत. धर्मविचारांत तर त्यावाचून भागत नाहीं. परंतु तो शद्ब कोणाचा ' आप्तवाक्यं प्रमाणं ' आप्त कोण ? हितवक्ता आप्त. वेदवाक्य हें आप्तवाक्याप्रमाणें आहे. जशी सरकारची आज्ञा तशी वेदाची आज्ञा समजली पाहिजे. कित्येक वेळां सरकारी हुकूम अन्यायाचा वाटतो; परंतु तो निमूटपणें पाळणें हाच आपला धर्म असतो, अशीच धर्माची गोष्ट आहे. वेद अपौरुषेय म्हणतात त्याचा हाच हेतु आहे. तीही ईश्वराज्ञा म्हणून पाळावयाची. धर्माचार्यांनीं मिळून वेदास अपौरुषेय ठरविलें म्हणून तो अपौरुषेय, ख्रिश्चन व मुसलमान देखील बायबल आणि कुराणास अपौरुषेय समजतात. व्यवहारांत जसा सरकाराचा कायदा तसाच धर्माचे बाबतींत वेद प्रमाण होय. नवीन मंडळीस प्रत्यक्ष प्रमाण पाहिजे. आम्हास ईश्वर प्रत्यक्ष दाखवा असें ते म्हणतात. कोणचा ईश्वर ? वेदांत ज्याचें वर्णन केलें आहे तोचना ! त्याचे वर्णनः—तो इंद्रियांस अगोचर, निरवधि व निर्गूण असें केलें आहे. तो इंद्रियास प्रत्यक्ष कसा होईल. वेदाचे तीन भाग केले आहेत. कर्म, उपासना आणि ज्ञान या तीन काडांत सर्व धर्म शास्त्रांचा समावेश होतो.

प्रथम कर्म सांगितलें आहे. याचा हेतु चित्तशुद्धि. दुसरें उपासनाकांड, यानें मनाची एकाग्रता व अखेर ' सर्व कर्माखिलं पार्थ ज्ञाने परिसमाप्यते ' ज्ञानहोण्या करितां ज्ञानाचा विषय आणि ज्या साधनानें ज्ञान होतें तीं इंद्रियें यांची अपेक्षा आहे. अंतःकरण म्हणजे आंतील इंद्रियास मन म्हणतात. हेंच सर्व इंद्रियांचे द्वारें ज्ञान मिळवितें. ईश्वर सगळीकडे व्यापक असून त्याचें ज्ञान होत नाहीं, याचें कारण साधनांत असलेला दोष आहे. त्याची शुद्धि करण्याकरितां कर्म आणि उपासना यांची अत्यंत आवश्यकता आहे. कर्मानें मन शुद्धि, उपासनेनें एकाग्रता होते असें पूर्वीं सांगितलेंच आहे. आपणास दुर्बिणींतून चंद्रमा पहावयाचा असल्यास दुर्बीण जशी शुद्ध पाहिजे तसें तिचा फोकस बरोबर लागला पाहिजे. उदकांत मुख प्रतिबिंब दिसण्याकरतां तें शुद्ध असून स्थिर पाहिजे, गढूळ व चंचल उदकांत मुखदर्शन होणार नाहीं त्याप्रमाणें कर्म आणि उपासनेनें अंतःकरणरूप आरसा स्वच्छ होतांच त्यांत परब्रह्मरूप प्रतिबिंब दिसूं लागेल. जन्मोजन्मीं अंतःकरणावर झालेले विषयलंपटतेचे डाग धुण्याकरितां वेदानें विहित विधींनें वागण्याची आज्ञा केली आहे व्यर्थ गप्पा मारण्यांत दुसऱ्याची निंदा व दुसरी अनेक पापाचरणे करून अंतःकरणावरील डाग वाढविण्यापेक्षां वेदाज्ञे नुसार कर्म करणें चांगलें नाहीं काय? वेद विहित कर्म करण्यांत कल्याण आहे. विद्यारण्य स्वामींनीं म्हटलें आहे.

पामराणांव्यवहितेर्वरं कर्माद्यनुष्ठितः"

ततोपि सगुणोपास्ति निर्गुणोपासनंततः "

विज्ञान सामीप्यं तावच्छ्रेष्ठंविवर्धते.

पामर म्हणजे विषयलंपटापेक्षां कर्म करणें श्रेष्ठ आहे. मग तें सकाम असलें तरी चालेल. कारण त्यांस परमेशाचा संबंध खरा आहे. निष्काम कर्मापेक्षां उपासना आणि उपासनेपेक्षां ज्ञानी श्रेष्ठ होय. कर्मामध्यें सकाम आणि निष्काम कर्म उपासनेंत सगुण आणि निर्गुण उपासना, व ज्ञानांत परोक्ष आणि अपरोक्ष असें भाग आहेत, यात पहिल्यापेक्षां दुसरें श्रेष्ठ आहे.

या सर्व गोष्टींचा विचार वेदांत आहे. तोच धर्म व तदनुकूल वागणें हें आपलें कर्तव्य आहे.

चिंतामण हरी मराठे

---

## राज गीत,

राक्षि विभो ! आमुचिया दयित राजया ॥
प्रजावनार्थ दे उदंड आयु दे तया ॥ धृ. ॥
विजयश्री त्यास वरो नित्य संगरीं ॥
नांदतसो सौख्य सदा त्याचिया घरीं ॥
ढाळितसो विमल कीर्ति—चवर त्यावरी ॥
देवा ! पावा, लावा त्यास सतत सौख्यभरित ॥
राज्यशकट चालवावया ॥ राक्षि विभो ॥ १ ॥
धाव विभो ! धांव, तदरि वर्ग ने लया ॥
शक्तियुक्तिहीन शीघ्र करुनिया तया ॥
विध्वंसी कपटकृती सर्व त्यांचिया ॥
ईशा ! आशा ऐशा तूंच पूर्ण करुनि तूर्ण ॥
अस्मदवन करि दयाल्या ॥ राक्षि विभो २ ॥
पाकृनिया अतुल भाग्य त्वकरान्वें ॥
राज्य दीर्घकाळ ...
पाळुनिया संतत ह्या ...
सुरसें स्वयशें हर्षें स्वप्रजेस ...
लावुं गावया ॥ राक्षि वि ...

---

...मु० नंबर १९९ सन २ यात राहून माझे तर्फे काम करण्यास व मोकदम्यासंबंधानें सर्व प्रकारची गंगाबाई करण्यास तुम्हां उभयतास कुलमुखत्यारपत्र दिलें होतें ते मुखत्यारपत्र तुमचे ...शाचे वर्तणुकीमुळें आज तारखेपासून ...लें आहे. तरी तुम्हां आजपासून मोकदम्यासंबंधानें अगर आमचे ...चे हिस्याबद्दल व हिस्याचे रुपये ...दल अगर कोर्टात असलेले कांहीं कारवाइ करूं नये असें कळवें तारिख ... सही उर्दूत

खजा अब्दुल

महान

...हद

...न

---

वऱ्हाडसमाचार

---

फाल्गुन शुद्ध ९ शके १८३२ दुंदुभिनाम संवत्सरे

---

## साहित्यसमालोचन

### बादशहा आणि मराठी साहित्य.

बादशहाच्या शुभागमनाच्या निमित्तानें मराठी वाङ्मयांत थोड्या फार अंशानें तरी चांगल्या चांगल्या कवितांची, व निबंधाची भर पडली आहे. अशा चांगल्या कवितेंत रा० टिळक व रा० मोगरे या दोन सुप्रसिद्ध कवींच्या कृतींचा उल्लेख केला पाहिजे. रा० मोगरे हे प्रतिभावान् कवि असून पूर्वीं 'विविधज्ञानविस्तार' मासिक पुस्तकांत व इतरत्र त्यांची सुंदर कविता प्रसिद्ध होत असे. अलीकडे बरींच वर्षें त्यांनीं मौन धरलें होतें. पण यंदा राजनिष्ठ नागरिकाच्या कर्तव्यजागृतीनें त्यांना तें मौन सोडण्यास लावल्यामुळें मराठी वाङ्मयांत एक दोन गीतांची भर पडली आहे. पैकीं आज आम्ही वर दिलें आहे तें रसीक वाचकांनीं अवश्य पहावें. हें गीत विविधज्ञानविस्तार व 'आनंद' यांच्या फेब्रुवारीच्या अंकांत आलेलें आहे.

दिल्लीचा बादशाही दरबार हा प्रसंग आली इंग्रजी राज्य स्थापन झाल्यापासून सर्व तऱ्हेच्या उन्नतीचे मार्गांत कितीसें पुढें पाऊल टाकलें आहे हें पाहण्यास फार उत्तम होता आणि त्या प्रमाणें मराठी वाङ्मयास ललामभूत असलेल्या वि० ज्ञा० विस्तार मासिकाचे दोन जोड अंक म्हणजे सुमारें २०० पृष्ठें याच विषयाच्या निरनिराळ्या अंगाला वाहिलेली पाहून आम्हांस संतोष वाटला. समाज सुधारणा, देशी संस्थानें, राज्यघटना, स्त्रीशिक्षण, शेतकी, धर्मविचार, इतिहास ग्रंथ, कादंबऱ्या, इ० अंगांचें पर्यालोचन या २०० पृष्ठांत झालेलें आहे व नाट्यग्रंथ, संगीतशास्त्र, ज्योतिष, लोकमत, वैद्यक, इ० कांहीं विषयांचें अद्याप व्हावयाचें आहे. विविधज्ञान विस्तारानें केलेली ही व्यवस्था खरोखर प्रशंसनीय आहे. समाजसुधारणा ही केवळ गेल्या पंनास साठ वर्षांतल्या सुधारकांच्या व सरकाच्या यत्नाचें फळ आहे. स्त्रीशिक्षणा संबंधानें गेल्या वीस वर्षांतच देशाचें पाऊल पुढें पडलें. त्यापूर्वीं शिकणाऱ्या स्त्रियांची अल्प संख्या, व त्यांच्या संबंधानें होणारी टवाळी यांचें चित्र 'तरुणीशिक्षण' नाटिकेंत उत्तम प्रकारें दृष्टीस पडतें. या वीस वर्षांत सगळें पारडें फिरलें आहे आणि सुशिक्षित स्त्रियांना छळवाद मुळींच सोसावा लागत नाहीं,

...न्न ...गर्जी ...६।१ आणा ...त्यास ...यात ...असें ...दावाटींत ...ना याचा ...बंध असून ...अधिकारी या ...मिळण्या ...कादाव. ...निः

नोटीस बेशमी [illegible] मर्द पुंडु पाटील रा० टुनकी [illegible] सोनाळे ता० जळगांव जि० [illegible]

यांस.—

खालीं सही [illegible]र यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं [illegible]झे मालकीचे (वहीवा-पाकींत) टुनकी [illegible]र्दे ता० जळगांव जि० बुलढाणा येथील शेत चार एकर जमीन असुनांव माहार [illegible] व मेहाचे कर्जाचे फेडींत १० वर्षाकरिता तुह्मांस तोंडी करागान दिले होतें तीकांरत भरून एक वर्ष आस्त झाले [illegible] आज ११ वर्षे झालीं. मुदत भरली असून्नोण्य आमचें सदहू शेत तुह्मीं आह्मास परत [illegible] नाहीं याजकरितां ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसाचे आंत आमचे शेत आह्मास परत देऊन माझी पावती घ्यावी तसे न केल्यास दिवाणी कोर्टमार्फत ताबा घेणें भाग पडेल दर्म्यानचे उत्पन्न व येकंदर खर्च व या नोटीशीचा खर्च अशी सर्व रकम तुह्मी आह्मास देणें भाग पडेल तुमचेवर खर्चाचा बोजा पडूं नये सबब ही नोटीस दिली आहे कळावे ता. १६-२-१२ इ मु. आकोला

दस्तुर विष्णु प्रभुराम पेनशनर आकोला

सही

रूख्या मयत वरस पुत्र भोग्या अज्ञानपालन करणारी आई मंजी तर्फे वहीवाटदार • नथ्या वा। येम्या महार याचे हातची रूसे

नो. नं. १०४

## नोटीस

नोटीस बेशमी दत्त वा। हरी पाटील रा० सोनपूरी. कुजरख तलुके बाळापूर

यासः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यात येतें कीं तुमची ता. १९-१२ १९११ ची नोटीस ता. १ फेब्रुवारी सन १९१२ रोजीं मिळाली आपण आपले नोटीशींत लिहीलें कीं गहाणाचे रुपये ५८० साडेपांचशे हे आकोलें येथें मोती लाल बनसीलाल आगरवाले याचे दुकानी जमा ठेवले आहेत. तरी माझे गहाणाचे मुद्दल रुपये ४०० चारशें याच्या किस्तां पाच प्रत्येक किस्त रुपये ८० प्रमाणें तीन किस्तींचे करार पुरे झाले असून दोन किस्तींचे करार पुरे होणें आहेत. पैकीं करार पुरे झालेले किस्तींचे रुपये २४० अक्षरीं दोनशे चळीस व त्याचे व्याज दस्तऐवजांतील शर्तीप्रमाणें रुपये १३९॥॥ एकूण रु. ४७९॥॥= चारशे एकोणऐंशीं पंधरा आणे हे मी घेण्यास तयार आहे बाकीचे दोन किस्तींचे करार पुरे होणें आहेत. ते रुपये मी करार पुरे झाल्याशिवाय घेत नाहीं. तरी माझे देणे झालेले रुपये ४७९॥॥= चारशे एकोण-ऐशीं पंधरा आणे मजला आणून द्यावे मी घेण्यास तयार आहे. व माझी पावती घ्यावी तसे न केल्यास मजला रितीप्रमाणे दिवाणी-कोर्ट मार्फत तजवीज करावी लागेल. त्याचा खर्च व तुह्मी मजला विनाकारण नोटीस देण्याचा खर्च मांडला ता खर्च मी तुमचे जवळून वसूल करून घेईन ही नोटीस दिली कळावें ता. ३-२-१२ इ.

सही

दुलानी वा। रुन्हाजी माळी खीरपूरी

दस्तुर खुद

रावजी वा। संभाजी माळी राहणार खीरपुरी द० खु०

नो. नं. १०५

## नोटीस.

नोटीस बेशमी चंद्रभान वा। भवानी अडनाव गुडाडे भनगर रा० दोनद प्र० बार्शीटाकळी

यास —

खालीं सही करणार सेगाई मर्द भवानी नीबी खुर्द ता० आकोला इजकडून नोटीस देण्यात येते कीं मौजे नींबी ता० आकोला येथील स्थावर माल शेत स० न० याचे खातें माझा मालीक भवानी याचे नावाना असून तो मरण पावल्यामुळें तुह्मी जन्मानें वयस्क पणानीं मुलकी संबागांन तुमचे नावानी खातें करून घेतें करीतां तुह्मी समजतां कीं माझी मालकी झाली पण असें ह्मणणें हें उलट आहे. तूं माझा सावत्र मुलगा आहे. परंतु तूं व तुझा बाप हायात आस्त ममई तुझा हिस्सा नाशानी पांपंकाचें शेत घेउन वेगळा झाला तुझा कोणत्याही प्रकारें संबंध नसून खातें झालेलें शेत वडीलोपार्जित नसून आमच स्वसंपादीत आहेत यानवर माझे मुलें व्यंकट वगैरे ३ आहत हे हक्कदार आहेत तुमचा कोणतेही प्रकारें हक्क संबंध नाहीं तुमचे नावानी झालेले मताचें खाते रद्द करण्या विशयीं कोर्टमार्फत काम सुरू आहे तेंव्हा सदहू मिळकत ह्मणजे शेत माझ्या ताब्यांत असलेलें हें तुह्मी कोणास गहाण कींवा खरेदी करून देउं नये दिल्यास घेणार फुकट बुडेल. व याबद्दल तुह्मास नुकसानी द्यावी लागेल हे पक्के समजावें. दुसरें यापर्ति तुह्मी जबर दस्तीनें माझे मालकाची जमीनीचें पेव ४॥ खंड्याचें कींमत रुपये ३६० बकऱ्या खंडी १० याची कींमत रुपये १००० याप्रमाणें नेला याबद्दल ही तुमचेवर व्यवस्था करणें आहे. येकंदरीत वर लीहालेले नोटिशीप्रमाणें आमचे मालकींत कोणचेही प्रकारें दखलंदाज देऊं नये. दिल्यास तुमचे सर्व रद्द होईल. व तुह्मास कोर्ट खर्च वगैरे नुकसानी द्यावी लागेल. कोर्ट आह्मास इन्साफ देईल. कळावें नोटिशीचा जबाब द्यावें. कळावें. ता० ११-२-१२ इ.

सही

नि० सेगाबाई जवजे भवानी इचे हातची नि० बांगडी.

नो. नं. १०६

## नोटीस

नोटीस बेशमी यशवंतराव वा। लक्ष्मणराव कुळकर्णी रा० मौजे खेडें बुजरूख ता० जळगांव जि० बुलढाणा.

यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं मी देशांत असतां माझा गुमास्ता फत्तेलाल अत्याराम मारवाडी यांनी तुह्मास मौजे खेडें बुजरूख येथील माझे खुद्द मालकीचे शेत सर्व्हे नंबर १२ पैकी एकर गुंठे १२।२८ आकार रुपये २९ हे शेत तुह्मास संमत १९६७-६८ सालचें पीकाचा उपभोग घेण्याकरितां तोंडी भाडेपट्यानें दिलें त्याचे स्वार्मित्वाचे रुपये दरसाल ११५ ठरविले आतां त्याप्रमाणें दोन सालचे रुपये २३० तुमचे कडेस घेणें राहिले. असतां मी तुह्मास दोन च्यारवेळा रुपये मागितले व तगादाहि केला तर तुह्मी देतो असें ह्मणून तुह्मी पाठविले नाहीं. ह्मणून तुह्मांस या नोटिशीने कळविण्यात येते कीं ही नोटीस पावताच ८ दिवसाचे आत आमची रकम रुपये २३० दोनशे तीस व त्याचे व्याजासुद्धा पाठवून देणे व त्याची पावती माझे सहिची घेउन जाणे तसे न केल्यास तुमचे वर कोर्टात दावा करून येन आमची रक्कम व त्याचे व्याज व कोर्टखर्च व नोटिशीचा खर्च तुमचे जवळून भरून घेतल्या जाईल व पुढ आमचे शेतात तुह्मी कीस्तकारी करूं नये असें केल्यास कोर्ट मार्फत दावा करून ताबा घेतला जाईल. ही नोटीस दिली कळावें तारीख ९-२-१९१२ ईसवी.

सही

शिवलाल नेणमल मारवाडी पिंपळ-गाव काळ्याचें निशानी दस्तुर खुद्द

नो० नं० १०७

## नोटीस

सर्वत्र लोकांस या नोटिशीचे द्वारें जाहीर करण्यांत येत आहे कीं, जनाब चीफ कमिशनर साहेब बहादूर मध्यप्रांत यांच्या जुडिशियल डिपार्डमेंट नोटिफिकेशन नंबर १६०३ तारीख १९ माहे सप्तेंबर १९११ यांत प्रसिद्ध झाल्याप्रमाणें दिवाणी कोर्टांनीं निकाल केलेल्या मिसलांची व्यवस्था रक्षण व नाश या संबंधानें नोटिफिकेशन नंबर ३९६३ ता० २१ मार्च सन १९०६ मध्यें जे नियम प्रसिद्ध केले गेले आहेत त्या नियमानुसार ता० २६ मार्च १९०६ चे पूर्वीचे सर्व नियम रद्द समजले जाऊन पूर्वीच्या जुन्या मिसलांची व्यवस्था केली जाईल करितां सर्व लोकास कळविण्यांत येतें कीं ज्यांनीं ज्यानीं जुन्या मिसलामध्यें महत्वाचे कागद दाखल केले असतील ते परत घेण्या करितां ता० १ मे सन १९१२ चे आंत आमचे कोर्टांत अर्ज दाखल करून आपले कागद परत घेऊन जावे असें न केल्यास सदहू कागदाचा नवीन नियमा-प्रमाणें नाश केला जाईल. कळावें.

अकोला

ता० १७ जानेवारी १९१२ इ.

A. D. BARR.

डिस्ट्रिक्ट व सेशनजज्ज

नो० नं० ४४ पश्चिम वऱ्हाड

## नोटीस

नोटीस बेशमी बाहादरखा आणि गुला-मकादरखा वा। सीकंदरखा मुसल्मान रा० मंगरूळपीर ता० मनकुर जि० आकोला

यांसः—

खालीं सही करणार इजकडून कळ-विण्यांत येते कीं वियमान सबजज साहेब बहादुर कोर्ट आकोला यांचे कोर्टांत दि० मु० नंबर १९९ सन २ यात हाजर राहून माझे तर्फे काम करण्यास सदहू व मोकदम्यासंबंधानें सर्व प्रकारची कारवाई करण्यास तुह्मी उभयतास कुलमुखत्यारपत्र दिलें होते ते मुखत्यारपत्र तुमचे बेभरवशाचे वर्तणुकीमुळें आज तारखेपासून रद्द केलें आहे. तरी तुह्मी आजपासून सदरहु मोकदम्यासंबंधानें अगर आमचे जाहागीरीचे हिस्याबद्दल व हिस्याचे रुपये वगैरे घण्याबद्दल अगर कोर्टांत असलेले पैसे घण्याबद्दल काहीं कारवाइ करूं नये केल्यास ती बातल असें कळवें तारिख २०।२।१२ इ. सही उर्दूत

सहा पत्ररबेगम मर्द खजा अब्दुल सलाम जहागीरदार महान ता० अकोला जि० ०

द० खान अब्दूल रहिम वल्लद ख्वाजा अब्दूल सलाम राहणार महान

नो. न. १०८

## नोटीस

ज्यानबीबाई कासीराम मारवाडी रा० अकोला इ.—

सेखरसुल वल्लद सेखनसरु जात मुसलमान राहणार चांदूर ता० आकोले यांजकडून देण्यांत येतें कीं तुह्मी विद्यमान आकोलें येथील सीनीअर मुनसब साहेब याच कोर्टांत दिवाणी मुकदमा नंबर ६७१ सन १९१० चा प्रतीवादी सेखजलाल वल्लद सेखमखातुल्ला आणि आमरबी मर्द सेखछल्लु राहणार चांदूर याचेवर त्यांनी लिहुन दिलेले ता० १३।६।९८ चे गहाणाखता वरून दावा करून तारीख ६-३-११ रोजीं सदरील प्रतीवादीनीं रुपये ३३६।१ आणा ८ पै. सहा महीन्यांत द्यावे न दिल्यास मौजे चांदूर ता० आकोले येथील शेत सर्वे नंबर ५ एकर ६ गुंठ २१ आकार रु० १५ यांतील निम्मा हिस्सा आणि शेत सर्वे नंबर ६४ एकर ९ गुंठ ११ आकार रु० २१ हें लहान गहाण होण्याबद्दल तुह्मी हुकूनामा मिळवून तो तारीख १०-२-१२ रोजीं पक्का होण्याचा हुकम मिळविला. यासाठीं या नोटीशीनें घेणारास कळवितो कीं दोन्ही सालीम शेतांत माझा निम्मा हिस्सा व बाराचा हिस्सा असें असल्यानें व ती शेतं माझे वहीवाटींत आणि सेख जलाल व अमरबी यांचा माझेशी नातेवाईक पणाचा संबंध असून तुमचे अगोदर अग्रक्रियाचा अधिकारी या नात्यानें त्यांना प्रथम मला शेत मिळण्याचा हक्क दिला आहे. तरी तुह्मी मिळविलेल्या हुकूमनाम्याची रक्कम रुपये ३३६ आ० १ पै. ८ अगर खाते असून ती मजपासून घेऊन हुकूमनामा शिवाय तुह्मांस प्राप्त होणारा हक्क मला द्यावा. हें तुह्मास कळऊन राजेश्री ताहसीलदार साहेब आकोले यांचे कडेही वऱ्हाडल्यांडरेव्हेन्युकोड यातील बाब १८ प्रमाणें काम चालवित आहे तरी यांत तुह्मी वरील प्रमाणें तुह्मी केल्यास पुढील सर्व प्रकारचा खर्च नुकसान वगैरेची जबाबदारी तुमचेवर राहील कळावे. ता० १६-२-१२ इसवी सही

सेखरसूल वल्लद सेख नसरु नि० हातची आंगठा

नो० नं० १०९

## नोटीस.

नोटीस बेशर्मी उदेभान पैकाजी पाटील रा. आळसन हल्ली रा. लोणी बारलींग ता. आकोला

यांस: —

खाली सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुझे व माझे दोस्ती संबंधानें येके ठीकाणीं ६ वर्षपावेतो राहीली मीं जातीचो कोल्हाटीन असून माझा धंदा कसबपणाचा व नाचण्याचा असल्यामुळें लोक येतात जातात ते तुजला थोडे दिवसांपासून सहन होत नसल्यामुळें तंटे बखेडे होतात. ता. ६-२-१२ इ रोजीं ऊन्हाळटाकळी येथें नाचण्याकरितां जाऊन सकाळीस परत आली तुझे जवळ ठेवलेली किल्ली घेऊन पेटी उघडून दुशाला ठेविला परंतु मजला संशय आल्यामुळें पेटीतील सामान पाहीलें असतां नारायण व गंगी मर्द खुशाल या उभयतांपासून लांबकान्हा नांवाचे शेत खरिदी घेतले तो कागद दिसला नाहीं वरून तुझांस मागीतला असतां दत्तु नारायण यांचे समक्ष देण्याचे कबुल करून ता. ७-२-१२ इ. रोजीं रात्रीचे वेळीं बिनविचारता खरेदीखताचा कागद १२ रुपयाची पावतीसह पळून गेला हे बरोबर नाहीं नोटीस पावल्यापासून ८ दिवसाचे आत खेरदीखताचा कागद पावती असें आणून देऊन पावती घेऊन नावें तसें न केल्यास रितीप्रमाणे योग्य कोर्टीत दावा करून कोर्ट खर्च व नोटीसीचा खर्च तुझपासून घेतला जाईल कळावें ता. ९-२-१२

सही

सेवंती मर्द पैसा हीचे हातची निशानी अंगे

नो. नं ११०

## जाहिर नोटीस.

रा. रा. लक्ष्मण भट बिन तुकाराम भट राहणार अडगांव बु. ता. आकोट

यांस:—

व इतरत्र लोक यांना

खालीं सही करणार कळवितो कीं, तुह्मास ता. २१-६-१९१० इ० रोजीं दिलेले जनरल मुखत्यारपत्र आज तारखेपासून रद्द केले आहे. सबब त्याच्याशीं कोणी कोणत्याच प्रकारचा व्यवहार करूं नये केल्यास ज्याचा तो जबाबदार होईल. वरील मुखत्याराच्या ताब्यांत दिलेली जिनगी त्यांनीं अफरातफर केली आहे व करित आहे सबब त्यानें याउपर आमच्या कोणत्याच व्यवहारांत पडतां कामा नये व मागें त्याच्या ताब्यांत दिलेल्या जिनगीचा हिशेब देऊन पावती घ्यावी तसे न केल्यास रीतसर तजविज करण्यांत येईल कळावें ता. २१-२-१२ इ.

सही

किसन वल्लद दत्तक बाप मारुती सेलकी पालन करणार व जन्म देणार बाप विठोबा वल्लद अबुंजी

द० किसन हवीरजी रा. माना

नो० नं० १११

---

## विहार आनन्दका सागर रंगीन तसवीरे सहित चारों भाग तथा पांचो अंग सचित्र कोख शास्त्र.

असली हमसे मगावो धोकेसे बचो स्त्री पुरुषोंके जात, भेद, लक्षण अनेक देशस्थ स्त्रीनायका, कुमारी प्रकृती, सत्व दुती कुलटा, पतिव्रता, व्यभिचारणी आदिको पहचान, रजोधर्म लक्षण, ऋतुविहार मय सहवास स्थान क्रिया, शैय्यातिथ, कामस्थान सालासगरि, वर्तासोआभूशण, वस्त्रतआर्दवमधान पुत्रस्टीकर्म, नपुंसकविद्या, उपदंश प्रमेह आदि अनेक रोगोंकी चिकित्सा औषधि, पशुद्र भाषा जाननेकी रीति, मंत्रतंत्र, यंत्र, वशीकरण सुद्धां विद्या आदि अमुल्य विषयका भंडार किमत रु०

पं० गंगाप्रसाद इंजीनियर शहापडी

नो० नं० १९ अलीगड

---

## WONTED

A corresponding clerk on Rs 25 per Mausum for the Khamgaon Municipaty. The applicant should have passed the Matriculation examination.

Preference will be given to those having previous expiriane of Municipal work.

Appication with copies of testimonials which will not be returned, should reach the under signed by the 12 th March 1912 at the latest

No 102 K. S. Bhadang

Vice Chairman

Khamgoan } Municipality Khamgaon

12—2—1912 }

## जाहिर नोटीस.

सर्वत्र लोकांस जाहिर करण्यांत येते कीं तारीख १६-२-१२ इसवी रोजी मौजे पिंपळगांव काळे तालुके जळगांव येथील वेंडर किसन विठोबा यांजपासून आठ ८ आणे किमतीचा अनुक्रम नंबर ९६५ चा जनरल स्टांप विकत घेऊन गाडी रस्त्यानी जात असतां तो स्टांप कोठे हरवला याचा पता लागला नाहीं गांवापाशीं जाऊन पहातां स्टांप दिसला नाहीं. परत रस्त्यानी शोध करून पिंपळगांवपर्यंत आलो परंतु गहाळ झालेला स्टांप सांपडला नाहीं. व माझे काम जरूरीचे असल्यामुळें पुन्हा त्याच वेंडर पासून त्याच किमतीचा दुसरा अनुक्रम नंबर ९६६ चा स्टांप विकत घेऊन तो मी उपयोगांत आणला मी बीन लिहिणारा असल्यामुळें मजला भिती कीं कोणी माझे नांवचा कोणताही लेख त्या स्टांपावर करील. अशी मजला भिती वाटत असल्यामुळें मी या नोटीशीनें सर्व लोकांस जाहीर करितो कीं तो स्टांप कोणास सांपडल्यास सरकारांत हजर करावा अगर मजपाशीं द्यावा त्या स्टांपावर माझे नांवचा कोणताहि लेख कोणीहि करून घेतल्यास या नोटीशीनें मी जबाबदार नाहीं. वरून ही जाहिर नोटीस दिली असें कळावें तारिख १७-२-१२ इ.

सही

संपत बा। विठोबा पोफळनोर

रा. आडोळ बु॥ नि. खुद

आंगठा

नो. नं. ११२

---

## दिल्ली दरबार.

मानपत्राचें उत्तर देतानां "हिंदुस्थानचें एक सारखी प्रगति होत जावी ही आपली उत्कट इच्छा आहे." असें बादशहानीं ह्मटलें. हिंदुस्थानात शेंकडा ८० पेशीं लोक शेतकीवर निर्वाह करीतात तेव्हां त्यांच्या मध्यें अगोदर प्रगति झाली पाहिजे. त्यांची प्रगति होण्यास शेती सुधारली पाहिजे. शेती सुधारण्यास सुधारलेल्या आउतांचा जास्त जास्त प्रसार झाला पाहिजे

हें उघड आहे. [...] ही सुधारलेली शेतकीची आऊतें [...] लोखंडी नांगर कडबा कापण्याचीं [...] चाकें, वगैरे वगैरे तयार करण्या[...] आह्मी करीत आहों. सबब हीं [...] मच्या कडूनच मागवा. क्याटलाग [...]

कि[...]रबंधु.

पेठ किर्लोस्कर W[...] (सं० औंध जिल्हा सातारा).

नो० नं० १२

---

ठिक ठिकाणी एर्जटस् पाहिजेत.

# सन लाइफ अशुअरन्स कंपनी ऑफ कानडा

[१८६९]

इंग्लिश सरकारची सत्ता देखरेख सरकारी हुकुमाशिवाय भांडवल गुंतवता येत नाहीं.

भांडवल तेरा कोटी रुपये.

पॉलिसीचे नमूने फारच सुधारलेले आहेत.

पालिसी .... .... .... .... .... .... बिन अटीच्या.

पॉलिसी .... .... ... .. .... .... बिन तक्रारी.

पॉलिसी .... .... ... .... .... .... बिन बुडणारी.

हिंदुस्थानचे मुख्य ऑफिस, हार्नबी रोड मुंबई. } व्य. श्री मुधोळकर मध्यप्रांताचे वऱ्हाडचे जनरल एजंट अकोला ' प्रांतासह नो. नं. १३

---

# Oriental Govrnment security LIFE ASSURANCE COMPANY Limited

ESTABLISHED IN 1874.

R. Paterson, Brown, Manager,

HEAD OFFICE—BOMBAY

## FUNDS Exceed 4 crores

CLAIMS PAID FOR OVER 3 CRORES

IMMEDIATE SETTLEMENT OF CLAIMS

If there be one thing of more importance than another in connectio, with Life Assurance, it is when claims arise, that the amount due under the policy be paid to the Claimants at the earliest possible date. This the Directors of the 'Oriental' keep well before them and act in treating th clients with the utmost liberality.

UNQUESTIONABLE SECURITY.

It is not sufficient to read that a Company's funds amount to a given um, but it is essential to know how such Funds are invested if in miscellaneous and risky investments or how secured.

The Funds of the 'Oriental' are invested in Government Securities and lodged with the Government Official Trustee of Bombay in terms the Company's Trust Deed, as Security for Claims arising, through decease of assured lives, and endowment policies matured.

Government Officers, Professional men, Tradesmen and others by employir portion of their annual income or profits in effecting life policies, at once create a fund equivalent to the savings of many years.

No mān can be sure how long he will live. and although he may save money yet, if he dies early before he had time to save much, his wife and family may be in distress. Life Assurance is a means by which his danger is got over. Life being so uncertain, the sooner a man make up his mind to assure his life the better. Once satisfied of the propriety of the step, do not delay. There are numerous instances in the records of the Oriental' where the delay of a month or less, has left the family without the intended provision.

INFLUENTIAL AND ENERGETIC AGENTS WANTED. For term please apply to the undersigned.

Prospectuses, forms and any further information can be obtained on application

M. DESOUZA.

CHIEF AGENT, Nagpur

CHIEF AGENCY FOR C. P., BERAR & KHANDESH No. No. 14

---

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यानीं सदाशिवआश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.